R No. N 4

साल अखेर „ ७ „ १ ८८

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly......... 3 ................6

Single copy ..................................4

Advertisement

Below 10 lines ...... 2

Per line over 10 ......4

Repetition Per line. . 8


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOLXXXII AKOLA MONDAY 5 DECEMBER 1898 NO 47

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख ५ माहे डिसेंबर सन १८९८ इ० अंक ४५



### जाहिरात

#### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी-च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

### जाहिरनोटीस

सर्वत्र लोकांस मी शामू वल्लद चिंधाजी तेली राहणार ताजनापेठ आकोला. जाहिरातीनें असें कळवितों कीं माझा बाप नामे चिंधाजी वल्लद भवानी जात तेली राहणार ताजनापेठ अकोलें याची उमर ६० वर्षांवर असून तो भ्रमीष्ट झाला आहे ह्मणजे त्यास कोणत्याही कामाची जशी व्यवस्था करावी तशी करतां येत नाहीं ह्मणून जाहिरातीनें असें कळविण्यांत येतें कीं आमच्या तीर्थरूपाशीं कोणत्याही प्रकारें कोणीही देवघेवीचा संबंध ठेऊं नये ठेवणें असल्यास मजशीं ठेवावा. जो कोणी माझ्याशीं देवघेवीचा संबंध न ठेवतां त्याच्याशीं संबंध ठेवील त्याजबद्दल मी जबाबदार न होतां ज्याचा तो राहील ह्मणून दिली जाहिरात सही. तारीख १।१२।९८ इसवी.

सही

शामू वल्लद चिंधाजी तेली राहणार आकोलें दस्तुर खुद.

---

नवीन.

### क्रिमिनल प्रोसीजर कोड,

### सन १८९८ चा आक्ट ५.

सटीक. ( आवृत्ति ४ थी. )

चारी हायकोर्टांचे निवाडे, मुंबई हायकोर्टानें केलेले वटहुकूम व विशेष समजुतीच्या टिपा आणि खेरीज जरूर लागणारे फौजदारी आक्ट सुमारें १४ यांसह छापत आहे. सन १८९९ सालचें मार्च अखेर तयार होईल. ता० १५ जानेवारी सन १८९९ चे आत आगाऊ किंमत भरणारास किंवा व्हाल्युपेएबलनें मागविणारास टपाल खर्च सुद्धां रुपये ५ पडतील. मागाहून घेणारास टपाल हंशील सुद्धां रुपये ७ पडतील.

पुणें न्यायःश्रय अफीस. ता० १०।११।९८

नरहरराव त्रिंबक राजमाचीकर.

शिवराम हरी साठे


---

### नोटीस

रा. रा. रघुनाथ परदेशी वद्दी राहणार ताजनापेठ आकोला यास नोटीस देणार रहिमखां वलद हिमतखां सौदागर राहणार ताजनापेठ आकोला तर्फे राघोजी वल्लद जमाजी राहणार ताजनापेठ आकोला नोटीशीनें असें कळवितों कीं तूं आमचे ताजनापेठ येथील लाल बंगल्या नजीकचे आमचे मालकीचे घरांत दरमहा भाडें एक रुपया देऊन रहात आहेस. तर ही नोटीस पावतांच राहिलेलें भाडें व चालूं महिन्याचे भाडें देऊन आमचें घर खालीं करून द्यावें असें न केल्यास भाड्याबद्दल व घर ताब्यांत घेण्याबद्दल रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल व या नोटीशिच्या खर्चासुद्धां रुपये भरून घेतले जातील. ह्मणून दिली नोटीस सही कळावें. तारीख २९।११।९८ इसवी.

( सही ) रहिमखां हिमतखां तर्फे मु० राघोजी जमाजी राहणार आकोलें.

दस्तुर खुद.

---

पंजाब नादारी मुकदमा नंबर ५ सन १८९८ इ०

नमुना ( जी )

विद्यमान त्रिंबक गणेश परांजपे नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे वाशीम. सर्वत्र लोकांस कळण्या करितां नोटीस देण्यांत येते कीं, यादव वलद ईश्वरा शेटेवाणी राहणार रिसवड तालुके व जिल्हे वाशीम हा नादारी आहे असा आज तारीख १९ माहे ११ सन १८९८ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १७ माहे १२ सन १८९८ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकारितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकारितां व नादारानें आपले सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या कारितां नेमला आहे. नादाराच्या सुटकेसंबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनी त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींतल्या आधारावरून तक्रार सांगणें असेल व तें आणि त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्से करण्याची इच्छा असेल या साक्षीदाराची नांवें नमुद करावीं. ही नोटीस न जाण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्याकारितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरें असल्याबदलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्युडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी. ह्मणजे ते दावे रजीष्टरी दाखल होतील. तारीख १९ माहे नोवेंबर सन १८९८ इसवी.

T. G. Paranjape

नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हे वासीम.

---

## ॥ श्रीजयतितराम ॥

### — मंत्र रामायण नं. ६

### —अयोध्या कांड—

येथून पुढें अयोध्याकांड सुरूं होतें. भरत मातुल गृहीं गेला असतांना दशरथ राजानें ज्येष्ठ पुत्राच्या यौवराज्याभिषेकाची कडेकोट तयारी चालविली होती, इतक्यांत मंथरा दासीच्या चिथावणी वरून आपल्या पुत्रास राज्य मिळत नाहीं यामुळें कैकेयीचें चित्त खवळून गेलें होतें व त्या भरांत तिनें भावी परिणामाचा विचार न करितां पूर्वीं राजानें देऊं केलेलें.

देमत्सुतासि पृथ्वी अटवी रामासि हें
वदोन वर ।
सत्यप्रतिज्ञ मूर्च्छित केला मागोनि हेचि
दोन वर ॥

वर मागता क्षणींच राजा मूर्च्छित कां पडला याचें निरसन सत्य प्रतिज्ञ हें हेतुगर्भ विशेषण करितें. मोरोपंताच्या सर्वच काव्यांत हेतुगर्भ विशेषणांची फार सुंदर योजना केलेली असते व त्यामुळें एके प्रकारचा विशेष प्रौढपणा व रमणीयता काव्यांत दृष्टीस पडतो वरील पद्यांत सत्यप्रतिज्ञ या विशेषणाची योजना फार सुंदर केलेली आहे हें प्रत्येक सहृदयांतःकरणाच्या लक्षांत येईल. आमच्या सुधारलेल्या एकोणिसाव्या शतकांतील सुधारून नवीन आवृत्ती काढलेल्या नीतिकोशामध्यें सत्यप्रतिज्ञ याची व्याख्या कांहीं विलक्षण सापडते ती तेथून जशीची तशीच अक्षरशः उतरून घेतो.

सत्यप्रतिज्ञ सुधारणाग्रणीः व्याख्या :— लोक कल्याणेच्छु व जनपदाग्रणीपण स्वीकारणाऱ्या जनांनीं वाटेल ती सुधारणा करण्याचें मत विनधोक ठोकून द्यावें, कदाचित आपल्यावर त्या मताप्रमाणें वर्तन करण्याचा दुर्धर प्रसंग ओढवलाच तर घरांतील वृद्ध मनुष्यावर त्याचा बोजा लोटून देऊन पुन्हा आपले अग्रणीपण स्वीकारण्यास जे लोक तयार असतात ते:

वाहवा ! ! ही अजब नीतिमत्ता त्याकाळीं नव्हती. कंदर्प घटित व्यवसायामध्यें व राज्यकार्यामध्यें कांहीं केले तरी असंबद्धपणाचा वारा सुद्धां स्पर्श करीत नाहीं every thing is fair in love and polities या पाश्चात्य साधूक्तीचा लाभ सुध्दां त्या अज्ञान राजास मिळणें अशक्य होता. एक्या बाजूनें सूर्यकुलावतंस नृपतिचें प्रतिज्ञा भंग न करण्याचें ब्रीद व दुसऱ्या बाजूनें लाडक्या भार्येचें मन संभाळण्याचें काम. वर दोन देऊं केलेले दिलेच पाहिंजेत व त्यामुळें अत्यंत प्रिय पुत्राचा तर वियोग होतो या दोन कुकाट्यांत सांपडल्यामुळें बिचारा तो राजा अगदीं गोंधळून गेला. असल्या बिकट प्रसंगीं सत्यप्रतिज्ञ दशरथ राजा आपल्या भार्येस जे विनवणीचें व आर्जवाचे शब्द बोलला हा एकंदर प्रसंग बराच चांगला वठला आहे ह्मणून तो खालीं देतों:—

निजसुत-वियोग विव्हल सत्यच्युति भीत तो
असा विनवी ।
कैकेयि! तुझ्या ठायीं निर्दयता हे अशी
नसावी नवी ॥

‘ नसावी नवी ’ या शब्दांनीं राजास पूर्वानुभवावरून आपली लाडकी आयत्या वेळेस असल्या प्रकारचा गोंधळ करील अशी कल्पना सुद्धां आली नसावी असें दिसतें, एरव्ही तिचे लाड पुरविण्यास तो तत्परच होता.

वय माझें बहु गेलें पुत्रोत्पत्त्यर्थ यत्न
बहु केला ।
त्यांशीं वियोग करितां न कशी धरिशी
मदंत शंकेला ॥

वय उतार झालेलें त्यांत बहुत श्रमानें पुत्रलाभ त्या पुत्राचा वियोग झाला तर काय परिणाम होईल हे ‘ मदंत शंकेला या शब्दांनीं गर्भित केलें.

तुज राज्य सर्व दिधलें आणिकही माग जें
अभीष्ट तुला ।
गुणवदपत्य वियोग क्लेशासि जगत्त्रयी
नसेचि तुला ॥

राज्य कोणासही दिलें तरी रामवियोग न व्हावा येव्हढाच दशरथाचा कैकेयीची विनवणी करण्याचा हेतु होता. येरव्ही तो आपलें सर्वस्वही कैकेयिला देण्यास तयार होता. हाच भावार्थ दुसऱ्या चरणांतील अ-

नंतर न्यासानें विशेष स्पष्ट केला आहे.

काय तुझा रामानें केला अपराध सांग गे
प्रमदे ! ।
कां माझ्या बाळावरि करिसी हा कोप !
सांग गे प्रमदे ॥

मूढ उगवितेस असें ह्मणावें तर रामाच्या हातून तुझा कधींच अपराध घडला नाहीं तेव्हां तुझें हें करणें अति निर्घृणतेचें दर्शक होय. मी वृद्ध असूनही मजवरती नेहमीं अकृत्रिम प्रेम दाखवितेस तेव्हां मला प्राणापेक्षांही प्रिय जो रघुवीर त्यांतून तो माझें बाळ तर त्यावरतीही तुझें प्रेम असलेंच पाहिजे. कदाचित् तो नाठाळ असेल किंवा मातृभिन्नभाव दाखवीत असेल तर मग त्याच्यावर ही आग पाखडण्यास कांहीं तरी जागा आहे परंतु तो माझा पुत्र तर

हा राज्ञि ! पुत्र माझा सुकुमार कुमार
बहुविनीत कृती ।
आणि विशेष गोष्ट ही कीं:-
स्वल्पदशेंत तरीही या विषयीं कां तुझी
अशी प्रकृती ॥

परंतु कैकेयीच्या मुखश्रीवर या बोलण्याचा कांहीं परिणाम झाल्याचें मुळींच चिन्ह दिसेना तेव्हां पुन्हा एकदा या हट्टाचा परिणाम कोणत्या थडीला जाईल हें पहिल्यापेक्षां विशेष स्पष्ट सुचवितो.

कां मति धरिली नंदन-वियोग-वन्हींत
कांत होमाया ।
का मन वृद्धावरली कैकेयी त्यागिली
अहो माया?॥

कैकेयीची अशी बुद्धि कां फिरली या विषयीं राजाचा कांहीं एक तर्क चालेना.

हे श्रीपति प्रसादे वृद्धपणीं पुत्र जाहले
चार ।
हें जाणुनि हें वर्तसि झाला तुज काय
भूत संचार ॥

कैकेयी असें विपरीत वर्तन करील असें राजास मुळींच वाटलें नव्हतें. तेव्हां हा भूतसंचार होऊन प्रकार घडला असें त्यास वाटणें साहजिक आहे. वरील प्रसंग जरी कवीच्या उत्कृष्ट सर्वस्वाची साक्ष देत नाहीं तरी तो कवीनें किती खुबीदार वर्णन केला आहे हें सहज ध्यानांत येईल.

राजा इतुकें बोलून मूर्छित पडला. कवि ह्मणतो जणो काय

खीते, पुत्रवियोगें होणार प्रांत दाविला
पाते ॥

इतक्यांत रामलक्ष्मण तेथें आले व त्यांनीं राजा मूर्छित पडण्याचें कारण कैकेयींस विचारलें, व तिनें ही आपला 'मनःकाम' प्रांजल बुद्धीनें सांगितला.

यावर रामानें दिलेलें उत्तर

'माते ! देवारिचा रिपुत्रास ।
सत्य विनाशा पासूनी कां धरितो! निर्मुनीही
पुत्रास ॥

एकोणिसाव्या शतकांतील पाश्चात्य शिक्षा दिलेल्या नीतिवेत्तेस न शोभो परंतु सूर्यकुलोत्पन्न राजपुत्रास खचित शोभलेंसे होतें. लहान गोष्टीच्या अभिमाना पासूनच पुढें महद्गोष्टी विषयीं अभिमानांकुर उत्पन्न होतो हें सुप्रसिद्ध आहे. कुळाचा अभिमान, धर्माचा अभिमान, देशाचा अभिमान, हे न्यूनाधिक प्रमाणानें मानसोन्नति सूचक दीर्घ चिन्हें होत. परंतु जेथें अभिजात कुलत्वाचें समूळ विस्मरण पडत चाललें, धर्म मृगजलवत् अशाश्वत व निःसत्व भासावयास लागला, मायदेश विसरून जाऊन पाउणशें वर्षें होऊन गेलीं तेथें या अभिमानाचा प्रकाश ह्मणजे दिवाभितास सूर्य प्रकाशा प्रमाणें होय.

(पुढें चालेल.)

---

## बोर्डाचे मेंबरांची निवडणूक.

नंबर ६

आतां पर्यंत ज्या सरकारी अमलदारांकडे स्थानिक स्वराज्याचें काम सोपविलें असेल त्यांजकडून त्या कामाची जितकी काळजी घेण्यांत यावी तितकी घेतली जात नाहीं या बद्दल आपण विचार केला. आतां या अंकीं आपल्या दुसरें कारणाचा विचार करणे आहे. ह्मणजे -

"लोकही स्थानिक स्वराज्या संबंधानें निष्काळजी आहेत"

आपल्या पूर्वींच्या राज्यपद्धतीमध्यें व अर्वाचीन राज्यपद्धतीमध्यें एक मोठें महदंतर आहे. तें असें कीं पूर्वींच्या राज्यपद्धती प्रमाणें राजकीय विचाराच्या गोष्टी राजा व त्याचे मंत्री यांनींच फक्त कराव्या असें होतें. प्रजेनें राजास जो कारभार द्यावयाचा तो त्यांनीं दिला ह्मणजे राजशकट चालविण्याची जबाबदारी सर्व राजावर असे. प्रजा राज्यकारभाराचा भाग कधीं ही घेत नसे परंतु अलिकडे पाश्चिमात्य सुधारणे प्रमाणें तें मान अगदीं बदलून गेलें आहे.

पाश्चात मता प्रमाणें एकादे देशाचा राज्यकारभार चालविणें हें एका व्यक्तींचें काम नसून सर्व समाजाचें आहे. युरोपांत रशिया, जर्मनी वगैरे देशांत जरी प्राच्य देशा प्रमाणें राजे लोकांच्या हातीं राज्य कारभार आहेत तथापि युरोपांतील बाकीच्या देशांत व अमेरिकेंत कमजास्त प्रमाणानें लोकसत्तात्मक राज्यपद्धत सुरू झाली आहे. राष्ट्रांतील सर्व लोकांत एक समया वच्छेदेंकरून विचार करून राज्य चालविणें कठीण असतें. करितां पार्लमेंटां सारख्या लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सभा स्थापन केल्या आहेत. व त्यांच्या द्वारें राज्यकारभार चालतो. ज्यां प्रमाणें सर्व राष्ट्रा करितां लोक नियुक्त प्रतिनिधींची, एक पार्लमेंट असते त्याच प्रमाणें मोठमोठ्या शहरा करितां व देशाचे भागा करितां म्युनिसिपालिट्या व स्थानिक स्वराज्यें स्थापन केलीं आहेत. प्रजेनें आपल्या हिताहिता बद्दलचे गोष्टींची अशा संस्थेंत चर्चा करून आपल्याला हितकारक अशी राज्यपद्धत सुरू करावी असा प्रवात आहे. जर एखाद्या गोष्टी पासून प्रजेस पीडा होत असेल तर त्या बदलचा दोषारोप एका व्यक्तीवर किंवा व्यक्तिसमुदायावर ते लोक करीत नाहींत. तर तो दोष दूर करणें आपलेंच कर्तव्यकर्म आहे असें जाणून त्या प्रमाणें लोकमत तयार करितात व हवा तसा कायदा बदलून घेतात.

परंतु आपल्या लोकांची समजूत याहून अगदीं भिन्न आहे. आपली समजूत अशी आहे कीं ज्या अर्थीं आपण राजास करभार देतों त्या अर्थीं आपल्या सर्व सुखदुःखाचा जबाबदार तो आहे. आपला काल व बुद्धि राज्यकारभारांत घालण्याची आपणास गरज नाहीं.

या दोन भिन्न मतामुळें आपल्या देशावर मोठा अनिष्ट परिणाम होत आहे. आपण राज्यकारभारांत लक्ष देत नाहीं यामुळें आपल्या राज्यकर्त्यांस असें वाटतें कीं चालू राज्यपद्धत निर्दोष आहे. व रयत संतुष्ट आहे किंवा रयत अज्ञान आहे परंतु आपण असें समजतों कीं राज्यकर्ते आपल्या सुखदुःखाकडे लक्ष देत नाहींत. या करितां त्यांनीं एखादें काम कितीही सद्हेतूनें केलें तथापि त्यांनीं वाईट हेतूनें केलें असा आपला साहजिक समज होतो. हल्लीं जीत आणि जेता यामध्यें प्रेमभाव नसण्याला परस्परांच्या भिन्न विचारसरणी कारण होत.

ही उणीव दूर होण्या करितां आपल्याला आपली विचारसरणि सोडून पाश्चात्य विचार सरणीस अनुसरून वागलें पाहिजे त्या शिवाय सद्गती नाहीं. आपण जर याप्रमाणें न वागू तर अंतीं आपला फार तोटा आहे. ही गोष्ट प्रत्येकानें पक्केपणीं लक्षांत ठेविली पाहिजे.

आपल्या पैकीं एखाद्या संभावित मनुष्यास कुणब्या सारख्या मतदारा कडे जाऊन "तूं मला मत दे" असें ह्मणणें फार लाजिरवाणें वाटतें. मुळीं बोर्डांत किंवा म्युनिसिपालिटींत जाण्याची खटपट करणें हेंच त्यांच्या जिवावर येतें. त्यास वाटतें कीं घरधंदा सोडून विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य कोणी करीत बसावें ? तशांत आपला मोठेपणा सोडून हलकट लोकांचीं मतें घेण्याची पाळी आली असतां त्यांच्या साहजिकच जिवावर येतें. इतकेंही करून जर का अपयश आलें तर विचारूच नका. त्यास मरणा पेक्षांही जास्त होतें. ही स्थिति प्रत्येक हिंदु मनुष्याची आहे. युरोपिअन लोकांत याहून अगदीं भिन्न स्थिति आहे. आपण निवडून यावें याकरितां हलके लोकांचे आर्जवच काय परंतु नाहीं नाहीं त्या युक्त्या करून आपआपल्यास मत मिळवितात. व इतकाही प्रयत्न करून त्यास जयप्राप्ति झाली नाहीं तर ते त्या बद्दल विषाद न मानिता दुसऱ्या वेळीं ते दुप्पट खटपट करितात. पराजयाच्या मानानें चिवटपणा हा त्यांचा नैसर्गिक गुण होऊन गेला आहे. व सांप्रत वस्तुस्थिती ज्या मानानें आपणासही तोच कित्ता गिरविला पाहिजे.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ७ शके १८२०

गेल्या गुरुवारीं पुण्याचे प्रोफेसर धोंडो केशव कर्वे बी. ए. हे आकोल्यास आले होते आणि त्यांचें व्याख्यान येथील लायब्ररींत 'अनाथबालिकाश्रम' या संस्थे संबंधानें झालें. अध्यक्षस्थानीं रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत बी. ए. एल. एल. बी. हे होते. प्रोफेसर कर्वे यांचें संभाषण नेहमीं प्रमाणें चांगलें झालें आणि त्यांचा स्वार्थत्याग पाहून कोणाच्याही मनांत त्यांच्या विषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होण्यासारखी आहे. हल्लीं गतभर्तृकांचा पुनर्विवाह सुधारणेचें मुख्य अंग बनला आहे आणि त्या दृष्टीनें हे मोठे सुधारक आहेत. परंतु पुनर्विवाहापेक्षां एका श्रेष्ठ व वर्णनीय सुधारणेकडे आपला देह झिजविण्याच्या त्यांनीं प्रयत्न चालविला आहे. गतभर्तृकांस विद्यादान द्यावें [illegible] त्यांच्या नूतन उद्योगाचा गुरुमंत्र [illegible] अनाथबालिकांचा आयुष्यक्रम विद्यमान [illegible]तींत अधिक सुखावह करावा असा विचार इंग्रजी विद्येच्या संस्कारा पासून लोकांच्या मनांत विशेष घोळूं लागला आहे. प्रो कर्वे यांनीं सांगितलें कीं पुनर्विवाह ही व्यावहारिक सुधारणा झाली पण या पेक्षां श्रेष्ठतर गोष्ट ह्मणजे अनाथ विधवांस शिक्षण देण्याची होय. त्यांस शिक्षण दिल्यानें समाजाचा मोठा फायदा होईल. या दिशेनें पुण्यास पंडिता रमाबाईनें प्रयत्न केला व 'सारदा सदन' स्थापित केलें. परंतु ह्या बाईनें सुरू केलेल्या ख्रिस्तीधर्माच्या दिक्षेमुळें ती संस्था लयास गेली. तेव्हांच 'हिंदु शारदासदन' निघालें आणि सुधारक व त्यांस मांग ओढणारे राजश्री टिळक प्रभृति धर्मसंरक्षक यांनीं या संस्थेला कांहीं रंग रूप आणिलें होतें परंतु मनुष्यांचें बळ पुरेसें न मिळाल्यामुळें ही संस्था बुडाली. अनाथ बालिकांस विद्याभ्यास शिकविण्याचा आश्रम पुण्यास नवीन निघाला आहे, बंगाल्यास बाबू शशिपाद बानर्जी यांनीं अशीच शाळा काढली आहे व मद्रासेसही रा० वीरेश लिंगम पांटलू यांच्या श्रमानें या प्रकारची संस्था चालू आहे. पुण्याच्या अनाथ बालिकाश्रमाविषयीं सांगतांना प्रो. कर्वे ह्मणाले कीं पुनर्विवाह व अनाथबालिकाशिक्षण ह्या दोन्ही गोष्टी अगदीं पृथक् ठेवा आणि त्या निरनिराळ्या माणसाकडे असतील तर विशेष फायदा होईल. पुनर्विवाहाला लोकमत विशेष अनुकूळ नाहीं आणि पुनर्विवाहाशी या नव्या आश्रमाचा कांहीं संबंध आहे असा गैरसमज झाला तरी तो देखील प्रस्तुत प्रयत्नाला फार बाधक आहे ह्मणून वरील दोन्ही गोष्टी अगदीं निरनिराळ्या समजण्या विषयीं प्रो. कर्वे यांनीं मोठ्या आग्रहानें कळविलें. दोन्ही संस्था नोंदल्या आहेत. सन १८९६ पासून १८९८ नोवेंबर पर्यंत ८६४८ रुपये वर्गणी जमली आहे.

या 'अनाथबालिकाश्रमा' च्या संस्थेचे उद्देश फार चांगले आहेत. प्रो० कर्वे ह्मणाले कीं विधवाशिक्षणांविषयीं हे नवीन प्रयोग आहेत. एकंदर अभ्यासक्रम ७ वर्षांचा असून ४ वर्षें प्राथमिक शिक्षणाकडे देऊन नंतर तीन वर्षें असें विशिष्ट शिक्षण द्यावयाचें कीं त्याच्या योगानें अनाथबालिका चांगल्या शिक्षक, पुराणिक किंवा वैद्य बनव्या

तील. स्त्रीवैद्य तयार करण्याकडे विशेष लक्ष्य पुरविण्यांत येणार आहे. चवथी गोष्ट अशी कीं ख्रिस्ती लोकांत जशा sisters of charity ह्मणून जोगिणी असतात तशा जोगिणी आपल्या अनाथ स्त्रियांत पुष्कळ निघतील. परोपकार हें त्यांचें ब्रीद होय. आपल्या अनाथ बालिकामध्यें जे अमोलिक गूण आहेत त्या मध्यें स्वार्थत्याग व धर्मबुद्धि हे दोन गूण अलौकिक आहेत. येणें प्रमाणें उद्देश सांगित या नंतर प्रो० कर्वे यांनीं मोठ्या कळवळ्यानें या नव्या संस्थेस मदत करण्याविषयीं सभ्य जनांस प्रार्थना केली आणि त्यांनीं स्वतांच्या गरिबींत १००० रुपये दिलेली वर्गणी व आयुष्याच्या विम्याचे ५००० रुपये देऊं केलेला संकल्प कळविला तेव्हां सर्व लोकांस त्यांच्या स्वार्थत्यागाची मोठी धन्यता वाटली.

त्या नंतर राजश्री भागवत यांनीं सभाविसर्जन करिताना ह्मटलें कीं ब्राह्मणवर्ग जसा आपल्या मुलांच्या शिक्षणा विषयीं जीव कीं प्राण करितो तसा सर्व जगाच्या इतिहासांत दुसरा कोणताच वर्ग आढळणार नाहीं. असें असूनही व अपत्यस्नेह मोठा वर्णनीय कोटींतला असून ही मुलींस शिक्षण देण्याविषयीं आपलें पाऊल मागें आहे याचें कारण एकच दिसतें तें असें कीं स्त्रीशिक्षणा पासून फायदा आहे असा आपला आपला पक्का निर्धार नाहीं. हा निर्धार होईल अशा विषयीं खटपट करा ह्मणजे प्रो. कर्व्यांचा उद्योग चांगला सफल होईल.

---

यांत्रिक कला शिकण्याला युरोपा पेक्षां जपान देश पुष्कळ अंशीं बरा आहे असें अलिकडे प्रत्ययास येत आहे. बाबू उमाकांत राय नांवाचे तरुण गृहस्थ टोकिओ येथें खनिज पदार्थशास्त्र शिकण्याला गेले आहेत. त्यानीं आपल्या देशबांधवाला जपानांत येऊन यांत्रिक कला शिकण्या विषयीं मोठ्या कळकळीनें विनंती केली आहे. बौद्धधर्म जपानांत चालतो. त्या धर्माची साम्यता हिंदुधर्माशीं बरीच आहे. खर्चा संबंधानें जपान देशचा प्रवास अधिक सुलभ व सुखकर आहे सरासरीनें ५०।६० रुपयांत चांगल्या प्रकारें एका विद्यार्थ्याचा विद्याभ्यास होतो. जपानी अधिकारीवर्ग देखील इंडियन लोकांस चांगल्या रितीनें वागवितात. यांत्रिक विद्या जपानांत हल्लीं वास्तव्य करितात याची साक्ष जपानची राष्ट्रीय उन्नतिच चांगली देईल. जपानानें पाश्चात्य राष्ट्रां बरोबर टिकाव धरला ही गोष्ट कांहीं सामान्य नाहीं. बाबू उमाकांत यांच्या बरोबर दोन मराठे गृहस्थ हि आहेत. यांत्रिक विद्या नेटिवांस शिकविण्या विषयीं आमचें सरकार उदासीन व तटस्थ आहे; त्या अर्थीं प्रांतोप्रांतींचें लोक कांहीं निवडक विद्यार्थी जपान देशी शिकविण्यासाठीं धाडण्याची खटपट करितील तर त्यांच्या सत्कृतीबद्दल सर्व देश त्यांचा आभारी होईल. इंडियाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याला देशी कला व देशी वस्तु यांचाच प्रसार झाला पाहिजे. बाकीच्या सर्व गोष्टी लटक्या आहेत. सध्यां हा देश श्रीमान मनुष्याप्रमाणें विलायतच्या मालाचा जबरदस्त गिऱ्हाईक आहे. सर्व लाभ व्यापाराच्या द्वारानें विलायतेला पोचतो. हा देश इतर राष्ट्राच्या द्रव्यार्जनाचें क्षेत्र आहे. निःसत्व होत होत कोणता दिवस या देशावर उगवेल हें परमेश्वराला माहित !

---

# The Berar Samachar

**MONDAY, DECEMBER 5 1898**

---

The people of Akola will feel glad to learn that at a Special General Meeting of the Municipal Committee held here on the 1st Instant a resolution was passed, fixing the time from which the newly imposed taxes on buildings, lands, vehicles and animals are to come into force. On 7th April 1898 the Committee had directed the imposition of these taxes from 1st May 1898. Accordingly assessment lists were prepared and notices published. But it has now been declared by the Municipality that the taxes will come into force not from 1st May 1898 but from 1st January 1899. The Town Fund tax however still continues to be in force. This change in the former resolution of the 7th Appril 1898 was chiefly brought about by a spirit of sympathy and a sense of justice which guided the deliberations of this civil body the other day. Had not the operation of these taxes been suspended till the beginning of the next year, the people would have been subjected to a double pressure. They have to pay the Town Fund tax and would have but for this resolution referred to above, to pay these new taxes in addition. From 1899 the Town Fund tax will stand abolished and there will then be only these new taxes as an equivalent substitute for it. A further advance was made by the committee in its liberal policy. The order by which the Resident sanctioned the new taxation, was thought to be not clear in expression. The ambiguity if any, was removed in a manner most creditable to the body and favourable to the people in general. Some were led to think that the minimum of 8 annas fixed therein implied that the Municipality was entitled and intended to receive 8 annas indiscriminately for each and every house or land the assessment on which at the rate of 7 p.c. of its annual value, would be less than 8 annas. This intention of course meant a great hardship to the poorer classes. A house or building which at the rate of 7 p. c liable to be taxed only 1 anna or 2, would have to pay 8 annas, that is to say, it would be taxed at the rate of 56 p.c or 28 p c of its annual value. The poorer classes would thus be made to pay at an enormously higher rate than the well—to—do and the richer classes. This implication therefore sounded ill and appeared objectionable in principle. The Committee therefore thought it expedient to express its meaning in clear terms and declared most unmistakably that the houses and lands the assessment on which at the rate of 7 p.c of their annual value is less than 8 annas, are not liable to the tax at all. The direct result of this is that a large section of poorer classes is exempt from taxation. This is just what the people wanted. The poorer classes always require a very lenient consideration and it is no use keeping them discontented and dissatisfied. Their taxation does not bring in any pecuniary gain worth the name, while on the contrary there is a great danger to the steady progress of municipal administration if their mischievous tendency actuated as it is by their sense of dissatisfaction, is allowed to gain ground and muster strength. The people have therefore just reasons to hail with joy the doings of the municipal body. The feeling of liberality which animated the thought and action of the members composing that popular body the other day was best shewn when a resolution was passed at the same sitting directing the collection of these taxes quarterly, half yearly or annually at the option of the tax payers. Convenience of the people and their good are the two principal objects at which municipal efforts are to be strenuously directed. So far we have treated of this subject from a popular point of view.

So far as municipal interests are concerned, the suspension of these new taxes till the 1st of January 1899 involves a loss of something like Rs. 7000. The liberal interpretation placed upon the wording of the minimum of 8 annas cuts away municipal income probably by about Rs. 2000. Bearing this deficit in mind, we request the people of Akola seriously to look about themselves and suggest means calculated to place their municipal finances on a satisfactory footing.

---

Mr. M. R. Bodas invites the reformers to overthrow the philosophy of inaction and requests them to preach by personal example:—

"The question, however, that is agitating Hindu society at present is not who talks fine precepts, but who practises them. In this respect I must admit both the orthodox and the reformers are equal sinners. As a general rule you find men of both parties professing one set of opinions and acting just the opposite. A controversy crops up only when either section assumes superior airs, and acts the mentor, or when one party accuses another of hypocrisy and the other retorts by charges of playing to the gallery. As a matter of fact the real hindrance to reform arises not from opposition of the orthodox, for opposition never kills a genuine movement, but from the inherent weakness of the reformers. Let me here quote the words of one of them, Keshav Chandra Sen, uttered in 1876 in a lecture on "Our Faith and Our Experiences":—"As we pass in review our daily experiences, how much alas! is disclosed which cannot fail to excite sorrow, remorse and self-condemnation! Charity, justice, meekness, forgiveness, veracity, philanthropy—are these virtues to be found in an eminent degree among the men of our Church? Surely we have not given India what we promised The Brahmo is not an example unto his contrymen and contrywomen."

---

## वऱ्हाड

मे. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर, आकोला यांची स्वारी खालील मुक्कामाला या आठवड्यांत जाणार आहे.

| मुक्काम. | तारीख. |
|---|---|
| आलेगांव. | ५ |
| सावरगांव. | ६ |
| [illegible]र्री. | ७ |
| वाडेगांव. | ८ |
| बाळापूर. | ९ ते १२ |
| पळशी बुद्रूक. | १३ |

मेहकर तालुक्याच्या नव्या जमाबंदीची सनावणी येत्या फेब्रुवारींत होणार आहे.

मि. क्राफर्ड कमिशनर क्याप्टन हार्सब्रो डिपुटी कमिशनर, उमरावती आणि मि. फ्रान्सिस डायरेक्टर आफ लॅंड रेकार्डस या तिघांची मुलाखत आज रोजीं कारंजा मुक्कामीं होणार असून मुर्तिजापूर तालुक्याच्या नवीन साऱ्याविषयीं विचार होणार आहे.

येथील लायब्ररीच्या आवारांत नवीन सुरू केलेल्या पोष्ट आफिसाचें काम उत्तम प्रकारें चाललें असून मनी आरडरीच्या कामाशिवाय गेल्या १ ले तारखे पासून ५०० रुपया पर्यंतची इनस्युअरन्स पारसलें घेण्याची परवानगी मिळाली आहे

रा. रा काशीनाथ श्रीराम जठार अव्वल कारकून हे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर वर्ग ३ यांस गेल्या १२ वे तारखे पासून असिस्टंट कमिशनरच्या आक्टींग नेमणुकीवर परत यावें लागलें.

---


## NOTICE

**THE FOURTEENTH INDIAN NATIONAL CONGRESS**

Will Be Held At

Hyde Park, Poonamalle Road, Madras

On the

*28th, 29th. & 30th. December*, 1898.

—:0:—

Information to Delegates.

1. Delegates are requested to communicate to the Secretaries of the Reception Committee, on or before 15th December,

(*a*). Their name and address in full.

(*b*). The place at which they were elected.

(c). The probable date of their arrival in Madras.

(*d*). Any special arrangements they wish to be made during their stay.

Delegation Fee, Rs. 10.

*BOARD AND LODGING*

For those who live in Hindu fashion Rs. 5 for the Session.

For those who live in European fashion, Rs. 5 per day.

*Information to Visitors.*

ADMISSION BY TICKETS

| | | |
|---|---|---|
| Reserved Tickets | Rs. | 10 |
| Ordinary Tickets | ,, | 5 |
| Ladies' Tickets | ,, | 3 |

---

## नोटीस

बाल्या वल्लद राणू सोनार राहणार नांदुरा तालुका मलकापूर यांस

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझी लग्नाची बायको नामे देवकाई इनें मजपासून पोटापाण्याच्या खर्चाच्या निमित्तानें १८९४ पासून एकंदर रुपये २०० दोनशे कर्जाऊ घेतले. त्या रकमेची फेड व्याजा सुद्धां करण्याविषयीं आह्मी तुह्मास वारंवार ह्मटलें परंतु तुह्मी अद्याप कर्जाचा निकाल केला नाहीं. तर ही नोटीस पोचल्या दिवसा पासून आठ दिवसांचे आंत सदर्हू रुपये २०० व त्यावरील व्याज. मिळून सर्व रक्कम माझी मला पोचती करावी; नाहीं तर तें जर्क वसूल करण्याची व्यवस्था कोर्ट मार्फत केली जाईल. कळावें तारीख ३ दिसेंबर १८९८ इसवी.

सही

तुकाराम राघोजी सोनार राहणार पंचगव्हाण तालुका आकोट

दस्तुर खुद्द.


---

## वर्तमानसार

डिपुटी कलेक्टर मि. री. रंगर व यांनां कामांतून एकदम दूर केल्याचें हिंदु वरून समजतें. यांच्याकडे दुसऱ्या एका डिहिव्जनचें जमाबंदीचें काम सोंपाविलें होतें, तें काम करण्याचें त्यांणी नाकारलें. एवढ्यावरून यांच्यावर आज्ञाभंग केल्याचा मोठा ठेऊन कामांतून कमी केलें.

विलायंतस छत्र्यांचा विमा उतरणारी मंडळी स्थापन झाली झाली आहे ! ज्याची छत्री चोरीस जाईल त्यानें चोरीची खात्री केली तर छत्रीचा दाम त्याला मिळतो.

रात्रंदिवस दुसऱ्याची ओळख करण्यांत काळ घालविण्या पेक्षां आपल्या स्वतःची ओळख करून घ्यावी हें चांगलें.

स्त्रीस पोटगी द्यावी असा माजिस्त्रेटानीं ठराव केल्यावर दिवाणी कोर्टांत नवऱ्यानें आपल्या स्त्रीचें नांदणुकी संबंधानें दावा मिळविला असेल व स्त्री जर नांदण्याला नाकारील तर माजिस्त्रेटाचा ठराव अमलांत येणार नाहीं. ह्मणजे पोटगी नवऱ्यानें देण्यास कारण नाहीं असा मुंबई हायकोर्टांत एक निकाल झाला आहे. इकडे बायकांनीं लक्ष द्यावें.

अगदीं नवा शोध—एका पाश्चिमात्य चतुर मार्मिक न्हाव्यानें अगदीं स्वानुभावानें असें शोधून काढलें आहे कीं—मनुष्य बहुधा ज्या बाजूवर निजतो त्याच्या दुसऱ्या बाजूच्या मिशा लांब असतात. ज्या बाजूची मिशी लांब असेल तिजवरून तो मनुष्य कोणत्या बाजूवर निजतो हें सहज सांगतां येतें. मिशा दोन्ही बाजूच्या सारख्या कधींही नसतात असें त्यांचें ह्मणणें आहे. एका बाजूची मिशी लहान व एका बाजूची मिशी मोठी अशा असतात. घा० वृ०

आग्रा म्युनिसिपालिटीच्या जमाखर्चाची पद्धती बरोबर राखिली जात नाहीं असें त्या प्रांताचे सरकाराला दिसून आल्यावरून ती सुधारण्यास लायक असा आमच्या विश्वासाचा सेक्रेटरी तुह्मी नेमा नाहीं तर तुमचें स्थानिक स्वराज्याचें काम तुह्मापासून आह्मी वाटेल तितके दिवस काढून घेऊं असें त्या सरकारनें तिच्या सभासदांना कळविलें आहे.

चालूं सालाबद्दल वऱ्हाडच्या उत्पन्नापैकीं ब्रिटिश सरकाराकडून निझाम साहेबांना द्यावयाची एकंदर बाकी दहा लक्ष रुपये फिरेल असा अंदाज असून ती रक्कम त्यानां मे मध्यें दिली जाईल असें दिसतें.

आसामप्रांतामध्यें आलीकडे कोळशाच्या मोठ्या खाणी प्रमाणेंच केरोसीन तेलाच्याही बऱ्याच मोठ्या खाणी लागत चालल्या आहेत आणि त्या प्रांताचे हे दोन्ही धंदे चहाच्या मळ्या सारखेच युरोपिअन लोकांकडून लवकर भरावले जातील असें दिसतें. ज्ञा० सू०

चमत्कारः—गेल्या महिन्याच्या २६ वे तारखेस श्री क्षेत्र काशी येथें मिसेस आनी बिझांट बाईचें थिआसाफिकल सोसायटी संबंधाची व्याख्यान झालें त्यावेळीं एका हिंदु सन्याशानें पेटलेल्या अग्निकुंडावरून अनवाणी पायांनीं मंत्रबळानें चालण्याचा प्रयोग करून दाखविला. सदरी कुंड १४ फूट लांब, ९ फूट रुंद आणि ३½ फूट खोल असून, त्यांत रखरखीत विस्तव तयार करून ठेवला होता. त्याचें तेज इतकें प्रखर होतें कीं, पाहण्याकरितां जमलेले लोकांस तीन यार्डाचें आंत उभें राहतां येण्यासारखें नव्हतें. प्रथम सदरी बोवाचे लोकांनीं अग्निची पूजा केली व त्या कुंडा भोंवती तीन प्रदक्षिणा घातल्या व कांहीं मंत्र ह्मटल्या नंतर अग्नि शांत झाला आहे असें सांगितलें व १० मिनिटे पर्यंत ज्यांची इच्छा असेल त्यांनीं कुंडांतून बिनधोक चालत जावें असें कळविलें. प्रथमतः बोवाचें अनुयायांपैकीं कांहीं लोक त्या कुंडावरून आनंदानें नाचत गेले. या लोकांत कांहीं मुलेंही होतीं. हा चमत्कार पाहून जवळ उभें असणार लोकांस वाटलें कीं, हे लोक भांगेचे कैफानें धुंद झाले असून त्यांचे पायांचे तळव्यांस कांहीं तरी औषधी वनस्पतीचा रस लाविला असावा. अखेर ही कल्पना खोटी ठरली आणि कुंडावरून चालणारे लोकांची एकसारखी माळ लागली. बाबु हिरालाल बानरजी नांवाचे गृहस्थ त्या ठिकाणीं हजर असून ते एका इंग्रजी पत्रास लिहितात कीं हा अद्भुत चमत्कार पाहून मलाही विस्तवावरून चालण्याची स्फूर्ती झाली. त्याप्रमाणें मी बूट स्टाकिंग काढून टाकून कुंडावरून कांहीं एक इजा न होता चालत गेलों. माझे पाय विस्तवांत बुडूत होते आणि मला असें वाटलें कीं, जणूकाय मी तापलेल्या वालुकामय भूमीवरून चाललों आहे. हा चमत्कार सुमारें दहा मिनिटे चालला होता, पण तेवढ्या वेळांत हजारो लोक त्या विस्तवावरून चालत गेले. कांहीं लोक तीन तीन चार चार वेळां चालत गेले. हा चमत्कार पाहण्यास मोठमोठे युरोपिअन लोकही हजर होते व त्यांनींही फार आश्चर्य केलें. कांहीं युरोपिअन लोकांनीं सदरी बुवाचे पाय तपासून पाहिले तर त्यांस मुळींच इजा झालेली नव्हती.

आमचे जिल्ह्यांतही मोहोळगांवीं दरसाल तेथील देवांचे उत्सवाचे वेळेस असाच चमत्कार होत असतो, हें पुष्कळांच्या ऐकिवांत असेल.

यावर आमचे आधुनिक विद्वान काय काय कल्पना चालवितात पहावें.

पाश्चूर इन्स्टिटयूटः—वेडें कुत्रें चावलें असतां दुरुस्त करण्याचा दवाखाना फ्रान्सांत आहे, त्याला पाश्चूर इन्स्टिटयूट ह्मणतात. असलें विष अनेक जनावरांवर प्रयोग करीत माणसांवर लस टोंचण्या साठीं घेण्याचा प्रयत्न अशा दवाखान्यांत चालतो. तो दवाखाना सहा महिन्यांच्या आंत खुला करण्याचा हुकूम खुद्द निजाम सरकारांनीं सोडल्याचें वर्तमान बाहेर आलें. इंग्रज सरकारचे कांहीं सोल्जर गेल्या सालीं फ्रान्सांतील या दवाखान्यासाठीं पाठविले होते व माणसीं खर्च हिंदुस्थान सरकारास १०,००० आला ह्मणतात. तेव्हां एवढा खर्च करण्याच्या ऐवजीं एखादें इन्स्टिटयूट येथेंच सुरू करावें असा सरकारचा मानस होता. पण स्वतः खर्च न करितां परभारें काम भागविण्याची सरकारनें शक्कल योजिली असावी असें दिसतें. दक्षिणेंत निजाम सरकार व उत्तरेस इतर संस्थानिक यांच्याकडून हें काम सरकार परभारें करविणार काय? क० त०

पुण्याहून बाहेरगांवी जाणारांस प्लेगअधिकाऱ्याकडून पास मिळाल्यावांचून आगगाडीचें तिकिट मिळत नसे; परंतु गेल्या आठवड्यांत रेल्वेवरच्या अधिकाऱ्यांनीं पासाची पर्वा न करितां तिकिटें देण्याचा क्रम चालू केला आहे, त्यामुळें तूर्त बाहेरगांवीं जाणारांची एका विघ्नांतून मुक्तता झाली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. पुण्यास केव्हांही प्रकारचा संसर्गजन्य रोग नसतां येथील जाणारास पासावांचून रेल्वेमार्गानें जातां येऊं नये हें विलक्षणच होतें; परंतु येथील विद्वान् अधिकाऱ्यांस त्याच्या योगानें मोठा बंदोबस्त होतो, असा भ्रम होता, त्यामुळें सरकारी ठरावास धाब्यावर बसवून पुण्यास येणारास आंघोळी घालतात त्याचप्रमाणें हाही प्रकार दडपून चालविला होता. शेवटीं रेल्वेकंपनीच्या धैर्यामुळें तो बंद झाला ही लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. आंघोळीच्या बाबदींत ही एखादा जबरदस्त माणसाची गांठ पडून बंदोबस्त व्हावा असें आह्मीं इच्छितों मागें एकवेळ वस्त्रहीन स्नानाबद्दल बंदोबस्त करण्याचें डा० रीड यांनीं अभिवचन दिलें होतें, व कित्येक दिवस तें बंदही तरी आतां पुनः पुरुषांच्या स्नानाच्या जागीं तरी त्या बाबदींत कांहीं फेरफार झाल्याचें दिसत नाहीं, ही दिलगीरीची गोष्ट आहे. प्लेग अधिकाऱ्यांचें तिकडे लक्ष्य जाईल अशी आशा आहे. डा० रीड व इतर अधिकारी, लोकांच्या सलोख्यानेंच काम करीत आहेत, त्यामुळें कडक नियमांनीं व्हावा तितका त्रास होत नाहीं, हें खरें आहे; शिवाय शेजारच्या स्टेशनावर पायरस्त्यांन जाऊन किंवा उतरून सर्वच त्रास मिटवावयाचा राजमार्ग खुला आहे, यामुळें अगदीं अनोळखी किंवा गैर माहीत मनुष्यास मात्र त्रास होतो, हेंही खरें आहे, तथापि, सरकारी ठरावा प्रमाणें रीत बदलावयाची अवश्यकता डा० रीड प्रभृतींच्या पुढें आणिल्यावाचून आमच्यानें रहावत नाहीं. सु.

पंजाबांतील ज्यायंट ज्यज्य गुरुदयालसिंग यांनां कामांतून दूर केल्याचें वाचकांनां विदीत आहेच. आतां ह्यांजवर खटला करण्याला सरकारानें स्यांग्सन दिल्याचें समजतें. आणखी असें ही ऐकण्यांत आहे कीं, सरदार गुरुदयाळसिंग हे हिंदुस्थानांत नसून विलायतेस गेले आहेत. तिकडे ते पुढील कांहीं प्रयत्नाकरितां गेले आहेत. तिकडे ते पुढील कांहीं प्रयत्नाकरितां गेले असतील असें वाटतें.

विलायतेस मि. बर्डउड यांणीं एका शास्त्रीय मंडळी पुढें गांठीच्या तापावर एक निबंध वाचून दाखविला. त्यांतील थोडीशी माहिती आह्मी वाचकानां देतों:— बासिलि नांवाच्या कृमि पासून या तापाची उत्पत्ती आहे. हे कृमि इतके सूक्ष्म आहेत कीं, त्यांची लांबी एका इंचाचे सहस्त्रांश आहे आणि रुंदी एक पंचवीस हजारांश इंच आहे! ह्मणून तर हे मोठ्या दुर्बिणीवांचून दिसत नाहींत. यांचा आकार वाटोळ्या टोंकाच्या दांडक्या सारखा आहे. यांनां चांगलें खाद्य मिळालें ह्मणजे ह्यांची वाढ फार जलद होते. मांसरस आणि बटाटे यांवर यांची फारच जलद वाढ होते. प्राण्याचे रक्तद्रवांत यांची वृद्धी होण्याची तऱ्हा अशी आहे कीं, प्रत्येक कृमी प्रथम थोडा लांब होतो, नंतर एकाचे दोन, दोहोंचे चार अशा गणित श्रेढीनें वाढ होते. पोषक द्रव्य संपलें ह्मणजे त्यांची वाढ संपते, तथापि ते एकदम मरतात असें नाहीं. कैक वर्षे नुस्ता प्राण धरून राहतात. उघडी हवा त्यांना काळा सारखी आहे. त्या हवेंत ते फार दिवस टिकत नाहींत, सात आठ दिवसांत त्यांचा फडशा उडतो रोगी मनुष्याचे शरीरांतून निघून हे हवेंत धुरळ्या सारखे तरंगत असतात. परंतु मोकळ्या हवेनें व प्रकाशानें हे क्षीण होऊन एक दोन दिवसांतच मरतात. ओलसर जागेंत आणि कोंडलेल्या हवेंत या किड्यांना चरायला खुशाल सापडतें. उंदरावर प्रथम याची धाड पडते, मागून मनुष्याचा संहार होतो. धा वृ.

## जाहिरात

मी केंब्रीज कालेजांतून पास होऊन आलों नाहीं ह्मणून माझे औषधाकडे कोणी लक्ष्य देणार नाहींत काय? नामधारी डाक्टर लोकांनीं हात टेकले ह्मणजे औषधच नसतें कां? आज १८ शेंवर रोगी नीट झाले तिकडे कोणी लक्ष्य देणार नाहींत का! हा माझा लेख कलेक्टर साहेब, पोलिस सुपरिन्टेंडेंट साहेब, नामदार गव्हरनर साहेबाचे सेक्रेटरी आपआपल्या अंमलदारापुढें आणतील काय? माझे ह्मणणें खरें कीं खोटें याचा विचार सरकार व संस्थानिक करतील कां? अगदीं अनुभवानें कळवितो कीं—संन्निपात नाशाच्या वनस्पतीच्या मुळ्या मजजवळ आहेत ती मुळी जवळ बाळगल्यानें सांसर्गिक रोग ब्युबानीक प्लेग होत नाहीं, यदा कदाचित् दुर्दैवानें झालाच तर मनुष्य मरणार नाहीं. १६ मुळ्यांस १ रुपया. प्लेगवरील वनस्पतीचें औषध डबीस रुपये २ ( गांठीवर लावण्याचें व पोटांतील ). धारवाडांत प्लेग फार आहे तर तेथील अंमलदार कलेक्टर साहेब स्वतःस बोलावून उपचार करण्याची परवानगी देतील काय? ३० दिवसांत प्लेग हटविण्याची हमी घेतों. मुळ्या व औषधी विकण्याकरितां मुंबई व इतर ठिकाणीं दुकानदार किंवा इतर एजंट मिळतील काय!

सरकारास विनंती.

औषधी अनुभवून पहावी. खरी असेल तर त्या प्रमाणें विचार व्हावा, [illegible] असल्यास बंद करावें. औषधाचा [illegible]शीं संबंध असतो.

ता० ९।१०।९८.

वैद्य-जयसिंगराव रामचंद्र,
मुक्काम-पोस्ट केळवे माहीम.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ..........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line.,,3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXII AKOLA MONDAY 12 DECEMBER 1898 NO 48

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख १२ माहे डिसेंबर सन १८९८ इ० अंक ४८

### जाहिरात

#### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेविंग बॅंक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुले १८९८ } A. G. Watson Agent.

---

### विक्रीस तयार.

SAPKAR'S DIARY
FOR 1899.
WITH
A CALAENDAR FOR 1900

#### सापकरांची रोजनिशी, सन १८९९ सालाकरितां.

हींत मराठी तिथी, वार, महिने, सुर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौंजीविवाहाचे मुहूर्त, इग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र स्टांप, मनीआर्डर, पोस्ट, मुंबई बॅंकेच्या रूढी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा. विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टॅंप, कोर्टफी, पोलिस गाईड डिस्ट्रिक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जोडलीं आहेत.

रोजनिशीची किंमत.

प्रत नंबर १.... .... ....८१२ ०२
प्रत नंबर २.... .... ....०८ ८१॥
प्रत नंबर ३.... .... ....०७ ८१

किंमतीबद्दल रोख पैसे आह्माकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

---

नवीन.

### क्रिमिनल प्रोसीजर कोड.

#### सन १८९८ चा आक्ट ५.

सटीक. ( आवृत्ति ४ थी. )

चारी हायकोर्टांचे निवाडे, मुंबई हायकोर्टानें केलेले वटहुकूम व विशेष समजुतीच्या टिपा आणि खेरीज जरूर लागणारे फौजदारी आक्ट सुमारे १४ यांसह छापत आहे. सन १८९९ सालचें मार्च अखेर तयार होईल ता० १५ जानेवारी सन १८९९ चे आंत आगाऊ किंमत भरणारास किंवा व्ह्याल्युपेएबलनें मागविणारास टपाल खर्च सुद्धां रुपये ५ पडतील. मागाहून घेणारास टपाल हांशील सुद्धां रुपये ७ पडतील.

पुणें न्यायाश्रय आफीस. ता० १०।११।९८

नरहरराव त्रिंबक राजमाचीकर.
शिवराम हरी साठे

---

### नोटीस.

नोटीस बेशमी आकाजी वल्लद धर्माजी धनगर राहणार मौजे गावडगांव खुर्द तालुके दर्यापूर. यांसः-

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मौजे इटकी तालुके दर्यापूर येथील तुमचे नांवें असलेले निशाणी रोड्याचे चिंचवाले शेंत नऊ तिफणचे आहे त्यांत तुमचा निमे हिस्सा आहे तो तुह्मी सुमारे पंधरा दिवस झाले रुपये १२७५ पावणे तेराशे रुपयास खेरदी देऊन इसाऱ्या बद्दल मजपासून रुपये दोन व चांदीचे कडे दोन वजन तोळे १२ चे एक व १५ पंधराचे एक असें तुह्मास दिले व तुह्मी पंधरा दिवसानीं खेरदी खत करून देईन असा करार केला त्या प्रमाणें तारीख ५ दिसेंबर सन १८९८ रोजी दर्यापूर येथें आले नंतर खेरदी खताबद्दल ह्मटले असतां चार लोकां समक्ष सांगितले कीं आज मी एकटा आलो आहे. सबब उदईक येऊन खेरदीखत करून देईन अशा बद्दल वचन दिले परंतु तुह्मी आले नाहींत सबब नोटिसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आत दर्यापुरास येऊन खेरदी खत करून द्यावे व रुपये घेऊन जावे तसे न केल्यास दस्तऐवज करून घेण्या बद्दल तुमचेवर दावा करणें भाग पडेल व या नोटिसीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल कळावे, तारीख. ६-१२-९८ इसवी.

( सही )

निशानी बायजाई मर्द राजारामजी उंबरकर राहणार इटकी इचे हातची असे.

निशानी गंगाई मर्द सोनाजी गावडे राहणार इटकी इचे हातची असे.

---

### नोटीस.

सेखहबीब वल्लद सेख छोटु राहणार उमरावती यांस

आकोल्याहून सलीमखान दाऊतखान सौदागर याचा सलाम दिगर विनंती कीं:—

तुमचे बापाचे वडील भाऊ बापुभाई आणि बालाभाई यांनीं तारीख ७।११।९८ रोजीं आह्मास खेरदीखत करून दिले त्यांत खाली लिहिलेले चार शेते ९०० रुपयास आह्मास खेरदी दिली.

शेताचे वर्णन.

| | ए. गुं. | आ. रु. |
|---|---|---|
| मौजे आळंद येथील सर्वे नंबर ३५. | १७०१८ | २६ |
| मौजे नायगांव येथील सर्वे नंबर. २३ | १४८३९ | २९ |
| मौजे रुस्तुमाबद येथील ११ पैकी | ११८१९ | १५ |
| २८ | १४८३ | १६ |
| ४ | | |

पुढें खेरदीचे अन्वये सदर्हू शेते तुमचे चुलत्यांनीं आमचे ताब्यांत दिली व तेंव्हां पासून आज १७ वर्षे चारी शेते आमचे ताब्यांत असून त्यांचे उत्पन्न आह्मी घेत असतो.

सदरहू शेतें खेरदी दिली त्या वेळी तुमचा चुलता बालाभाई याच्या नांवानें होती ती त्यानें आमचे नांवे करून द्यावयाची परंतु खेरदीखत झाल्यावर तो कोठे निघून गेला त्याचा पत्ता नव्हतां. कांहीं दिवसापूर्वी आह्मास असें कळून आले कीं सदर्हू सेते बालाभाई यानें राजीनामा देऊन तुमचे नांवानें सरकारी कागदांत लाऊन दिली व ती शेते हल्लीं तुमचे नावावर आहेत त्यावरून राजीनामा कबुलायतीच्या आह्मी नकला घेतल्या त्यावरून असें दिसून आलेकीं सदर्हू शेते तुमचे नांवावर सन १८९२ सालीं झाली.

सबब तुह्मास विनंती करितों कीं सदरहू शेते आमचे मालकीची आहेत यासाठीं याचा राजीनामा देऊन ती आमचे नांवें सरकारी कागदांत लाऊन देण्याची तुह्मी तजवीज करावी असें न करणें असल्यास व शेतावर आपला हक्क तुह्मास दाखविणें असल्यास त्याबद्दल आह्मास लिहून कळवावे व तुमचे चुलते कोठें आहेत त्याचा पत्ता आह्मास लिहावा. तारीख ७।१२।९८ इसवी.

सही

सही ( उर्दूत ) सलीमखा दाऊदखा सवदागर दस्तुर खुद्द.

---

### ॥ श्रीर्जयतितराम् ॥

#### — मंत्र रामायण नं ७

#### —अयोध्या कांड—

इतक्या लहान वयांत स्वोन्नतकुलाचा अभिमान येण्या पुरतें शिक्षण त्यावेळेला होतें असें वाटतें व ह्मणूनच बालभावाला अनुचित परंतु गंभीर असे शद्ब रामाचे तोंडून निघाले.

हा राज्यभार धारा भरतें घ्यावा शिरीं,
जरी श्रमहीः।
पितृ सत्य त्राणास्तव, मी सेवावी सुखें
अरण्यमही ॥

नीतिचीं पुस्तकें शिक्षण क्रमामध्यें वाढवून आमची बिघडलेली नीति सुधारण्याचा उद्योग व्हावा असें आज पुष्कळ दिवस वाटत आहे लहान मुलांच्या 'कोमल तरुतुल्य' बुद्धीवर याचा कांहींच परिणाम घडावयाचा नाहीं हें ह्मणणें बरेंच धाडसाचें काम आहे परंतु विशिष्ट संस्कार आमच्या धुरीण ह्मणविणाऱ्या विद्वज्जनांच्या कृतीवर पुष्कळ अवलंबून आहे. भगवद्गीतेंत श्रीकृष्णानें ह्मटलें आहे कीं:-

मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः

या भगवदुक्तीचें बीज तरी हेंच आहे असें दिसतें. मनुष्य प्राणी अनुकरणशील फार व ह्मणूनच सद्वृत्तजनांचे सांचे जसे त्याचे पुढें असतील तशा त्यांतून पुढें मूर्ती उद्भवतील. आमच्या हिंदुस्थानांतील सांचा पहावयाचा असल्यास त्याचा एक मासला खालीं देतो. मुंबई येथील विश्वविद्यालयाचे उपाध्यक्ष विद्वद्वर्य डा० रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे होते. पदवीदान समारंभाचे वेळीं उपाध्यक्ष या नात्यानें बहुत सुरस व बोधप्रचुर असें यांचें एक एकदां भाषण झालें. त्या भाषणाचा सार संग्रह जर आमच्या भावी संततीनें केला तर ती कोणत्या प्रकारची निपजेल याची कल्पना तो वक्तृत्वामोघौघ ज्यांच्या दृष्टीस पडला असेल त्यास चांगली झाली असेल. हा उपदेश एकदा हृदयपट्टावर बाणला रे बाणलाकीं आचंद्रदिवाकरी आमचे प्रभु अत्यंत दयाशील व नयशील इंग्रज सरकार व आह्मी राजनिष्टेनें ओथंबलेली त्यांची प्रजा चिरंतन सौख्यसिंधूंत केवळ पोहत राहूं. असो परंतु हा माझा विषय नव्हे. सुशिक्षणाचा एक मासला दाखविला येवढेंच.

इतकें सर्व झाल्यावर रामानें हा वृत्तांत आपल्या मातेस निवेदन केला. कौसल्या पट्टराणी खरी परंतु राम माता येव्हढ्यानेंच दशरथ राजाची आलिकडे आलिकडे प्रीति जडली असावी, येरव्ही राजाचा सर्व ओढा कैकेयीकडे होता हें तीस ठाऊक होतें व ह्मणूनच पुत्र वियोगाच्या प्रथम भरांत.

मजही समार्गेंभ ने, तुजवांचुनि ही पुरी
मला कारा।

ही असमंजसपणाची पण साहजिक उक्ति तिच्या तोंडांतून निघून गेली. परंतु रामानें लागलीच

जननि ! उपेक्षू नको पिता माझा।
कैकेयी शद्ब शरक्षत मद्विरहविकल हा राजा

हा राजा ॥

इत्यादि सौम्य परंतु दृढ निश्चय द्योतक शब्दांनी, या काठिण प्रसंगीं राजाचें मन स्थिर करणें हेंच तिचें खरें कर्तव्य असें सुचविलें; व लागलीच आपली भार्या व कनिष्ट बंधु लक्ष्मण यासह वनाची वाट धरिली हें वर्तमान सुमंत्र नामक मंत्री राजास सांगावयास गेला व त्यानेंही कैकेयींचें समाधान करण्याची आपल्या हातून होईल तितकी कमाल करून पाहिली, परंतु व्यर्थ. उलटा तिनें वनांत जाणाऱ्या रामास एक निरोप पाठविला तो तिचा स्वभाव पूर्णपणें लक्षांत येण्यास कारण होतो:—

'तुज वनवास बरा कीं ताताला नरकवास' हे अदया। निर्लज्ज कैकेयी रामासि पुसे महा दृषद् हृदया.

हा आपल्या लाडकीचा पाषाणापेक्षां परुषतर निरोप ऐकून किंचित् सावध झालेला राजा

'हाय' म्हणे 'बायको नव्हे कृत्या।
काय करूं ! जाय वना बा ! यश जोडी
करूनि सत्कृत्या ॥

येव्हडा पराक्रमी राजा परंतु काय करणार! त्यास आपल्या निर्दय कलत्रास शिक्षा करितां आली नसती असें नाहीं परंतु एकदा दिलेलें वचन परत घ्यावयाचेंच नाहीं हें सत्यसंध भानुवंशीय नृपतींचें ब्रीदच पडलें. एका कवीनें साधु शब्दाची अशी व्याख्या केली आहे.

यथा चित्तं तथा वाचो यथा वाचस्तथा
क्रियाः।
चित्ते वाचि क्रियायांच साधूना मेक
रूपता ॥ १ ॥

आमच्या देशांतील अलीकडील साधू फारच निराळे आहेत. यांचा या श्लोकाचा पाठांतरच कांहीं निराळा आहे.

यथा चित्तं तथा सा वाक् स्वेपूंडपिहि
न दृश्यते।
उच्यतां यन्मुखे याति दृश्यतां
नेकरूपता ॥ २ ॥

वरच्या प्रकारचे साधूंची मात्र रेलचेल आहे. समाजाचे अवस्थांतर व्हावयास लागलें म्हणजे नीतीचेंही अवस्थांतर होत असल्यास न कळे.

कैकेयीस तर आपण खरोखरच कांहीं मोठें सत्कृत्य केलें असें वाटून राजानें आपणास 'कृत्या' म्हटलें त्याची सार्थकतां तत्क्षणींच करून दाखविण्यासच कीं काय ती म्हणाली.

तों राक्षसी तशी ते रामाते वल्कलें
म्हणे धरणें।
चवदा वर्षे विपिनीं राहुनिया आत्मतात
उद्धरणें ॥

(पुढें चालूं)

## वैद्यकीच्या शिक्षणाची अवश्यकता

(आमच्या एका मित्राकडून)

आज बरेच दिवस झाले, येथें व दुसऱ्या ठिकाणींही कित्येक सन्माननीय मित्र प्रौढ वयाच्या भगिनी करितां एखादा वर्ग काढण्या विषयीं निवापाड श्रम करीत आहेत. आतां या खटपटीस यश येणें अथवा न येणें हें सर्व आमच्यां विद्वान, श्रीमंत व गरीब मित्रां वर कमी अधिक प्रमाणानें अवलंबून आहे. सध्यां लोकाश्रयाची फार उणीव आहे व वऱ्हाडकर बांधव ही राहूं देणार नाहींत अशी उमेदही आहे. कारण, संसारशकट चालावा, मध्येंच मोडून पडण्याची पाळी येऊं नये, आयुष्क्रम सुखाचा जावा, कांहीं एक न्यून पडता कामाचें नाहीं, अशी नर मनांत इच्छा धरावयाची असली तर ती सफल होण्यास ज्या प्रमाणानें शिक्षण मनुष्यांस देणें इष्ट त्याचप्रमाणानें स्त्रियांस ज्ञानसंपन्न करणें अगत्याचें आहे, असें आतां बहुतेक ठरल्या सारखेंच आहे. ह्या कार्या करितां आमच्या उदार सरकारानें सर्व सोयीही करून ठेविल्या आहेत. साधारण लिहिणें वाचणें ज्यांस येतें असा बराच विद्यार्थिनीसमूहही, प्रतिवार्षिक परीक्षांत उत्तीर्ण होऊन तयार होत आहे. साधारणतः पाहिलें असतां, असली स्थिती समाधानकारक आहे खरी. परंतु, यशःसिद्धीच्या द्वाराची किल्ली अद्याप हस्तगत झाली असें म्हणण्यास सबळ पुरावा आहे असें ही वाटत नाहीं. कारण, एकदां विद्यार्थिनी तीन चार इयत्तां पर्यंतचें शिक्षण मिळून शाळां बाहेर पडल्या कीं लागलीच विवाहाची वेळा पुढें येते. रूढीच्या शृंखला जरी दिवसेंदिवस सैल होत चालल्या आहेत तरी अझून मुलींच्या लग्न-कालाची समाधानकारक इयत्ता ठरली नाहीं आणि ह्यामुळें एकदां लग्न झालें कीं त्यांच्या श्वश्रूगृहवास सुरू होतो. बरें, तेथें त्यांचें शिक्षण पुढें चालूं राहण्याची कांहीं आशा असते कां ? छेः फारच थोडी—किंबहुना ? फारच थोडी म्हणजे मुळींच नाहीं ! अगदीं लहान वयांत—ज्या वेळीं उडण्या खेळण्यांत, हसण्या फिरण्यांत किंवा शिक्षणांत अगर व्यायामांत त्यांचें बाळपण जाणें युक्त असतें—त्यांजवर लहान सहान गृहकृत्यें करण्याच्या जबाबदारींचा अम्मल सुरू होण्यास प्रारंभ होतो! कित्येक ठिकाणीं तर असला शोचनीय व घाणेरडा प्रकार सुरू होतो कीं लेखकास तो येथें स्पष्टपणें प्रदर्शित करण्यास पराकाष्टेचें वाईट वाटतें व आपण अशा समाजांतील एक व्यक्ती आहोंत हें पाहून लाजही वाटते! शिवाय, ह्यावरही आणखी कडी करण्या सारखी दुसरी गोष्ट आहे. ती सासुसुनांचें न पटणें या शिवाय कोणती असणार ? अशा स्थितींत बिचाऱ्या मुलींच्या आयुष्याचा लय झाल्यास पुढें त्या राष्ट्रमाता होऊन सुधारणा होण्याचा आशा तंतु राहतो कोठें? असला प्रकार खरोखरच निंद्य ! फारच निंद्य ! ! आतां यावरून आमचें असें म्हणणें नाहीं कीं सर्वत्रच अशा तऱ्हेचा दुःखद प्रकार घडतो. कांहीं कांहीं चांगली उदाहरणें अपवादा दाखल देतां येतील पण तीं किती? शेंकडा पांचच ना ! हाय ! हाय ! अवशिष्ट रूढीचा व जनलज्जेचा आणि मानसिक धैर्याच्या कमतरतेचा अखंड सगनला जाणारा लोखंडी पट्टा तोडण्याचा अझून कोणीच प्रयत्न करीत नाहींत काय ? खरोखर, कांहींजण करितात. परंतु अशाची इष्ट संख्या असावी तेवढी नाही. तथापि, असें आपण गृहित धरून चालूं कीं ही संख्या बरीच वाढली आहे, तर पुढचें कर्तव्य कोणतें ! जास्त काळपर्यंत शिक्षण देण्यानें ? कोणत्या पद्धतीवर ? सध्यांच्या ! छेः खचित नाहीं. तर कसें? अर्थात् असें कीं जेणेंकरून पुढचा आयुष्यक्रम त्यांचा अत्यंत सुखाचा होईल. नुस्तें लिहिणें वाचणें शिकवूनच भागावयाचें नाहीं. यांस, दुसऱ्याच तऱ्हेचें शिक्षण देणें इष्ट आहे. कोणतें? सध्यां कांहीं ठिकाणीं शिवण काम, नक्षीकाम किंवा दुसरीं कलाकुसरीचीं कामें शिकवण्यांत येतात. अशा प्रकारचें? याचें उत्तर 'होय,' हें तर खरेंच, पण शिक्षणाच्या जिन्याची ही दुसरी पायरी आहे. आणि हिच्या अगोदरची आणखी एक आहे, तीवर जाण्याची योग्यता आणून देईल असें एक आणखी शिक्षण मिळणें जरूरीचें आहे. तें कोणतें म्हणाल तर, पाकनिष्पत्ती, मुलांबाळांचें संगोपन. गृहकार्यदक्षता किंवा वैद्यकी असल्या विषयांशीं त्यांचा परिचय करून देणें हें होय. कारण अगोदर ज्याची अत्यंत जरूरी आहे, असें शिक्षण आतां सांगितलेलें हेंच. समजा, एखादी बाई शिवण कामांत किंवा दुसऱ्या अन्यकार्यांत अत्यंत कुशल आहे पण तिला नीट स्वयंपाक करिता येत नाहीं, तर काम करून थकून आलेल्या आपल्या नवऱ्याचें, उत्तम शिजविलेलें किंवा थोड्याच उपलब्ध साधनांत रुचकर केलेलें अन्न त्यांला वाढून, समाधान करणें शक्य आहे काय? खचित नाहीं. अथवा आपल्या घरीं कोणी परकी मनुष्य आला असतां त्याचें आदरातिथ्य कसें ठेवावें हें तिला अवगत नाहीं, तर त्याचें मन दुःखित होण्याचा एखादे प्रसंगीं संभव नाहीं काय? किंवा जर मुलाच्या पोटांत दुःखत असलें व तें रडत असलें तर 'मेल्यानें उगीच रें रें लावली आहे' असें म्हणून आदळून देऊन दुसऱ्या कामाला लागल्यास वैद्यकीय विषयाच्या अपरिचयामुळें मुलास अपाय होणार नाहीं काय? या सर्व शंकांचें उत्तर 'होय' असें एकच येईल. तर मग हें साधारण ठरलें असें समजूं कीं, पाकनिष्पत्त्यादि विषयांचें शिक्षण प्रथम दिलें पाहिजे, आणि नंतर दुसऱ्या तऱ्हेचें. परंतु अद्याप एक गोष्ट सांगावयाची राहिलीच. या सर्व प्रकारच्या शिक्षणांत फारच महत्वाचें शिक्षण जी वैद्यकीय माहिती, ती जास्त देणें श्रेयस्कर आहे. जर आमच्या भगिनी डाक्टर बनल्या तर आमच्या हिंदुस्थानाच्या भावी संततीचा अशक्तते पासून बचाव करण्याचें एक साधनच उपलब्ध झालें, असें मानण्यास कांहींच हरकत राहणार नाहीं व उन्नति देखील त्वरित गत्या होईल. परंतु अशा प्रकारचें शिक्षण देण्यास मार्ग काय? हा प्रश्न राहिलाच. अद्यापि, हा सोडविणें फार कठीण नाहीं. मुंबईत ज्या प्रमाणें व्यवस्था केली आहे तशाच धर्तीवर चहुकडे करण्यांत यावी. मिसेस कर्वे सारख्या भगिनी त्यांतून पसार होऊन अशा तऱ्हेचें शिक्षण करावें असें आपल्या मैत्रिणींस सांगण्यास उद्युक्त व्हाव्यात. कदाचित् असा एक प्रश्न निघेल कीं जें इंग्लिश सरकार मुलाला पोरांबाळां प्रमाणें लेखतें तें आपल्या शाळांतूनच असें शिक्षण देण्यास तयार कां होत नाहीं? किंवा सध्याची शिक्षण पद्धति बदलत कां नाहीं? हा ही एक सुलभ उपाय आहे परंतु तो प्राप्त होण्यास ना. चंदावरकर, ना. भाटवडेकर, ना. खरे. इ मंडळी सरकारास सूचना करण्या करिता पुढें आली पाहिजे. ईश दयेनें येतील ! पण अगोदर आपआपसांत अशा संस्था स्थापन कराव्यात कीं ज्यांत आपल्या मनासारखें शिक्षण देण्यांत येईल. कित्येक ठिकाणीं अशी व्यवस्था करण्याकडेस लक्ष जाण्यास, नंतर संस्था प्रस्थापित करण्याचा यत्न करूं लागण्यास बरीच कालावधि लागते परंतु आमच्या विदर्भवासी बांधवांस अशी सुस्थिती प्राप्त होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. तर, प्रौढविद्यार्थिनी शिक्षण-शाळेंतील विषयांची निवड करितांना वरील सूचनां कडेस त्याचें वेळींच लक्ष जाईल व ही संस्था उघडण्या करितां लोकाश्रय चांगला मिळेल व पुढें एकादे वेळीं, तिज संबंधानें लिहिण्याचा सुप्रसंग येईल अशी आशा धरून हा लेख संपवितों.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती कार्तिक वद्य १४ शके १८२०

---

मद्रासेस राष्ट्रीय सभेची तयारी कडेकोट चालली आहे आणि गेल्या आठ पंधरा दिवसा पासून त्या इलाख्यात मोठी चवळवळ सुरू आहे. इतर प्रांतीं देखील प्रतिनिधी निवडण्यासाठीं सभावर सभा भरत आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट होय. यंदा प्लेगाच्या भितीमुळें राष्ट्रीय सभा भरावी किंवा भरवूं नये अशा विषयीं पुष्कळ मतभिन्नता झाली आणि गुदस्ता जसा वऱ्हाडांतल्या मंडळीनें राष्ट्रीय सभा भरविण्याचा दृढ संकल्प केला तसा यंदा मद्रास इलाख्याच्या मंडळीनीं पक्का निश्चय ठरविला आहे. गेल्या दोन अंकांत आह्मी तत्संबंधी इंग्रजी जाहिरात छापिली होती तिजवरून तिकडील चालूं व्यवस्थे विषयीं आमच्या वाचकांस कल्पना आली असेलच. गेल्या २ रे तारखे पर्यंत एकंदर वर्गणी रुपये ४२४८–३ आणे जमली आहे. आणखी वर्गणी भराभर जमा होत आहे. गुदस्ताच्या श्रमामुळें आमच्यामध्यें राष्ट्रीय सभे विषयीं औदासीन्य उत्पन्न झालें आहे असा कित्येकांचा गैरसमज आहे. खरी गोष्ट ही कीं वऱ्हाड प्रांतातल्या लोकांस मद्रासची सफर फार लांब असून मोठ्या खर्चाची आहे. त्यामुळें दक्षिण भागीं राष्ट्रीय सभे निमित्त जाणारे भाग्यवान लोक फार थोडे आढळतील. तशांत तिकडे आसपास प्लेगाच्या आजारा संबंधानें प्रवाशास मोठी तखलीफ होते आणि त्यामुळें लोक तिकडे जाण्यास विशेष भितात. मद्रासकरा समोर असलीं संकटें असूनही त्यांनीं मोठ्या बहादरीनें राष्ट्रीय सभा भरविण्याचा संकल्प पक्का केला आहे. राष्ट्रीय कार्यें अशा पक्या दृढ निश्चया शिवाय सिद्धीस जात नसतात. आह्मी अशी आशा बाळगतो कीं प्रतीनिधी निवडण्याची सभा निःसंशय लवकरच भरेल आणि सर्व लोक आपली वर्गणी यथा

शक्ती पाठवून घेतील.

---

बागबगीचा उत्पन्नासाठीं नसतो आणि त्याच्या पासून खर्च भागून नफा करूं पाहणें मोठें चुकीचें आहे असें आह्मी मुनिसपल बागबगीच्यांच्या प्रस्तुत स्थिती बद्दल लिहितांना ह्मटलें होतें. अशाच प्रकारचा अभिप्राय मे. हेअर साहेबांनीं गेल्या मुनिसिपल रिपोर्टांत लिहिला आहे. ते ह्मणतात कीं सार्वजनिक बगिचे लोकांच्या आरामासाठीं व त्यांच्या मनाला आल्हाद देण्यासाठीं केलेले असतात, आणि याच तत्वावर बगिचा ठेविला पाहिजे. द्रव्याची अनुकूलता नसेल तर तो मोडून टाकावा. परंतु उत्पन्नाच्या दृष्टीनें बगिच्याची व्यवस्था फारशी केली ह्मणजे बगीचाही नीट राहात नाहीं व ह्मणण्यासारखे उत्पन्नही होत नाहीं. बगीचा ह्मणजे सृष्टी सौंदर्याचा अनुभव घेण्याचीं रम्य स्थळें होत वरील अभिप्राय आमची आकोला मुनसिपालिटी कशी काय लक्ष्यांत घेते तें पहावें! हल्लीं येथील टेंपल बगीचा ओसाड जंगला प्रमाणें दिसत आहे किंबहुना त्याला बगीचा ह्मणण्याची देखील लाज वाटते.

---

राजश्री महाडकर जोशी हे वऱ्हाडांत आले होते आणि त्यांनीं आपल्या ज्योतिष ज्ञानाचे प्रयोग खामगाव, आकोला व उमरावती येथें करून दाखविले. त्यांस जो विद्या अवगत आहे. ती उत्तम कोटींतली आहे. तिच्या योगानें ते कोणत्याही मनुष्याच्या चेहऱ्या वरून त्याची जन्मपत्रिका अगदीं बरोबर बनवितात. हल्लीं स्वरभेदा वरून व व हस्तलेखना वरून मनुष्याचे मनोधर्म व जन्मफल सांगण्याचा त्यांचा उद्योग चालूं आहे. ही विद्या मोटी अतर्क्य आहे.

सामुद्रिक लक्षणाचा अभ्यास आमच्या पूर्वजांनीं जितका केला होता तितका कोणत्याच राष्ट्रानें केला नसेल असें ह्मटलें तरी अन्यथा होणार नाहीं. अलिकडे हें सामुद्रिक शास्त्र लटकें ठरलें आहे किंवा याचा खरेपणा कळण्या सारखी साधनें व विद्या लोकांच्या आटोक्यांत नसल्यामुळें लोकांची या शास्त्रावरील श्रद्धा व भक्ति उडत चालली आहे. असा समज आहे कीं मनुष्य जन्मल्या बरोबर त्या वेळचा सर्व ठसा त्याच्या शरीरावर पूर्णपणें उमटतो आणि अमूक लक्षणांचें मुख किंवा हातपाद इत्यादिकांवरून फलज्योतिषा संबंधी सामान्य सिद्धांत वर्णिलेले असतात. ही विद्या अवगत होते तेव्हा ईश्वरी कृतीचा महिमा अतर्क्य वाटतो. या शास्त्राकडे लोकाची प्रवृत्ति अधिकाधिक होत जावी अशी आमची इच्छा आहे. ऋतुमानाचा ठसा चेहऱ्यावर कसा उमटतो याचा दाखला एका पंडित मित्रानें आणून दिला. हा दाखला आह्मी आपल्या वाचकांस प्रत्यंतरासाठीं सांगतो. जर कोणी या दाखल्याचा अनुभव घेऊन त्याचा खरे खोटेपणा आह्मास कळवितील तर आह्मी त्याचा उपयोग करूं.

मकर संक्रांती नंतरच्या सहा महिन्यांत किंवा त्या संक्रांतीच्या पूर्वीच्या सहा महिन्यांत मनुष्याचा जन्म आहे हें ओळखण्याला खालील सामान्य लक्षण पुरेसें होतें. ज्या मनुष्याच्या जन्माचें दक्षिणायन किंवा उत्तरायण निर्णीत करावयाचें असेल त्याच्या वाम नेत्राचें चलनवलन पाहावें. उजव्या डोळ्या पेक्षां डाव्या डोळ्याची स्थिती विशेष स्वाभाविक असते. डाव्या डोळ्यावर मनुष्याचा ताबा पुरेसा चालत नाहीं ह्मणून त्याचें निरीक्षण अधीक उपयोगीं पडतें. वाम नेत्राची कनीनिका स्वाभाविक स्थितींत जर उजव्या बाजूकडे कलती असेल तर त्या मनुष्याचा जन्म दक्षिणायनांत झालेला असतो. आणि तीच कनीनिका डाव्याभागाकडे कलती असेल तर जन्म उत्तरायणांतला समजावा.

हीं किंवा अशींच लक्षणें कोणी आह्माकडे प्रसिद्धी साठीं पाठवितील तर आह्मी ती मोठ्या आनंदानें लोकोपयागार्थ प्रसिद्ध करूं.

---

## The Berar Samachar

---

MONDAY, DECEMBER 12 1898

---

There is a proposal to withdraw the elective franchises from the district boards and municipalities of Berar. There is a similar expression of opinion in the last municipal report. The official opinion is that the elective principle is not in accord with native instinct and custom. Mr. Hare thinks that the recent results of elections held at different centers in the province point to the same conclusion. There are not men enough to contest the candidature for vacant memberships. Further even 25 per cent of voters do not come to vote at the polling. There is no competition even of as ordinary type for municipal honors. Thi leads certain officers to argue that the principle of election has no attraction for the people at large. They fail to take intetest in municipal affairs and have not yet learnt to appreciate the dignity and the responsibility of a refined municipal life. The argument is rather founded on a misconception of facts. It is not that good people do not come forward to work on the municipal committees. People often find that the municipal work is a thankless task. Thankless it becomes for more reasons than one. The attitude of the government is not praiseworthy. The whole control of afairs vests in their officers. They try to overawe public opinion with their superior authority. The municipal finances are crippled in numerous ways. The municipal Com—mittees are called upon to show improvements in point of sanitation, water—supply, drainage, primary schools &c. while they are left without adequate means. The Government advocate the imposition of new taxes without the least thought about the means of the people. The non—official members donot find a free scope of action. They are hampered on all sides and have often to nodd heads to push on municipal ad—ministration almost to the dictates from above. This position is always detrimental to the welfare of the people and destructive to the natural springs of active municipal life. Mr. Hare has however expressed his satisfaction about the working of the municipalities in Berar. His general conclusion we quote below because in a short para he has summed up all the good and bad points of municipal administration in Berar. He remarks thus:—

"With heavy additional expenditure rendered necessary by drought, famine, and the fear of plague, they have suffered from the closing or diversion of important sources of income, and the financial outlook has been for most of them a serious one. But matters having thus been brought to a crisis, committees that have for sometime been drifting along with "a dying wind in their sail" have realized that efforts must be made to improve their revenue, and that municipal government cannot go on at such very slight cost to the inhabitants who benefit by it as has hitherto been the case. This will be seen from the fact that sanction for new taxation has been obtained or applied for by six committees since the commencement of the year under report. Many of them responded very handsomely to the calls made upon them by the famine; their towns have been cleaned up in preparation for a fight against the plague, and altogether I think that it may be said that the municipal committees have made a not unsatisfactory struggle under adverse circumstances."

To meet new contingencies is always a difficulty. Our local body is in the same fix. In proposing new taxes, the municipality of Akola has exempted poor people from the imposition of the taxes on houses, vehicles and animals of drought and burden. For this liberal act the poor people are certainly obliged. But the difficulty of meeting expenses increases in an immense magnitude when the municipal finances are cut down to a large sum by taking away the ground—rent, and the grain and Cotton—Market income from the municipal resources. There are many other deficits as well. The Munici—pality therefore a great loser in all respects. At present the municipal finances are extremely delicate while the calls for urgent expenditure are multiplying in madifold ways. Even the most accute mind is bound to fail to find out easy means to make both the ends of income and expenditure meet. Great economy is used in cutailing the expenditure under all the heads and there is no hope of curtailing it any further except it be to the disregard of public convenience and safety This deplorable state of bankruptcy will reach the climax of a disastrous collapse if no steps are soon taken adequately to supplement the municipal revenues. The municipality will hardly do will if it allows its income to diminish simply to satisfy certain vain notions and sentiments. The municipality exists for popular good weal. This popular good and weal depends on the measure of pecuniary strength given to the municipality. If the people grudge to pay adequately they should not vainly hope to have all their conveniences served adequately. What is true of Akola is true of other municipal towns also. We must learn to abide by the bad chances and cir—cumstances of the new phase of the municipal life. This adverse state of affairs is due to the illibesal policy of the government.

---

## वऱ्हाड

लेफटेनंट फ्लोडन असि० कमिशनर हे रजेवरून परत येऊन या आठवड्यांत बुलढाण्यास आपल्या कामावर रुजूं झाले.

---

अकोल्यास येत्या बुधवार पासून सेशन कोर्ट भरणार असून तारीख २२ पर्यंत चालूं राहील. पांच सहा फौजदारी खटले चालणार आहेत.

---

दवलत नांवाचा नागव्या रुपये १०८ व सरकारी टप्पा घेऊन मे० डेपुटी कमिशनरचे कचेरींमध्यें जाण्या साठीं निघाला. पुढें तो रुपये घेऊन फरारी झाला व सरकारी टप्पा त्यानें एका तेल्याच्या घरांत टाकला होता तो सरकारांत पुन्हां दाखल झाला.

---

खानदेशांतील जळगांव तालुक्यांत कानसवाडी येथें प्लेग सुरूं झाल्याबद्दल वर्तमान आलें आहे. दुश्चिन्ह होय!

---

यंदाच्या इंटर मिजिअट परीक्षेंत वऱ्हाडांतील खालील विद्यार्थी पसार झाले:—

शेषराव दिनकर देशपांडे

लक्ष्मण भास्कर अभ्यंकर

---

### NOTICE

Notice is hereby given that the draft of proposals made by the Municipal Committee Shegaon under section 41 (1) (a) of the Berar Municipal Law for the imposition of a tax on buildings and lands throughout the area of Municipal limits is published for general information.

The description of property to be taxed, the rate and system of assessment proposed to be adopted, will appear from the following proposals.

Any inhabitant within the Municipal limits, objecting to the proposed imposition of tax will, within 30 days from the publication of this notice, submit his objections in writing to the Committee.

| | |
|---|---|
| Shegaon 6th December 1898 | (Signed) E. C. Rich Chairman Shegaon Municipality. |

*Tax on buildings & lands*

*Proposals*

A tax on all buildings and lands situated within the Municipal limits of the town of Shegaon not being the actual property of the Municipality will be levied on and after the first day of April 1899 at the rate of Rs. 6—4—,, per cent on their annual rental value.

Provided that the tax shall not be levied on buildings or lands whose annual letting value does not exceed Rs. 3.

(2) In calculating the amount of tax every one rupee or a fraction of one rupee shall be charged at one anna.

(3) The tax shall be payable yearly in advance by the owners of the buildings or lands.

(Signed) E. C. Rich
Chairman
Shegaon Municipality.

---

## वर्तमानसार

मुर्दे उकरून खाणारा॥ रामनाथ नांवाच्या एका महाराजा पतिआळच्या तुरुंगांत आणून घातलें आहे त्याला ही लजत लहानपणा पासून लागलि असून त्या शिवाय तो दुसरें कांहीं खात नाहीं! शिजलेलें मांस, धान्य, फळफळावळ, दूध, पाणी या सर्वांचा त्याला तिटकारा आहे. कच्च्या मांसा खेरीज कोणताही पदार्थ तो पुढें येऊं देत नाहीं. गलिच्छ राहण्याची ही याला इच्छा फार. स्वच्छ स्नान घातलें तर चिखलानें पुन्हां तो आंग माखून घेतो.

### भयंकर भविष्य

ईश्वर करो आणि खोटें ठरो! मद्रास इलाखा डिंडिगल येथील ज्योतिषी मि कंध स्वामी पिळे यांणी फार भयंकर भविष्य वर्तविलें आहे. तें ह्मणतात—नवंबर सन १८९९ पासून मे १९०३ पर्यंत साडे तीन वर्षांत हिंदुस्थानचा नायनाट होणार! या अवधींत पावसाचा एक थेंबही पडणार नाहीं, तळीं, विहीरी सुकून जातील, झाडें झुडपें करपतील. धान्य मुळीं पिकणारं नाहीं. लोक मिळेल त्या कंदमुळावर व झाडपाल्यावर निर्वाह करतील. नाना प्रकारचे रोग उद्भवतील. प्रजा आपल्या धर्माला पराङमुख होईल, राजा जुलूम करील. मायलेकरांत फाटाफाट होईल, नवरा बायकोला सोडील बायको नवऱ्याचा धिःकार करील. दुराचरण वाढेल देवळे ओस पडतील, वर्णसंकर होईल. रानांतील जनावरें गांवांत शिरून लोकांचा संहार करतील, धरणी कंप होईल. वादळे होतील. अशा अनेक प्रकारांनीं शेंकडा पाऊणशें मनुष्यें मरतील! मूळ अनिष्टाला आरंभ म्हैसूर, शालम, कोईमतूर त्रिचनापल्ली कडे होऊन पुढें उत्तरेस हिमालया पर्यंत एकच दंगल होईल!

या भविष्याचा दुसऱ्या ज्योतिष्य शास्त्रवेत्यांनीं ही विचार करावा.

सरटिवन येथें एक मनुष्य मृत्यु पावला त्याचें वजन १७॥ मण होतें! त्याच्या कफनाची पेटी पाऊण टन वजनाची असून तिला उचलावयास १८ मनुष्यें लागलीं!

तारेवर मेलेला साप पडला असल्यास तारेंतून बातमी जाण्याचें बंद होतें, असा अनुभव विलायतेस नुकाच आला आहे! खोडकर लोकांस हा एक नवीन शोधच लागला ह्मणावयाचा!

वस्ताद दारूबाज—अमेरिकेस एक दारूबाज आहे तो दीड ग्यालन बीर दारू अर्ध्या मिनिटांत फस्त करितो! आहे कोणी याची बरोबरी करणारा आमच्या लोकांत?

मोठाली नाकें लहान व सुरेख करण्याची युक्ति निघाली आहे.

एका जर्मन गृहस्थानें आगगाडींतून पार्सला प्रमाणें जाण्याची पैज मारिली आणि त्या प्रमाणें तो बर्लिन येथून पारीस शहरीं गेला व तेथून पार्सला प्रमाणेंच बर्लिनास आला. तो एका पेटींतून गेला.

चीनांतील मृत्युची शिक्षा विलक्षण आहे. अपराध्यांना जागवून मारतात.

क्षुत्-पिपासा शामक वृक्ष—पेरू देशामध्यें एक झाड आहे. त्याच्या मध्यें असा गुण आहे कीं, त्याच्या पानांचा थोडासा काढा करून प्यालें असतां ४८ तास पर्यंत अन्नाच्या खेरीज क्षुधा व तृषा यांचें शमन होतें. डाक्टर लोकांचें असें मत आहे कीं, या झाडामध्यें शरीरास इतर रीतीनें इजा झाल्या खेरीज पचनक्रिया बंद पाडण्याचें सामर्थ्य आहे. धा० वृ०

बंगालच्या चेंबर आफ् कामर्स ह्मणजे व्यापारी मंडळीकडे नेटीव युरोपियन साखरेच्या कारखानदारांनीं गाऱ्हाणें नेल्यावरून त्या सभेनें सरकारास एक खरमरीत पत्र लिहिलें आहे आणि त्यावरून हिंदुस्थान सरकारानें साखरेच्या उद्योगधंद्या संबंधानें ताबे सरकाराकडून खुलासेवार माहिती मागविली आहे असें अमृतबझार पत्रिके वरून समजतें. परदेशाहून येणाऱ्या बीट साखरेवर मोठीशी जकात हिंदुस्थान सरकारानें बसविली तर हिंदुस्थान सरकारच्या खजिन्यात बरीचशी भर पडेल आणि देशी साखरेच्या उद्योगास थोडेंसे तरी उत्तेजन सरकारानें दिलें असें होईल.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं बडोद्याच्या महाराणी जम्नाबाई साहेब या आलीकडे थोडें दिवस आजारी होत्या त्यास मंगळवारीं तारीख २९ सायंकाळी बडोदें येथें देवाज्ञा झाली.

मद्रासच्या बकिंगहाम हार्टेलवाल्यास धांपाधापी करून ५०० रुपयांस बुडविलें ह्मणून दोघां युरोपियनांस चार महिने व तीन आठवडे अशा सक्त कैदेच्या शिक्षा झाल्या.

अलाहाबाद हायकोर्टाचे वकिल बाबू बन्स गोपाळ यांचा गोळी घालून कोणी खून केला. त्या दुष्टाचा शोध लाऊन देणारास सरकारानें ५०० रुपये बक्षिस लाविलें आहे. शु० सू०

पुण्यांतील नेटीव इन्स्टीटयुशन शाळेस जोडलेलें महाराष्ट्र कालेज बंद झालें.

टर्की व रशिया यांच्यांत जी मागें लढाई झाली त्या लढाईच्या खर्चाची रक्कम टर्कीकडून रशियास पोंचण्याची अजून राहिली आहे व त्याच्या फेडी करता टर्कीनें आपलें क्रीट बेट राशीयास देण्यास काढलें आहे असें सांगतात.

अमेरिका मोठ्या घाईनें लढाईची तयारी करीत आहे. कारण समजत नाहीं.

रशियाच्या स्मोलन्सक शहरांत बायकांच्या सोडती करितात! या सोडतींत ज्यांचें नांव निघेल त्यास बायको व धन मिळते सोडतीचें तिकिट घेणारा कडून उत्पन्न झालेली सर्व रक्कम त्या वरराजास मिळते!

सर्व पृथ्वींत समुद्रांतील दिव्यांच्या दांड्या तीन हजार आहेत.

डोकें दुखूं लागलें ह्मणजे उकडलेल्या बटाट्याची साल काढून ती हुंगली असतां डोकें दुखणें राहतें असें एका डाकटराचें ह्मणणें आहे.

माकडा पासून काम—क्याप्टन इमाम या नांवाच्या खाणींत काम करणाऱ्या एका इसमाचें असें ह्मणणें आहे कीं सोन्याच्या खाणींत माणसापेक्षां माकडें जलद काम करूं शकतात. वरील गृहस्थानें आपल्या बरोबर २४ माकडें घेतलीं आणि एका सोन्याच्या खाणींत काम करण्यासाठीं गेला. तेव्हां त्यास असें आढळून आलें कीं त्या माकडांनीं तेथें सोन्याचें बारीक बारीक कण सुद्धां गोळा करून त्याचा एके ठिकाणीं ढीग घालून ठेवावा. तीं माकडें आपसांत कधीं एक दिवस देखील भांडलीं नाहींत. जो तो माकड आपापल्या कामांत गढून गेलेला असे. तीं माकडें खाणींत काम करूं लागलीं ह्मणजे मोठीच मौज दृष्टीस पडत असे. एकंदरीनें पाहतां माणसाप्रमाणें माकडें कोणत्याही कामाकडे घातलीं तरी तीं कधींही माघार घेणार नाहींत. न्या० सिं०

### अमेरिकेंतील उद्योग.

युनाइटेड स्टेटमध्यें मेसर्स डब्ल्यु. आर. किलबर्न नामक एक कंपनी आहे. तिचा उद्योग चित्राचा आहे. नाना स्थलांचीं नाना वनांचीं, पर्वतांचीं, देवळांचीं, इमारतींचीं, लोकांचीं हुबेहुब चित्रें पैदा करून त्यांचा संग्रह करावयाचा. भुमंडळावरील प्रत्येक देशांत जीं प्राचीन मंदिरें व देवस्थानें आहेत, त्यांचीं चित्रें काढून तीं एके ठिकाणीं पुस्तक रूपानें प्रसिद्ध करावयाचीं; हा या कंपनीचा उद्योग आहे. या कंपनीनें आपला एक हुशार चित्रकार फोटो घेण्याकरितां पृथ्वीपर्यटणास पाठविला आहे. या चित्रकाराचें नांव मि. एम् पी. डकनिच होय.

हे गृहस्थ १८९५ मध्यें पृथ्वीपर्यटणाला निघाले. प्रथम युरोपखंडांतील सर्व फोटो घेऊन नंतर ते एशियाखंडांत आले. तेथून काम संपवून ते आफ्रिकेंत गेले. तेथें काम करून गेल्या आगष्ट महिन्यांत ते हिंदुस्थानांत आले सध्यां ते मद्रासेंत आहेत. या पुस्तकाच्या लाखों प्रती खपतील.

### तिबेटांत गडबड.

तिबेट आपल्या ताब्यांत घेण्याविषयीं इंग्रज बोलूं लागले आहेत. विलायती वर्तमानपत्रें तिबेट ताब्यांत घेण्याविषयीं लिहित आहेत. तिबेटी लोक आमचे हद्दींतील लोकांस त्रास देतात, असें विलायती पत्रें लिहित आहेत. तिबेट चीनचे ताब्यांत आहे. आणि तेथें रशियाचें प्राबल्य वाढत आहे. काबूल प्रमाणेंच तिबेट दुर्भेद्य आहे. असें पूर्वींच्या अनुभवावरून दिसत आहे.

ताज्या तारेवरून असें कळतें कीं, कर्झन साहेब मेजवानीचे वेळीं एका सभेंत बोलले कीं, काबुली लोकांस मनुष्या प्रमाणें वागविलें पाहिजे. काबूल ताब्यांत घेण्याची हीच किल्ली आहे असें ते ह्मणाले. तेव्हां काबूल प्रमाणेंच नेपाळाशींही स्नेहसंबंध राहील, असें दिसतें. काबुलच्या लढाईंत नेटिव लोक हिंदुस्थानांत आमच्या राज्याचा मजबूत पाया आहे, असेंहि कर्झन साहेब ह्मणाले.

### पोलीसचा बनावट पुरावा.

सातारा जिल्ह्यांत कऱ्हाड तालुक्यांत ही गोष्ट घडून आली. साताऱ्याचें नवीन वर्तमानपत्र 'प्रेक्षक' यानें सविस्तर हकीकत दिली आहे. या खटल्यांतील आरोपी एक पंधरा वर्षांचा मुलगा आहे. त्याचेवर खुनाचा आरोप शाबीत करण्यांत आला आहे परंतु त्यास फाशीची शिक्षा न देतां जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा दिली आहे.

पंधरा वर्षांचा मुलगा वडिलार्जित इस्टेटीपैकीं हिस्सा मिळावा, ह्मणून कुऱ्हाडीनें आपल्या चुलत्यावर घाव घालतो, ही गोष्ट प्रथमदर्शनीं शक्य दिसत नाहीं. वाई येथील दंग्यांतील चिफकानस्टेबल दुल्लेखान यांनीं ही गोष्ट कोर्टांत सिद्ध करून दाखविली. हल्लीं शिक्षा झालेला मुलगा एरवड्याचे तुरुंगांत रात्रंदिवस रडत आहे. यावरून तुरुंगावरील अधिकाऱ्यांस त्याची कींव येऊन त्यांनीं त्यास त्याची सविस्तर हकीकत विचारली. त्यांनीं आरोपीची जास्त चौकशी करण्याविषयीं सरकारांत शिफारस केली. सदर्हू दुल्लेखान यांस त्यावरून सस्पिंड केलें आहे.

मुंबईसही अशीच दुसरी गोष्ट घडून आली. मुंबईच्या खटल्यांतील आरोपी पोलीस अंमलदार आहे. "सोनेरीटोळी" या नांवाची एक मुंबईंत सर्व प्रकारची वाईट कामें करणारी मंडळी आहे. या मंडळीनें एका मनुष्यास फसविलें या मंडळी ऐवजीं पांडू विठू नांवाच्या एका मनुष्यास धरून पो० चौकींत नेण्यांत आलें पुढें या मनुष्याचें प्रेत चौकींतून बाहेर काढलें. पो. नीं असें सांगितलें कीं, हा मेलेलाच रस्त्यावर सांपडला. तेथें तो ७।८ दिवस आजारानें पडला होता. तो भीक मागणारा होता. पुढें मयताचा पंचनामा करितां त्याचे बायकोनें निराळी हकीकत सांगितली. चौकशी अंतीं असें कळण्यांत आलें कीं आरोपी यास गुन्हा कबूल करण्याकरितां चौकीवरील जमादार हशन महंमद यानें आरोपीस लाथ मारिली. त्यामुळें तो मेला. हल्लीं जमादार पोलीसचे ताब्यांत आहे. त्याची चौकशी व्हावयाची आहे.

### आरमार आणि पैसा.

विलायतेतील एक पत्रकर्ता लिहितो कीं, सगळी टेम्स नदी लढाऊ जहाजांनीं भरून काढली, सगळा भूमध्यसमुद्र जरी त्याप्रमाणेंच लढाऊ जहाजांनीं भरून काढला, तरी पण त्यांत अर्थ काय? जहाजास आणि फौजेस लागणारा पैसा ब्यांकेच्या ताब्यांत आणि त्या ब्यांका अमेरिकेच्या ताब्यांत.

या ह्मणण्याचा अर्थ असा दिसतो कीं इकडे जी गोऱ्या नौकरांस पगाराबरोबर हुंडणावळ द्यावी लागते, त्यावरून पहा. हुंडीचा भाव फार वाढल्यामुळें हुंडणावळ द्यावी लागते. हुंडीचा भाव वाढण्याचें कारण ब्यांक आणि सावकार. ती ब्यांक अमेरिकेचे ताब्यांत ह्मणजे अमेरिकेनें सोनें महाग केलें आहे. ह्मणून हुंडीचा भाव वाढला आहे अमेरिकेनें सोन्याचें नाणें केल्यामुळें सोनें महाग झालें आहे.

गंजम येथील दंग्यापैकीं ५२ दंगेखोर गेल्या शुक्रवारीं पकडल्याचें समजतें.

श्रीरंगपट्टण येथें दंगा होऊन दंगेखोर बंदुकीनें ठार होऊन बरेचसे घायाळ केले आहेत.

लष्करी बंदुका चोरण्याकरितां रावळपिंडी येथें मधून मधून चोरांचा सुकाळ होत असतो.

पुण्यापासून १० मैलांवर असणाऱ्या लोणी नांवाच्या गांवीं गेल्या रविवारीं एक दरोडा पडला. हे दरोडखोर १९ इसम असून सर्वाजवळ काठ्या होत्या. दरवडा पडणार असें ऐकून सर्व गांवकरी एकत्र जमले होते. परंतु त्या सर्वांस येथेच्छ मार देऊन दरोडखोरांनीं सुमारें ४००० रुपयांची लूट मारिली असें ह्मणतात. सोलापूर जिल्ह्यांतील पोखरापूर येथेंही एक दरोडा पडून बराच माल लुटला गेला. या दरोड्यापैकीं आठ इसमास फौजदारानें पकडलें आहे. आ. व.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साधे जास्त „ „ १ ८८
किरकोळ अंकास ....................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy ....................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 19 DECEMBER 1898 NO 49

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख १९ माहे डिसेंबर सन १८९८ इ० अंक ४९

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## विक्रीस तयार.

SAPKAR'S DIARY FOR 1899. WITH A CALAENDAR FOR 1900

### सापकरांची रोजनिशी, सन १८९९ सालाकरितां.

हींत मराठी तिथी, वार, महिने, सुर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौंजीविवाहाचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र स्टांप, मनीआर्डर, पोस्ट, मुंबई बँकेच्या रूढी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा. विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टँप, कोर्टफी, पोलिस गाईड डिस्ट्रिक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदरांचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जोडलीं आहेत.

रोजनिशीची किंमत.

| | | |
|---|---|---|
| प्रत नंबर १.... .... .... | ८१२ | ०२ |
| प्रत नंबर २.... .... .... | ०८ | ८१॥ |
| प्रत नंबर ३.... .... .... | ०७ | ८१ |

किंमतीबद्दल रोख पैसे आह्माकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

## श्रीएकनाथ मंदीर प्रतिष्ठान
## ( पैठण )
## यांचा जीर्णोद्धार.

श्री नाथ महाराजांचें गांवांतील मंदीर अति जीर्ण जहाल्यामुळें नवीन करण्याचें मनांत आणून कार्तिक शुद्ध ९ शुक्रवार शके १८२० विलंब नाम संवत्सर रोजीं मंदिरांचें काम आरंभिलें आहे. विशेष खर्चाचें ह्मणजे निदान पांच पन्नासहजार रुपयांचें काम असल्यामुळें संस्थानांतूनच संपूर्ण खर्च होणें संभवनीय नाहीं त्यामुळें सर्व सभ्य व उदरधी राजे, संस्थानिक जहागीरदार, साहू सावकार आणि संत मंडळी यांस सविनय प्रार्थना आहे कीं आरंभिलेलें योग्य कृत्यास सर्वत्रांनीं आपआपले शक्ती व इच्छे प्रमाणें या महत्तर परमार्थ कामीं उदार हस्तें द्रव्यद्वारा मदत दिल्यास मंदिराचें काम त्वरेनें पूर्ण होऊन श्रेयाचे अधिकारी सर्वच होतील. पैठणास इंग्रजी व मोगलाई पोस्ट असोन तहसीलदार कचेरी आहे. मनीआर्डर, जसे मुबादला अथवा हुंडी वगैरेच्या रुपानें जी कांहीं रकम खालील पत्यावर येईल त्याची पावती संस्थानांतून दिली जाऊन शिवाय जगद्धितेछु वर्तमानपत्रांतून नांवनिशीवार पोंच ही दिली जाईल.

एकनाथ अनंत
कारभारी.
श्रीनाथ संस्थान व नाथ मंदीर फंड
क्षेत्र पैठण.
पोष्ट. पैठण, जिल्हा औरंगाबाद
दक्षिण.

नोटीस.

नोटीस बेशमी बजी मर्द भवानी वकोडे जात कुणबी राहणार मौजे बाभळी तालुके दर्यापूर. हीस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तू अज्ञान अमृता याची साक्षांत आई आहेस परंतु मुलाचे पालन बायजा मर्द भवानी सापत्न आई हीच करते तुह्मी मुला जवळ मुळींच राहत नाहीं मुलाचे नावावर तुह्मी कर्ज वगैरे करूं नये व मुलाची जमीन दुसरे कोणा जवळ, गाहाण अगर खरेदी अगर पट्यानीं अगर कोणतेही इतर रीतीनें सावकार लोकांस लिहून देऊं नये. लिहून दिल्यास त्या कर्जाची जबाबदारी मुलावर नाहीं व मुलाची जमीन वगैरेही जबाबदार होणार नाहीं करितां नोटिसीनें तुह्मास सूचना दिली आहे कळावें. तारीख १३ माहे डिसेंबर सन १८९८ इसवी.

सही
निशाणी अमृता वल्लद भवानी
अ० पा० आई बायजा
मर्द भवानजी पाटील
इची असे बांगडी

NOTICE

It is hereby published for general information of the people living within the limits of the Akola Municipality that assessment lists of the Town fund tax for the year 1898—99 due by all persons residing, or practising any profession or art or carrying on any trade are complete and ready for inspection in the Municipal Office during Office hours ( from 11 A. M. to 5 P. M.)

Persons concerned, are requested to see what tax has been imposed upon them, and to take objections, if any in writing to the same within one month from the publication of this notice.

Objections of those who will not appear prepared to substantiate their contentions on the day and time which would be hereafter fixed by the Committee for hearing the objections will be taken to be rejected.

Dated Akola 13th December 1898. } N. K. Date Secretary Municipal Committee Akola.

नोटीस.

ह्या नोटीसीनें अकोले मुनसीपल हद्दींतील सरकारी नौकर व खानगी नौकर आणि ज्याची उपजीविका सरकारांतून मिळणारे पैशावरच आहे असें खेरीज करून इतर सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोले मुनसिपल हद्दींत राहणोर किंवा कोणताही धंदा, कलेचे काम, किंवा उद्योग करणोर सर्व लोकांवरील सन १८९८–९९ सालचे टाऊन फंडाच्या आकारणी बद्दलच्या याद्या तयार झाल्या आहेत. त्या मुनसिपल आफिसांत आफीसचे वेळांत सकाळीं ११ वाजल्या पासून संध्याकाळचे पांच वाजे पर्यंत पाहण्याला ठेविल्या आहेत तरी कळविण्यांत येते कीं सर्व लोकांनीं आप आपल्यावर किती कर बसविला गेला आहे हें पाहून सदहू बसविलेल्या आकारणी बद्दल तक्रार असेल तर ती ह्या नोटिसीचें प्रसिद्धीचे तारखे पासून एक महिन्याचे आंत लेखी मुनसीपल आफीसांत दाखल करावी.

जे लोक ठरावा विरुद्ध तक्रार करतील त्यांनीं तक्रारीच्या चौकशीचे तारखेचे दिवशीं टाऊन हालांत सकाळीं ७॥ वाजतां आपले पुराव्यानिशी हजर व्हावे. जे लोक वक्तशीर हजर न होतील त्यांची तक्रार नामंजूर केली जाईल. कळावे तारीख १३ माहे दिसेंबर सन १८९८ इसवी.

N. K. Date
सेक्रेटरी मु० क० अकोला.

जाहिरात.

सर्व साहू सावकार लोक यांस कळविण्यांत येते कीं बजीं मर्द भवानी ही अमृता वल्लद भवानी याजपासून आलग आहे तिनें माझे नांवावर तुमचें पासून पैसे वगैरे कर्जाऊ काढल्यास त्याचा जबाबदार मी होणार नाहीं माझी स्थावर, जंगम, इस्टेटही जबाबदार होणार नाहीं करितां कळविले आहे कळावे, तारीख १३ माहे डिसेंबर सन १८९८ इसवी.

सही.
निशानीं अमृता वल्लद भवानी
अ० पा० आई बायजा
मर्द भवानजी पाटील
इची बांगडी असे

## ॥ श्रीर्जयतितराम् ॥
### — मंत्र रामायण नं° ८
### —अयोध्या कांड—

राम, लक्ष्मण व सीता या त्रिवर्गानें तिच्या आज्ञेप्रमाणें वल्कलें धारण केलीं हें सांगावयास नकोच. दशरथनिदेशावरून सुमंत्रानें त्यांस रथांत बसवून नेलें. जे पौरजन रामाचा यौवराज्याभिषेक पाहण्यास उत्सुक झाले होते त्यास या विलक्षण प्रकारानें काय वाटलें असेल याची कवीनें एकाच कवितेंत परंतु फार सुरस कल्पना आणून दिली आहे.

पाय धरुनिया ह्मणती ' रामा! आह्मी
तुझेचि सांगाती '।
रडती, पडती, पढती स्तोत्रें, गाण्याचि कीर्तिला गाती ॥

येथून पुढें शृंगवेरपुरास जाई तों पर्यंत कांहीं एक विशेष घडलें नाहीं. निषादपति गुह यानें सर्व राज्य अर्पण केलें असतां ते पितृवचनैकतत्पर प्रभु रामचंद्र त्याचा धिःकार करून व सुमंत्र मंत्र्याला येथूनच परत पाठवून देऊन पादचारीच वनप्रदेशांत प्रवेश करितां झाला. वाटेंत भरद्वाज ऋषीचे पादवंदन करून चित्रकूट पर्वतावर जाऊन वास केला.

इकडे सुमंत्र मंत्री परत येऊन त्यानें दशरथ राजास रामास नेऊन पोहोचविण्याचा वृत्तांत सांगितला. भागीरथी नदी पार नेऊन पोहोचविलें असें तो सुमंत्र सांगे पर्यंत, राम अझूनहिं कदाचित् परत येईल असा राजास आशातंतु होता तो हें ऐकून तुटला व आप-

ण आतां खास वाचत नाहीं असें त्यास वाटलें. तथापि रामानें निरोप काय सांगितला तो ऐकण्याविषयीं सोत्सुक होऊनच कीं काय आपला मृत्यु त्यानें घटकाभर लांबणीवर टाकिला. राम प्रवेश करिते वेळेस जें कांहीं बोलला तें एकदम सांगितलें असतां न जाणो कदाचित् भलताच परिणाम होईल असें वाटून सुमंत्र ह्मणतो:–

तुज वंदुनिया येथुन गेला रघुवीर
शृंगवेरातें ।
ह्मला पूज्य गुहातें जैसा गौरीपती
कुबेरातें ॥ १ ॥
पयफल भक्षुनि रचिल्या वटदुग्धें त्या
स्थळीं जटा रामीं ।
ह्मा देखिल्या सुहृज्जनहृदयाच्या भेदित्या
कुठारा मी ॥ २ ॥
ते राजसुता सीता सेवितसे प्रेमयुक्त
कमलाक्षा ।
जीचें, वनसंचारें, दिसती पदरक्त, जरि
नसे लाक्षा ॥ ३ ॥
गमन–श्रम न गणुनि, तो लक्ष्मण दृढ
मानसीं, जसा अशनी ।
स्वकरकृताङ्गज शयना जवळचि जागे
निरिच्छ जो अशनीं ॥ ४

इतुका मोठा उपोद्घात झाल्यावर रामानें खरोखरच परत येण्या संबंधानें सुचविलें असेल असें त्या विव्हल मानस राजास वाटावयास लागलें, परंतु राम तरी राजाचें समाधान काय करणार! आतां परत येणें किंवा लवकर परत येईन येव्हढीं तरी निदान आशा लावणें ही गोष्ट अगदीं दुरापास्त व दुर्घट होती, परंतु या घोर प्रसंगीं राम तरी काय निरोप सांगणार? तोंडातून एखादा शद्बही निघण्याची मारामार तर निरोप कसचा? दशरथानें असल्या कांहीं तरी भिस्तीवर आपला प्राण क्षणभर धरिला होता. शेवटी सुमंत्र ह्मणाला:—

सजल घनश्याम मला ‘ जाणें ’ ऐशा
करी नियोगाते ।
गंगेला उतरोनी, गेला देवोनिया
वियोगातें ॥ १ ॥

‘ जाणें ’ या दोन अक्षरा खेरीज राम कांहीं एक बोलला नाहीं असें राजानें ऐकिल्या बरोबरत्याचा धीर सुटला व तो मूर्छित पडला. कौसल्येनें त्यास सावध केल्यावर राजानें आपल्या हातून चुकून एका वैश्यपुत्राचा वध कसा झाला व ह्याच्या माता पितरानें ‘ तूंहि पुत्रशोकानेंच मरशील ’ असा शाप कसा दिला इत्यादि सर्व वृत्तांत सविस्तर सांगून तोंडानें ‘ राम राम ’ ह्मणत असतांनाच त्या राजाचें प्राणोत्क्रमण झालें.

पुढें चालू

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध ७ शके १८२०

## सद्यस्थिति

कोणतेही विषया संबंधानें विचार अगर चर्चा करण्या पूर्वी प्रत्येकानें ह्या विषया संबंधी मिळवेल तितकी माहिती मिळविली पाहिजे. पुरी माहिती न मिळवितां विचार करण्यास किंवा चर्चा करण्यास आरंभ केला तर दिव्या वांचून अंधारातून जाणाऱ्या मनुष्या सारखी स्थिती होते. माहिती मिळविल्यावर नंतर त्या वेळची लोकांची स्थिती विचार करणारानें किंवा चर्चा करणारानें ध्यानांत ठेविली पाहिजे. देश स्थिती जर ध्यानांत आणिला नाहीं तर अनुमानें भलतीच होण्याचा संभव आहे. जेव्हां जेव्हां सुधारणे संबंधानें वाद होतो. त्यावेळीं विचार करणारे किंवा चर्चा करणारे लोक देश स्थितीला एका बाजूला झुगारून देतात असें दृष्टोत्पत्तीस येतें. सर्वांची इच्छा चांगली असते यांत कांहीं संशय नाहीं. सर्वांना आपली स्थिती सुधारावी व सर्वांची स्थिती चांगली व्हांवी ही इच्छा असते. फरक इतकाच ही चांगली स्थिती कोणाची या संबंधानें वाद असतो. प्रत्येक मनुष्याःला आपल्या अनुमाना संबंधानें एक प्रकारःचा अभिमान असतो व आज काल शिकल्या सवरलेल्या लोकांना आपल्या मता संःबंधानें जास्त अभिमान वाटणें सहाजिकच आहे. असे लोक इतर लोकांपेक्षां जास्त शिकलेले असतात. त्यांचीं मते सुसंस्कृत झालेलीं असतात. मोठ मोठ्या विद्वानांनीं लिहिलेलीं पुस्तकें ह्यांच्या पाहण्यांत आलेलीं असतात. या विद्वत्समूहा पैकी खरोखरच कांहीं कळकळीनें आपलीं मतें चांगल्या मजबूत पायावर रचण्याचा प्रयत्न करितात व इतक्या गोष्टी लक्ष्यांत धरल्या ह्मणजे हें कोणाच्याही लक्ष्यांत येईल कीं अशा लोकांना आपलीं मतें खरोखरी हितावह व भक्कम पयावर रचलेलीं आहेत असें वाटणें सहाजिक आहे. यात विलग गोष्ट एवढीच होते कीं ज्यांच्या करितां येवढा खटाटोप हा विद्वत्समूह करितो ते लोक इतक्या मजलेला येऊन पोहोंचलेले नसतात व त्यामुळें त्यांना अमृतनिधी जवळ येऊन त्यांची किंमत समजत नाहीं. एकाच रोगावर एकच औषध कधींही लागूं पडणार नाहीं. हुशार वैद्य देश, काल, रोग्याची स्थिती, आजूबाजूची स्थिती हीं लक्षांत आणून नेहमी औषधांत फरक करितो. असें जर न झालें तर खरोखर गुणाकारी औषधा पासून जिवावर बेतण्याचा संभव येतो. हीच गोष्ट कांहीं अंशीं आमच्या समाजवैद्यांनां लागूं करणें अवश्यक आहे. ते रोगाची चिकित्सा करण्यांत जरी एक वेळ चुकले नाहींत तरी औषध योजने मध्यें आमचे मतें त्यांच्या हातून कांहींना कांहीं तर चुका होत आहेत. एका औषधानें पाश्चात्य समाजाला गुण आला ह्मणून तेंच औषध आमच्या समाजाला ते देऊन पहात आहेत. सध्याची स्थिती ध्यानांत आणिली ह्मणजे पाश्चात्य समाज व आमचा समाज यांत बरीच तफावत आहे असें दिसेल. दोन्ही समाज कदाचित फार प्राचीन काळीं एकाच तत्वावर उभारले गेले असतील परंतु त्यांची पुढची प्रगति तरी निदान वेगळ्या पायावर झाली आहे. व पुढील प्रगतीचा विचार केला तर दोन्ही समाजाच्या प्रगतीला कारणीभूत झालेलीं तत्वें परस्पर विरोधी होतीं. आतांच्या आमच्या रीती भातींत, आचार विचारांत, कल्पनांत, व विचारसरणींत विलक्षण फरक आहे. किंबहुना एक ऐहिक मार्गी तर दुसरा पारमार्थिक मार्गी आहे. या ठिकाणीं एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं सध्यां आमचा ओघ ऐहिक मार्गाकडेसच जास्त वळत चालला आहे. हें चांगलें किंवा वाईट हा वेगळाच प्रश्न आहे. मुख्य गोष्ट ही कीं समाज स्थितीं भिन्न असल्यामुळें पाश्चात्य समाजाला जीं औषधें फायदेशीर वाटलीं. तीं आमच्या समाजाला देशकालानुरोधानें फरक न करितां देणें ह्मणजे मोठी चूक आहे. सर्वांना असें वाटणें साहजिक आहे कीं आपली स्थिती सुधारावी. पूर्वी लिहिल्या प्रमाणें सर्वांचा उद्योग आपली स्थिति सुधारण्याकडेच आहे. इतकेंच कीं सुधारणेच्या कल्पनेमध्यें मात्र विरोध आहे. आमचे सुधारक आमचे मतें दुसरी एक मोठी चूक करितात ती ही कीं ते समाजाला सरकारची भिती घालूं पाहतात. वास्तविक पाहातां आमचे सरकार आमच्या सुधारका प्रमाणें वागणार नहीं व सरकार नेहेमीची तटस्थ वृत्ति कायम ठेवील. परंतु आमच्या सुधारकांना असें खात्रीनें वाटतें कीं सरकार त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें वागेल. अलिकडील कांहीं गोष्टी वरून सुधारक वर्गाची ही कल्पना कांहीं चुकीची आहे असें ह्मणतां येणार नाहीं. आमचे मतें सुधारक वर्गाचे डोळे केव्हांना केव्हां तरी उघडतील व मग त्यांनां एक तर समाजा पासून फुटून निघावें लागेल किंवा नाक धरून समाजाला घेऊन लोकांची खात्री करून त्याच्या बेता प्रमाणें सुधारणा अमलांत आणाव्या लागतील. या गोष्टींत सुधारक वर्ग एक गोष्ट अगदीं विसरून जातो. खरोखर जर लोकांनीं सुधारावें अशी त्यांची इच्छा आहे तर सुधारणा लादणें हें जास्त श्रेयस्कर आहे किंवा सुधारणा घडवून आणणें हे जास्त हितावह आहे गोडी गुलाबीनें हिताहित दाखवून जें काम होईल तें काम खात्रीनें धाक दडाशानें होणार नाहीं. या संबंधानें असें सांगण्यांत येतें कीं कायदा घेऊन सक्ती करणें ह्मणजे लहान मुलांना जबरदस्तीनें अमृत पाजण्यासारखें आहे. आतां एक तर आमचा समाज आज मुलाप्रमाणें अगदीं अज्ञान स्थितींत नाहीं. व घटकाभर तसाच आहे असें समजलें तरी सुद्धां या अमृत पाजण्या पासून चिरस्थायी फायदे होण्याच्या ऐवजीं कदाचित् लोकांच्या मनावर घातक परिणाम होण्याचा संभव आहे. कायद्या पासून जे फायदे होणार ते एकदम दृष्टोप्रत्तीस न येतां पुष्कळ दिवसांनीं कळण्यांत येतील व त्यामुळें लोकांना कायदा फायदेशीर आहे असें न वाटतां त्याच्या पासून होणारी सक्ति मात्र लोकांच्या नजरे समोर राहील गोष्ट चांगली असो वाईट असो मनुष्य मात्राला त्या संबंधानें अटकाव केला तरी तीच गोष्ट करण्याकडे त्याची जास्त आसक्ति होत. ह्या तत्वानें लोकांनां कायदा जास्तच सलणारा होईल. दुसरी आपल्याला सुधारणेच्या कामांत परक्या गृहस्थाची मदत घेणें ह्मणजे सुधारक वर्गानें आपलाच कमीपणा जगांत व्यक्त करणें नव्हे काय? व त्या बरोबरच आमचे लोक चांगल्या गोष्टींत आमचे ऐकत नाहींत, आमचा त्यांच्यावर भरंवसा नाहीं व त्यामुळें आह्माला त्याच्यावर सक्ति करणें भाग पडतें आहे असा जगांत डांगेरा पिटविणें नव्हे काय? या गोष्टीचा सुधारक वर्गानें विचार करावा. आमचे मतें जर लोक कांहीं एक प्रकारची सुधारणा करीत नाहींत तर त्यावरून अनुमान इतकेंच काढावयाचें कीं लोकांच्या त्या सुधारणें संबंधानें खात्री झालेली नाहीं व त्या संबंधानें देशस्थिती आज ह्या सुधारणेला अनकुल नाहीं आमचे सुधारक ह्मणतील कीं या प्रमाणें समाज कधींही सुधारणा अमलांत आणणार नाहीं. तर त्यावर आमचें ह्मणणें इतकेंच आहे ज्या प्रमाणें आज काल स्थिती आहे त्या प्रमाणें ज्यांनां जी सुधारणा अत्यावश्यक वाटते त्यांनीं ती सुधारणा खुशाल अमलांत आणावी व त्या प्रमाणेंच सुधारक वर्ग करीत आहे. जर सर्व समाजाची त्या संबधानें खात्री होत नाहीं व सर्व समाज त्या सुधारणेला तयार नाहीं तर अशी सुधारणा त्यांच्यावर सरकाराची मदत घेऊन लादणें श्रेयस्कर व फायदेशीर होणार नाहीं. तत्वदृष्टया पाहिलें तर जर यंदा कदाचित् सुधारक वर्गाचा समज चुकला व खरोखर भलतीच सुधारणा लादण्यात आली तर त्या पासून होणाऱ्या दुष्परीणामाचे खापर सुधारक वर्गाच्या माथ्यावर फुटणार नाहीं का? परंतु जर सर्वच लोकांनीं जर एक सुधारणा केली व जरी पुढें त्या पासून दुष्परिणाम झाले तरी त्या बद्दल दोषी एक वर्ग होणार नाहीं. आमच्या कमनशिबानें दारू पिण्याचा प्रचार फार दिसून येतो व ह्या आकाणाईचा सपाट्यात अज्ञा पेक्षां सुज्ञच फार सापडले आहेत. कोणत्याही कारणानें कां होईना अशी स्थिती आहे खरी या बद्दलचा दोष सुधारकान कधीं कोणी दिला आहे काय? ही वाईट गोष्ट खरी पण पुष्कळांचे संमतीनें समाजांत शिरली. मग दोषाचे वाटेकरी सर्वच उलट पक्षीं आमचे असें विचारणें आहे कीं संमतेवयाचा कायदा एवढें रण माजवून करवून घेतला त्या पासून आज मित्तीला काय फायदा झाला आहे हें सुधारक वर्गापैकी कोणी सांगूं शकेल काय? आमचे मतें त्य वेळीं जो वाद झाला, जी लोकांमध्यें दुही पडली, जी समाजाग्रणीमध्यें वैमनस्यें पडलीं जो कल्होळ व अस्वस्थता माजली व त्यापासून पुढें सामाजिक गोष्टींत व तदनुषंगानें इतर सर्व व्यवहारांत अस्वस्थता, असंतोष व फूट पडली त्याच्या शतांश सुद्धां फायदा झाला नाहीं. लोकांचीं मनें दुखावलीं तीं दुःखावलीं लोक व समाजाला आळा घालणारे लोक यांचे मध्यें अविश्वास उत्पन्न झाला त्यांचा अजूनही बी मोड झाला असें ह्मणतां येत नाहीं. सुधारक वर्ग लोकांना आवडत नव्हता तो जास्त आवडेनासा झाला. व त्याचे संबंधानें अजूनही आदर उत्पन्न झालेला नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे कीं सुधारक वर्गाचे श्रम या प्रमाणें व्यर्थ जावेत. या वर्गापैकीं पुष्कळ लोक खरोखर जीवापाड श्रम करितात. खरोखर समाज सुधारावा ह्मणून त्यांचे मनांत कळकळ आहे. पण एक तर हा वर्ग लोकांना आवडता नाहीं, त्यांचेवर लोकांचा विश्वास नाहीं व सुधारक वर्गाला लोकांच्या अडचणी कळत नाहींत ह्मणून सुधारक वर्गा पैकीं खऱ्या कळकळीच्या लोकांचे श्रम व्यर्थ जात आहेत. या गोष्टीला वेग वेगळीं कारणें झालीं आहेत त्याचा आह्मी तूर्त विचार करीत नाहीं. स्वतंत्र रीतीनें

त्यांचा विचार करण्याचा आमचा मानस आहे. सारांश, सुधारक वर्गानें हा सुधारणेचा बागुलबुआ पुन्हा पुढें आणू नये. त्यापासून कांहीं हित नाहीं व ज्या प्रमाणें मुल मोठें झालें ह्मणजे बागुलबुआला भित नाहीं त्या प्रमाणें जर कां सरकार मग कोणच्या कारःहोईना या सुधारक वर्गाचें ऐकणार नाहीं. तेव्हां या बागुलबुआची भिती लोकांना राहणार नाहीं आणि मग सुधारकांचें रामबाण गाना व्यर्थ जाईल.

The Berar Samachar

MONDAY, DECEMBER 19 1898

## EDUCATION

Though the curriculum in the schools, High Schools and in the Colleges has undergone frequent changes still it has not materially changed its character during the last 40 years. It will be seen that it still aims at placing before the mind of the student a bit of every important department of knowledge and thus creating a love of reading. This requires that the student should at least go through the A. B. C. of many subjects; the choice of taking any one of these for his life—long study rests with him. It will be but right to see if a time has come to find out whether the principle, on which the curriculum in schools is based, is in keeping with the interests of the students of the present day. In our opinion a mighty change has been effected in the aims and objects of the student during the last 40 years. The men who drank deep at the fountain of knowledge some 30 years ago must not have been actuated by mercenary motives or practical advantages. They must not have come to schools with a view to go through the various books and courses simply to pass the several examinations. They must have taken to books simply because there was a genuine awakening for knowledge, pure and simple. It is often stated that men that are let loose by the University at present are of a lower stamp. It is really a question if this is right, for no one has tried yet to solve the question by placing facts and figures before the public. But if it be true then a solution of it can be found if one were to look to the changes effected in the aims and the character of the students. When education was first introduced it had literally to be *forced* upon the public. Again the people must not have been reconciled to it at first because it came to be introduced by foreigners and by our conquerors. If one were to strain one's nerves and recall the good old days one will realize the truth of what we say. Under these circumstances old students must have been higher in standing, higher in social position and brighter in intelligence. Further they must have been roused into action by higher principles as they went on. People high or low, rich or poor must have sent their boys to the schools when they must have seen practical advantages and successful careers of these pioneers in the field of education. The position and the comparative success of the students afterwards led every one to send his boy to the school and, so to say, to invest a capital with the hope of being well rewarded. A time has come when this belief of the people at large must be eradicated. People at large are more practical as a rule for they have to cope with others in this general struggle for existence. They have now come to see that education is not advantageous in these days. But though this practical side of the question would lead men not to send their boys to schools still one can not do without some sort of education and therefore at least our anglo—vernacular schools and high schools would be still as crowded as they were. The only effect of this view will be that, men will think twice before they send their boys to Colleges. They would see if a boy is well fitted to undergo the strain of the University course and to to go through the ordeal of the several examinations and also if they can lay out a thousand or two as dead capital. From what we have put down it will be seen that it is the duty of every parent to see if any changes in the education given at the Anglo—vernacular schools and high schools is needed. If the student of the present day wishes to learn only to secure an employment then it would but be proper if he is allowed to go through a course necessary to fit him for that only. At present the same course is prescribed for a future pleader, tradesman, doctor, educationist scientist, clerk or engineer. We do not say that it is not good for these to go through a course which is exactly the same for some years. But in our opinion the present course in schools and high schools over—steps the limit and that it puts an unnecessary strain upon many. We ridicule the idea if we are asked by the young boys as to the advantages and benefits of learning geometry, grography &c. No doubt this question is fit to be ridiculed if we start with the idea that men should be acquainted with the principles of every important science before they give up their study. The question is more troublesome if we remember that there is an extra strain for the Indian student. Not only has he to be proficient in his mother tongue, but he has to master a foreign languages and to go through his course in this foreign language. If this be borne in mind then it will be seen that parents, leaders of masses and the authorities should see that the strain on the brains of the students is lessened. We all talk loudly of physical education but do not at all notice the rate at which the student class is working. Our warmest thanks are due to Rao Bahadur V. S. Patwardhana Director of Public Instruction for his indefatignable energy and lively interest. He has tried to make the course a bit easier; still there is much to be done.

## वऱ्हाड

मे. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर, आकोला हे स्वारींत फिरत असतांना त्याचें सौजन्य, कार्यदक्षता व सुखकर अंमलदारी हीं पाहून लोक त्यांस अत्यंत चहातात व त्यांचे धन्यवाद गातात. येथ सत्पकांत साहेब बहादूरांची स्वारी खामगांव तालुक्यांतून जळगांव तालुक्यांत खालील मुक्कामाला जाणार आहे.:—

| मुक्काम | तारीख |
| --- | --- |
| माटरगांव | १९ |
| पातुर्डा | २० |
| निरोड | २१ |
| जळगांव | २२।२३।२४ |
| | नाताळची सुट्टी |

मि. बी. के. असिस्टंट कमिशनर हे दवऱ्यांतून आज उद्यां अकोल्यास परत येतील.

मि. सी. शामराव अत्राची; बुलढाणा यांची बदली यवतमाळास झाली असून ते लवकरच आकोल्यास येऊन पुढें नव्या जागीं रवाना होतील.

जिल्हा वाशिम पैकीं सावरगांव येथील लाडकी नांवाच्या गरोदर वंजारणीस गेल्या २ सप्टेंबर रोजीं कुऱ्हाडीनें छिलून ठार मारल्याचा आरोप तिचे दीर हत्या वल्लद डोंगरू व लक्ष्या वल्लद डोंगरू यांवर होता त्यांची चौकशी गेल्या १४ वे तारखेस सेशन पुढें झाली व आरोपी दोषमुक्त झाले. हत्यानें चार वेळा कबूली जबाब दिला होता आरोपी तर्फे रा. रा. केशव गोविंद दामले बी. ए. एल. एल बी हे वकील होते.

आसोला तालुका मंगरूळपीर येथील नागो वल्लद रामजी नांवाच्या कुणब्यानें कोंडी व तिची मुलगी सोनी यांस अति क्रूरतेनें ठार मारल्याच्या आरोपावरून मे. सिम्पसन साहेब सेशन जज्ज यांच्यापुढें त्याची चौकशी ता. १५ व १६ रोजीं चालली व सदर्हू नागो निर्दोषी ठरला कोंडी ही विधवा असून तिला हरामाचे पोट आलें होतें आणि तेंच कारण तिला ठार मारण्यास झालें असा वहिम होता. आरोपी तर्फे वकील रा. रा. लक्ष्मण गोविंद ओक हे होते.

गेल्या शुक्रवारीं उमरावतीस रा. रा. दत्तात्रय वासुदेव गोखले सब रजिष्ट्रार, चांदूर यांचा पुनर्विवाह गतभर्तृका श्रीमती लक्ष्मीबाई यांच्याशी समारंभानें यथासांग झाला. पुनर्विवाह सुधारणेचें मुख्य अंग आहे तेव्हां ही सुधारणेची उच्च उडी उभयतां प्रौढ वधूवरांस यशदायक व श्रीदायक होवो असें आह्मी इच्छितों.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं येथील वेदशास्त्र संपन्न रा. रा. धोंडभटजी बिन नारायण भटजी यांस गेल्या शनिवारीं अतिसाराच्या विकृतीनें देवाज्ञा झाली. हे चांगले विद्वान असून आमच्या शहरचे प्रमुख भिक्षुक होते व यजुःशाखेंत यांचें प्राविण्य वर्णनीयं होतें. गृहस्थ चांगला सज्जन सरळमार्गी असे. मरणसमयीं ६० वर्षांवर वय होतें. काशियात्रेच्या प्रवासामुळें अतिसाराची बाधा झाली असें ह्मणतात. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो!

यंदा एल. एम. ॲंड एस च्या परीक्षेंत २० विद्यार्थी पसार झाले त्यांत वऱ्हाडचे गृहस्थ रा. रा. त्रिम्बक वामन जोशी हे एकटेच पसार झाले आहेत हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. भालचंद्र चिंतामण केतकर, ग्वाल्हेर. यांनीं विलायतच्या प्रवासाची माहिती काल सांगितली हे मुंबईच्या टेक्निकल इनास्टिट्यूट यथें शिकलेले असून त्याच विषयाच्या अभ्यासा निमित्त विलायतेस गेलें होते.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं खाली सही करणार यांचा सखा चुलत भाऊ छोटेराम वल्लद दधुसिंग हा अज्ञान असून तो आमच्यापाशी रहात असतो. याची आई मनियाबाई ही जातिभ्रष्ट असून इतर गैरवर्तनामुळें छोटेराम यांचें पालन करण्यास व त्याचा स्थावर जंगम इस्टेट संभाळण्यास नालायक आहे. अज्ञानाचें पालणपोषण व त्याच्या इस्टेटीची व्यवस्था खाली सही करणार हे करीत असतात, तर या लेखानें सर्वांस जाहिर केलें जातें कीं अज्ञानाच्या इस्टेटी संबंधाचा कोणताहि व्यवहार खाली सही करणाऱ्याच्या रुजुवाती शिवाय करूं नये. जर कोणी देवघेव करील तर ज्याचा तो जबाबदार राहिल. त्याची तोशीस इस्टेटीला लागूं होणार नाही. कळावें तारीख १८ माहे दिसेंबर सन १८९८ इसवी.

( सही )

बजरंग वल्लद हिरामण लहरीये

राहणार घुसर तालुका

अकोले दस्तुर खुद्द.

## NOTICE

*Notice under Section 44 (2) of the Berar Municipal Law:—*

Is hereby given that at a special meeting of the Ellichpur Civil station Municipality held on 10th December 1898 the Municipal Committee of Ellichpur Civil station have passed a resolution to propose the imposition under section 41 (1) A (b) of a tax on persons other than agriculturists practising any profession or art or carrying on any trade in the Municipality whose income is not less than Rs. 100 per annum and calculated at the rate of one and half percentum on the taxable portion of his income derived from such profession or art or trade.

*Provided that:—*

I Rs. 99 the maximum non—taxable income shall be deducted from the full annual income of each assessee and the tax shall be calculated on the remainder.

II. All payments made on a/c of pensions or provident Funds or in the case of persons who effect life insurances the amount payable as premium (when such payments or amounts do not exceed one sixth of the full annual income) shall also be deducted from the full annual income and the tax be calculated on the remainder.

III When one and half percent on the assessable portion of the income involves a fractional part of a rupee which is less than eight annas, then eight annas shall be the amount of the fractional part to be collected; and when one and half percent on the assessable portion of the income involves a fractional part of a rupee which is greater than eight annas then one rupee shall be collected instead of the fraction.

2. The assessments shall be made by a sub—Committee of the Municipality subject to the sanction of the general Municipal Committee.

3 When the list of assessments is ready a notice by tomtom and in the local newspaper shall be given to the public and the list shall be open to inspection at the Municipal office.

4. Objections to assessments shall be received and considered by the sub-Committee aforesaid if presented in writing within one month from the publication of the list of assessments.

Any inhabitant of the Ellichpur Civil station Municipality objecting to the above described-tax may submit his objection in writing to the Committee of the Ellichpur Civil station within 30 days from this date. His objection will be considered by the Committee at a special meeting which will be held after that period.

Ganesh Nagesh
Secretary

15th December
1898.

R. D. Hare
Chairman
Ellichpore Civil
Station
Municipality.

## वर्तमानसार

दैविक चमत्कार—मद्रास येथील टाइम्स पत्रांत अशी एक आश्चर्यकारक बातमी प्रसिद्ध झाली आहे कीं, मद्रास प्रांतांत एका गांवीं एक मारुतीची मूर्ति आहे. अलीकडे थोड्या दिवसां पासून या मारुतीच्या नेत्रांतून सारखा आश्रुपात चालला असून मारुतीरायाचे दोन्ही डोळे सदोदीत पाण्यानें भरलेले दिसतात. हा प्रकार पाहून तत्प्रांतीय लोक मोठ्या काळजींत आहेत. हा काय प्रकार असेल तो असो.

प्लेग रोगाविषयीं देवी भागवतांतील हवाला.–हैद्राबाद संस्थानांतील प्लेग आफिसर मि. स्टीव्हन्स यानीं आपल्या मोठ्या साहेबांस प्लेगच्या संबंधानें २८ नवंबर रोजीं एक रपोट केला असून त्यांत देवी भागवत पुराणांतील संस्कृत वचनांचें इंग्रजी भाषांतर दिलें आहे. हा लेख मुंबई येथील साप्ताहिक पत्रांत आला आहे तो महत्वाचा समजून खांडव्याच्या सु. सिं. त थोडक्यांत घेतला आहे तो आह्मीही जसाचा तसाच वाचकांच्या माहिती करितां येथें देतों.

१. या शतकांत प्लेगचे रोग सुरू होतील.

२. घरांत उंदीर मरणें हें त्याचें दर्शक हाय.

३, त्याला उपाय घर सोडणें हा आहे आणि पुनः घरांत येण्या पूर्वी घराची शुद्धि केली पाहिजे.

देवी भागवतांतलि उतारा:–देवीभक्त हे तिची अशी प्रार्थना करतात कीं, हे देवी तूं लोकांची नाशकर्त्री कोणत्या रूपानें होणार तें आह्मांस अगाऊ कळीव.

देवी ह्मणते:–कलियुगांत (चालू शतकांत) जगोत्पन्नकर्ता ब्रह्मदेव यांनीं मला उत्पन्न करून असा हुकूम केला आहे कीं, हे मुली हे माझे शद्ब ऐक आणि त्याप्रमाणें वर्तन कर कलियुगांत राजे व प्रजा पापकर्मी होतील या करितां तूं पृथ्वीवर जा आणि दुसऱ्यांची मिळकत हरण करणाऱ्यांच्या मिळकतीचा नाश कर, आणि स्त्रियांची अब्रू घेणार, जुलूम करणारे व अशाच प्रकारचीं पातकें करणाऱ्यांचा नाश कर.

पृथ्वीचा उत्पन्न कर्ता, व इतर देव यांनीं असा हुकूम केला असल्या मुळें मी आतां पृथ्वीवर येईन. आणि राजे व प्रजा यांचीं पातकें अवलोकन करण्याकरतां शहर व गांव यांत फिरेन. आणि तशा पातकी लोकांचा संहार करीन अशा रीतीनें सर्व जगभर व्यवहार करून नंतर मी आपल्या स्वस्थानीं आकाशांत जाईन.

उंदीर मरूं लागलें ह्मणजे तेथें माझें आगमन झालें असें शहाण्या व धार्मिक लोकांनीं समजावें. आणि लागलींच घर सोडून जंगलांत जाऊन रहावें.

तेथें गेल्यावर ओंनमो भगवती महामारिके सुरपुरुपिणी सहकुटुंब महामाया ॥ या मंत्राचा पुढील विधीनें रोज एक हजार जप करावा, तो असा कीं, शुद्ध जलाशयाचे काठीं गुडघे टेंकून वीरासन घालून ओंजळींत उदक घेऊन शुद्धांतःकरणानें व एकाग्रचित्तानें खालीं मान घालून वरील मंत्राचा जप करावा आणि तेथें माझी मूर्ति स्थापून धूपदीपानीं माझी पूजा करून नैवेद्य दाखवावा. भातावर चिंचेचें सार घालून व तूप घालून बळी द्यावा. ब्राह्मण व नातलग यांस जेऊं घालावें. नंतर सर्वांनीं शुचिर्भूतपणानें वरील मंत्राचा उच्चार करून पुढील प्रमाणें प्रार्थना करावी, हे सर्व देवींच्या देवी मी तुझ्यापुढें अति नम्रपणें प्रार्थना करतों कीं सर्व काळ मजवर कृपादृष्टि ठेव. तूं सर्वांना भीतिदायक आहेस. कैलास, हिमालय व गंधमादन या पर्वत शिखरांवर राहणारी आहेस, मांस व दारू हें तुला फार आवडणारे पदार्थ आहेत. तुझे पुष्कळ दूत तुझ्या हुकूमांत आहेत. तूं सर्वांचा नाश करण्यास समर्थ आहेस. हे अशा महा पराक्रमी, देवी माझें रक्षण कर, मी व माझें कुटुंब यांचें सर्वकाळ व सर्व ठिकाणीं रक्षण कर. माझ्या घरीं नेहमीं सणसोहळे होतील अशी नेहमीं खटपट कर. याप्रमाणें नेहमीं प्रार्थना करून नंतर भोजन करीत जा.

प्लेगला गांवांतून जितके बळी घ्यावयाचे तितके घेणें झाल्यावर आणि गांवांत रोगाची शांतता झाल्यावर घराचें शुद्धिकरण करून देवीची प्रार्थना करून विधिपूर्वक गृहप्रवेश करावा. घरीं राहवयास आल्यावर ब्राह्मण भोजन घालून माझें संरक्षण कर अशी प्रार्थना करावी. इतकें केल्यावर प्लेगपासून कांहीं उपद्रव होणार नाहीं अशी खात्री बाळगावी. ना० व. टा०

एंजिनचा जोर.—पेन्सिल्व्हानिया मधील रेल्वे रस्त्यावर थोडे दिवसांपूर्वी एक पाऊण मैल लांबीची खच्चून भरलेली ट्रेन ११८ टनवाल्या एंजिनानें ओढून नेली।

रशियन राजवेत्र.—रशियाच्या बादशाहाचें राजवेत्र कांठीं निखालस सोन्याची भरींव असून तीन ३ फूट आहे. तिला २६८ हिरे, ३७० माणकें, व १५ पाचू लावले आहेत. इतक्या मोलाचे राजवेत्र इतर कोणत्याही राजसत्ताधारीच्या जवळ असल्याचें माहीत नाहीं.

केरो यूनिव्हर्सिटीमध्यें हल्लीं ११००० विद्यार्थी अभ्यास करीत आहेत! एकाच यूनिव्हर्सिटीमध्यें इतके विद्यार्थी असलेली अशी जगावर दुसरी यूनिव्हर्सिटी नाहीं. इतकेंच नव्हे; तर कोंणत्याही दोन यूनिव्हर्सिट्या मध्यें असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षांही वरील यूनिव्हर्सिटींतली संख्या पुष्कळ जास्त आहे.

पत्र बंद होणार.—आज ५० वर्षे चाललेलें 'होम न्यूज' नांवाचें इंग्लंडांतलें पत्र येत्या नव्या वर्षापासून बंद होणार असें कळतें. सदर पत्र, १८४७ स. लीं निघालें. बंद होण्याचे कारण काय तें समजलें नाहीं. बहुतकरून लोकाश्रयाची वाण हेंच असेल.

एकवीस मुलांचा बाप!–केंट कौंटी (इंग्लंड) मध्यें राहणाऱ्या एका गृहस्थावर कांहीं खटला होऊन त्याची चौकशी माजिस्ट्रेट पुढें चालली असतां असें कळलें कीं आरोपि हा २१ मुलांचा बाप आहे. तीं सर्व मुलें त्याला एकाच बायकोपासून झालीं असून ती सर्व जिवंत आहेत! येवढा कुटुंबवत्सल गृहस्थ कोणी असल्याचा दाखला कोठेंही ऐकण्यांत व पाहण्यांत नाहीं,' असें सांगतात! ईश्वराचें देणें दुसरें काय?

खंबीर वधू–एका तरुण इंग्लिश कुमारीनें आपला योजिलेला वर किती इमानी व प्रामाणिक आहे हे बघण्यासाठीं मुद्दाम आपल्या गांवाहून निघून लंडन शहरांत जाऊन तेथें तपास केला. तों तिला तो लंडनच्या रस्त्यांत एका तरुणीचा हात धरून जात असलेला आढळला; तेव्हां तिनें हातांत असलेल्या चाबकानें त्यास इतका बडविला कीं, रस्त्यांनें जाणारे लोक तें तिचें संतापावेशांतलें कृत्य पाहून अगदीं थक्क झाले! असल्या खंबीर वधू निर्माण झाल्याशिवाय बाहेरख्याली पुरुषांचीं वर्तनें सुधारणार नाहींत, हें उघड आहे.

पादशकटारोहणपटु प्रवृद्ध स्त्री—डन्मौ (इंग्लंड) येथें एक ९३ वर्षांची अतिवृद्ध स्त्री आहे. ती पायगाडीवर बसून आपल्या गांवापासून जवळच्या शहरांत बाजारहाट करण्यासाठीं जात येत असलेली बघून तिकडील पत्रांनीं मोठे आश्चर्य दाखविलें आहे, व तें बरोबर आहे. इतक्या वृद्ध वयांत नवीनच प्रचारांत आलेल्या पायगाड्यांवर बसून त्यांत नैपुण्य संपादन करणाऱ्या हौशी पणजीबाईविषयीं कांणीहि आश्चर्योद्गार काढल्यावांचून राहणार नाहीं. अशा हौशीच्या बाया तर काय परंतु पुरुषही इतक्या वयांत आमचेकडे दृष्टीस पडण्याचें अशक्य आहे. हा कालदेशस्थलमहिमा!

ज्ञा०

हुंडणावळीचें आलाउन्स– युरोपियन अधिकाऱ्यास पगारावर आणखी हुंडणावळ ह्मणून ज्यास्त आलाउन्स देण्याची रीति लार्ड लॅन्सडाऊन याचे कारकिर्दीत सुरूं झाली ती अद्यापि सुरूं असून तीस आणखी ज्यास्त बळकटी मिळूं लागली आहे. ही चाल इतर कोणत्याही देशांत नसून युरोपियन अधिकाऱ्यास इकडे जसे भरपूर पगार देण्यांत येतात तसे कोठेंही देण्यांत येत नाहींत भरपूर पगार मिळून आणखी आलाउन्स मिळूं लागल्यावर तो घेण्यास कोण नको ह्मणेल? भारी पगार व त्यावर आणखी आलाउन्स यामुळें हिंदुस्थानची प्रजा अगदीं निकृष्ट स्थितीला पोहोंचली आहे. सरकार काय करतें हें प्रजाजनास बरोबर कळत नसल्यामुळें जें कांहीं होतें तें न्यायानेंच होतें असें ह्मणुन लोक स्वस्थ बसतात. त्यापासून हिंदुस्थानचें किती नुकसान होत आहे याचा जर सर्वांनीं विचार केला तर अगणित फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं. या गोष्टीची आज आठवण होण्यास हुंडणावळीच्या आलाउन्सासंबंधानें गेल्या पांचव्या तारखेस सरकारचा एक नवीन ठराव प्रसिद्ध होऊन आणखी कांहीं अधिकाऱ्यांस ता. १ एप्रिल सन १८९७ इसवीपासून ज्यास्त आलाउन्स देण्यांत येणार असल्याचें ठरविलें आहे. ही मुदत फार जवळच नेमली ह्मणावयाची. हिंदुस्थान सरकारास जें कांहीं करावयाचें असेल तें त्यानीं एकदम करून टाकिलें असतां हिंदुस्थानवासी लोकांकडून त्यांस कोणत्याही प्रकारचा अडथळा होणार नाहीं. लार्ड एल्जिनसाहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें तरवारीच्या जोरावर राखण्याच्या राज्यांत युरोपियन अधिकाऱ्यांना व सरकारास हिंदुस्थानचें वाटेल तें करूं शकता येईल.

---

## जाहिरात

सर्वत्र सावकार लोकांस व इतर लोकांस जाहिरात देण्यांत येते कीं रामजी मेघजी व मोती रामजी यांस आमचे सहीची चिठ्ठी असल्यास रुपये द्यावे अगर चिठ्ठी नसल्यास रकम देऊं नये अगर दिल्यास त्या बदल आह्मी जोखीमदार नाहीं. व रुईचे किंवा कपासीचे व कोणत्याही आकड्या संबधानें रुपये देऊं नये. कळावें. ता० १२-१२-९८ इसवी.

(सही) नारायणजी रायभानजी
पाटील दुकान आकोला दस्तुर सूर्यभान
सोनाजी पाटील.

---

नोटीस

नोटीस बेशमी धनाजी वल्द गणाजी सावकार जात कुणबी राहणार आवोडे तालुके अकोट यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची भाची नामे कवतीक इसी व मसी लग्न होण्यास सुमारे दाहा वर्षे झाली सुमारे दोन वर्षां पासून ती आपले वयांत आली, वयात आल्यावर पांच साहा महिने ती माझे घरी होती नंतर तुह्मी तिजला आपले घरी घेऊन गेले नंतर एक दोन वेळ मी स्वतः व एकदा श्यामु भाऊ व बाबुसा असें उभयतास तुमचे घरी माझें कुटुंबास पाठवावें याजकरितां घेऊन आलो होतो परंतु तुह्मी तिजला नज समागमे पाठविले नाहीं पुढें तुह्मी मजवर अन्नवस्त्रा करितां दावा कराल तर त्याचा जबाबदार मी होणार नाहीं तरी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझे बायकोस माझे घरी आणून घालावे त्या प्रमाणें न आणल्यास बायको ताब्यांत देण्याबद्दल तुमचेवर दिवाणीत फिर्याद करणें भाग पडेल व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल व फिर्यादीचाहि खर्च तुमचेवर बसेल कळावें, तारीख १२।१२।९८ इसवी.

सही
संपत वल्लद रामजी राहणार
जैनपूर दस्तुर खुद.

---

नवीन.

## क्रिमिनल प्रोसीजर कोड,

### सन १८९८ चा आक्ट ५.

सटीक. (आवृत्ति ४ थी.)

चारी हायकोर्टांचे निवाडे, मुंबई हायकोर्टानें केलेले वटहुकूम व विशेष समजुतीच्या टिपा आणि खेरीज जरूर लागणारे फौजदारी आक्ट सुमारे १४ यांसह छापत आहे. सन १८९९ सालचे मार्च अखेर तयार होईल. ता० १५ जानेवारी सन १८९९ चे आंत आगाऊ किंमत भरणारास किंवा व्ह्याल्युपेएबलनें मागविणारास टपाल खर्च सुद्धां रुपये ५ पडतील. मागाहून घेणारास टपाल हांशील सुद्धां रुपये ७ पडतील.

पुणें न्यायाश्रय आफीस. ता० १०।११।९८
नरहरराव त्रिंबक राजमाचीकर.
शिवराम हरी साठे

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTER No. N 4.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........०१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....०१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy .................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line. ..3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 26 DECEMBER 1898 NO 50

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख २६ माहे डिसेंबर सन १८९८ इ० अंक ५०

### प्रभात.

घें घें करी सागर घोर घोष ।
समोंवती गर्जित हे प्रदेश.
स्वसूनुमाम्राजपदच्युतीला ।
पाहोनि हा क्षुब्ध जणूं जहाला. १
नाना तऱ्हेचे खग हे अनंत ।
आलापिती मंजुळ सुस्वनांत.
येणार आतां नृपती नवीन ।
गंधर्व गाती गुण हे म्हणुन २
ईशारतवार्ते जन चालविती ।
महात्म याचें मनिं वागविती.
जीवां रवीचें शुभ राज्य व्हावें।
हे यांचिती ते जणुं काय भावें. ३
साऱ्या जनांनीं त्यजिला बिछाना ।
हुंगाविना वस्त्र कुठें दिसेना.
भूपद्वयीं संगर होय त्यांत ।
वाटे प्रजा नागविली समस्त. ४
नाथावरी नित्य कुनार रुष्ट ।
मांडे प्रभातीच उठोनि नष्ट.
सुराज्य तैसें असुनीहि पुष्ट ।
उमे करी नित्य नवीन बंड ५
पतिव्रता जाणुनि ही सुवेळ ।
नाथा सवें बोलतसे सुबोल.
फळें सुराज्योद्भव दृश्य होती ।
संपी सुखी जेथिल लोकवस्ती. ६
पुरींतलें सिंचित मार्ग केले ।
न धूळ कोठें पुर स्वच्छ झालें.
आला जणूं काय रवि प्रधान ।
शृंगारिली ही नगरी म्हणून. ७
रात्रीं पहाऱ्यावर चौकीदार ।
त्यांचा करी नायक फेरफार.
बिदा जुने वीर करूनि जेवीं ।
राजा नवी फौज भरून ठेवी. ८
प्रासाद देवालय पूर्वदेश ।
वाद्यध्वनीनें विलसे विशेष.
वार्ता जणूं ऐकुनिया जयाचि ।
चाले तयारी प्रभु स्वागताची. ९
होतां खुली वेस पथाक्रमाया ।
लागे प्रवासीजन हर्षुनीया.
सरूनि सेवी जठराग्निवास ।
प्राणी करी संचरुनी विलास. १०
अर्के प्रभें बर्फ जसें द्रवूनी ।
प्रवाह जाती सगळ्या दिशांनीं
मार्गें तसें हे निघती प्रवासी ।
प्रवाह रूपीं गमती मनासी. ११
उतावळे कैक पुढें निघाले ।
पुढील मार्गे जन ते जहाले.
पृथ्वी शनीच्या निघता पुढारां ।
तो वक्र भासे जणुं होय तारा. १२
उतावळीनें पथ चालतात ।
थकोनि ते पार न पावतात.
कामांत घाई सगळ्याच दावी ।
कशी तया सिद्धि वदा मिळावी. ॥१३॥

१ सूर्य व चंद्र. २ सूर्य

### ॥ श्रीर्जयतितराम् ॥

#### — मंत्र रामायण नं० ९

#### —अयोध्या कांड—

वृद्धपणीं चार पुत्र असून दशरथ राजाच्या मरण समयीं एकही पुत्र नसावा ही दैवाची विचित्र गतीच म्हटली पाहिजे. भरत व शत्रुघ्न हे आजोळी होते त्यांत वसिष्ठ मुनीनें दूत पाठवून आणविलें व

तातें
केलें स्वर्गमन, तुला अर्पूनिया सर्व भूमि

या प्रमाणें भरतास कळविलें राजा आजारी नसताही एकदम मरण पावला व तेथें आपला ज्येष्ठ बंधु रामही नाहीं, व राज्य आपणांस अर्पण केलें हा गोंधळ आहे तरी काय हें त्यास कांहींच उमगेना. वसिष्ठ मुनीनें त्यास सर्व वृतांत विदित केला. व या घोर कृत्यांत प्रधान भाग आपल्याच जननीचा आहे असें लक्षांत आल्या बरोबर पितृभक्त व भ्रातृवत्सल भरत

दंडाहतभुजग तसा कोपें माते कडे तदा
मुरडे ॥

अर्थात् भरतानें आपल्या मातेची निर्भत्सना फार कठोर शद्बांनीं केली. भरताचा हा अधिक्षेप व कौसल्येच्या तो पायावर लोळत असतांना तिनें केलेला सापत्न्यमत्सरभावहीन विलाप हें दोनहीं प्रसंग या रामायणांतील उत्कृष्ट प्रसंगापैकीं होत.

भरताची मातृनिर्भत्सना

‘ प्रिय वधिला पापिष्टे ! धाडुनि विपिनासि
सद्गुणकरंडा ।
केली अकीर्ति आपण झालिस, पापाशये
स्वयें रंडा ॥१॥
मारावें तुज पापे ! परि म्हणतो रामराय
माय तुला ।
यास्तव उपाय नाहीं, गरलाची तुजचि योग्य
काय तुला ॥२॥
यमकार्य कारिणी तू कृत्या, मोहूनि यास
विश्वास ।
पत्नी होउनि गिळिला राजा, माझा पिता,
सविश्वास ॥३॥
ऱ्ही श्री दया जयाच्या ठायीं जो स्तुत्य
या जनामाजी ।
त्याला वनासि धाडुनि केली तू काय कामना
माजी ॥४॥
तू राक्षसी पैंसाहि अधमा जे निज कुटुंब
खातीस ।
मीही पाप तुझा सुत ’ हें बोलें काय
पारखा तीस ॥५॥

वरच्या अवतरणांतील प्रत्येक शद्ब मोठा खुबीदार आहे. सद्गुण करंडास विपिनवास व त्यामुळें संपादित केलेली अकीर्ति, व स्वतःवर ओढून आणलेलें दैन्य हीं थोडक्यात वर्णिली आहेत ती फार हृदयद्रावक व सरस उतरलीं आहेत. या महदपराधास देहांत शिक्षाच होय परतु जननीला कां मारवत नाहीं यांचें कारणः—

परि म्हणतो रामराय माय तुला

हें फार कोमल शद्बानें ग्रथित केलें आहे. पुढें कैकेयीस दिलेली सर्पिणीची उपमा फार सुरेख उतरली आहे. दूध प्यावयास दिलें गरळ ओकणारी सर्पिणी व वृद्धावस्थेंत जिच्यावर सर्व प्रेमबंध होता तीच त्या राजाच्या नाशास कारण हें साम्य कोणाच्या लक्षांत येणार नाहीं? तसेंच तीस शेवटीं राक्षसीहूनही अधम म्हटले आहे तें ही सर्वांच्या लक्षांत आले असेल व सरते शेवटीं

मीही पाप तुझा सूत

इतकेंच बोलून तो थांबला. कारण तेथें कौसल्या होतीच. न जाणो आपण कांहीं बोललों तर जनास सवती मत्सर वाटेल म्हणून ती इतका वेळ एक शद्बही बोलली नाहीं परंतु भरताच्या मनांत कांहीं निराळेच विचार तरंग चालले होते. मातेचें हें विपरीत वर्तन, आपलें त्यावेळींच आजोळी जाणें इत्यादि सर्व गोष्टी संशयात्मक होत्या व कदाचित् कैकेयीस आंतून त्यांचेंही अंग असावें अशी शंका आली असती तरी त्यांत कांहीं वैलक्षण्य दिसलें नसतें व म्हणूनच.

विमना भरत करें कौसल्येच्या पदावरि
लोळे ।

परंतु कौसल्या अगदीच साध्या मनाची. तिच्या मनांतहि ही गोष्ट नव्हती व म्हणूनच लागलीच

डोळे उघडुनि, हृदयीं धरुनि, रडे राम
मानसीं घोळे ॥
भिजवी नेत्र जलानें कौसल्या तप्तसूनुचा
काय; ।
तातानिनविश्लेषज्वलनप्रशमार्थ वर्षली
काय? ॥ १ ॥

इतका वेळ कौसल्येनें आपला शोक अगदीं आवरून धरिला होता, न जाणो कैकेयीनें नवीन एखादें भलतेंच किटाळ रचिलें तर कठीण अशा विचारानेंच कीं काय ती साध्वी अगदीं स्तब्ध बसली होती. परंतु आतां वसिष्टादिक पुष्कळ वृद्ध व पूज्य मंडळी जमल्यावर तिच्यानें धीर धरवेना व

जळ तुंबता तडागीं फोडावा लागतो जसा
पाट ।

त्या प्रमाणें तिनें आपल्या शोकास आतां अगदीं मोकळी वाट दिली.

कौसल्येचा विलाप.

शयन तुझ्या तातानें केलें, घसला खरा
जनावरता ।
याला समजावीसा कोण असें ? बालका
सुखावरता ॥१॥
त्या राघवें पुरीला वियोग दिधला, नृपेंहि
धरणीला ।
ईर्ष्या पुत्रासह ही केली कीं बाखवूनी
करणीला ॥२॥
गमन रघुवरें केलें कैकय्याज्ञेवरूनि
अटवीला ।
काला ज्ञेनें जाउनि भूपें स्वर्गासि लोक
फटवीला ॥३॥
भुजनिर्जितारिवृंदे! वत्सा जनकें तु श्याचि
उद्दंड ॥
एकाच्या अपराधें केला सर्वांसि सारखा
दंड ॥४॥
काय करूं वैधव्य ज्वलन ज्वालांतरी तनू
न जळे ।
न कळे पातक केलें कोण? असा शोक ज्यामुळें
उजळे ॥ ५ ॥

कवीनें वर दिलेले दोन ही प्रसंग फार सुरेख वर्णिले आहेत. पहिल्यात पितृनाशानें क्रुद्ध झालेला भरत आपल्या मातेस निर्भत्सनापर शद्ब बोलतो व दुसऱ्यांत पोक्त मनाची कौसल्या आपल्या शोक पूर्ण हृदयास वाहण्यास अवसर देत असतांना सुद्धां त्यांतच सौम्य शद्बानें भरताचे समाधान करूं पाहते हा विशेष ध्यानांत ठेवण्या सारिखा आहे कारण कवीची कर्तबगारी यांतच विशेष नजरेस येते.

वरील दोनही प्रसंग सुंदर, चित्तवेधक, सहृदयांतःकरणास तदाकार करणारे व केवळ शोकरस भरित आहेत हें मर्मज्ञ वाचकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं. मातेची अवहेलनात्मक निर्भर्त्सना करण्याचा प्रसंग आपल्या प्राकृत कवीसच आला आहे असें नाहीं मनुष्य स्वभाव वैचित्र्याचें केवळ भांडारच अशी जी प्रख्यात आंग्ल कवि शेक्सपिअरकृत अपूर्व नाटकमालिका आहे त्यांतही याच मासल्याचा परंतु भिन्न रीतिभातीमुळें किंचित् भिन्न असा प्रसंग आहे, तोही खालीं देतो.:—

डेनमार्क देशाचा राजपुत्र ह्यामलेट हा आकस्मिक स्वकीय पितृनिधनामुळें अत्यंत विषण्णमानस झाला होता. बापाची निरामय प्रकृति असून एकाएकी त्यास मृत्यु प्राप्त झाला तेव्हां यांत कांहीं तरी कृष्ण कारस्थान असावें असा त्यास मधून मधून अंदेशा मात्र येई परंतु निश्चय होईना. या गोष्टीस तीन महिने लोटले नाहींत तोंच त्याच्या आईनें त्याच्या चुलत्याशी द्वितिय शरीर संबंध केला. ह्यामलेट याचा बाप जितका मनोहराकृति, उदार बुद्धीचा, धीर प्रकृतीचा, शौर्यवीर्यादि गुण मंडित होता, तितकाच त्याचा चुलता कुरूप, क्षुद्रबुद्धिचा व नीच स्वभावाचा परंतु अतिशय कुटिल असा होता व म्हणूनच ह्यामलेट यास आलेला हा संदेह साधार होता यांत संशय नाहीं ह्यामलेट हा सुशिक्षित असल्यानें पिशाचरूपी पित्यानें स्वनिधनाचा सविस्तर वृत्तांत सांगितला असतांही त्याच गोष्टीचा त्यानें अन्य रीतीनें प्रत्यय पाहण्याचा निश्चय केला. हा त्याचा हेतु फलद्रूप झाला व चुलत्याच्या

विश्वासघातुक प्रकृति विषयीं त्याची चालंवाल खात्री झाली व तो आतां या घोर कृत्याचा सूड उगविण्याच्या नादास लागला. सूड घेणें हें एक प्रकारानें त्याचें कर्तव्यकर्म होतें व असल्या भीषकर्मी चुलत्याचें पारपत्य केलें असतें तर तो पितृऋणांतून मुक्तच झाला असता; परंतु शिक्षणाचा त्याच्या मनावर जो विलक्षण परिणाम घडला होता त्यामुळें त्याच्या मनास जणो काय स्थैर्यच नव्हतें. जो ह्यामलेट एक वेळ चुलत्यास शासन करण्यास केवळ तत्पर झालेला दृष्टीस पडला तोच ह्यामलेट दुसऱ्या क्षणीं जणो काय या विचार प्रत्याघातानेंच विगाळितधैर्य होऊन हताश झालेला दृष्टीस पडतो. जो आपली दयिता मेलेली असतानां व तिचा भाऊ पुष्कळ कर्णकटु शद्ब बोलेलेला असतांना सुद्धां त्याच्याशी द्वंद्व युद्ध करण्यास काकू करितो तोच पुढें त्याच्या सविष खड्गलतेनें त्यास प्रहार करावयास उद्युक्त होतो. जो ह्यामलेट आपला चुलता ईश्वराची प्रार्थना करण्यांत गुंतला आहे असें पोकळ मनाचें समाधान करून त्यास शासन करण्याची अमोल्य संधी दवडतो, तोच पडद्या आड राजा आहे या संशयावरून तिसऱ्याच मनुष्यास ठार मारतो व आपली चूक घ्यानांत आल्यावर सुद्धां त्याच्या मनास कांहीं विशेष वाटत नाहीं पंरतु या रीतिनें मनाचा अनिश्चितपणा होऊन परस्पर विरुद्ध अशीं कार्यें नायकाच्या हातून घडावींत हाच या नाटकाचा मोहकपणा होय, व ह्मणूनच अखेर त्याच्या हातून चुलत्याचा वध न होता अन्य रीतीनें त्यास मृत्यु आला!

पुढें चालूं

वऱ्हाडसमाचार

भित्ती मार्गशीर्ष शुद्ध १४ शके १८२०

राष्ट्रीय सभेची तयारी कडेकोट झाली आहे. त्या इलाख्यांत सभांची गर्दी उडाली असून सर्वत्र राष्ट्रीय महोत्सवाची मोठी गडबड दिसत आहे. नामदार एन. सुब्राव हे स्वागत कमिटीचे अध्यक्ष असून त्यांस राष्ट्रभक्तांची मदत दांडगी आहे. राष्ट्रीय सभा मद्रासेला तिसऱ्यानें भरत आहे. १४ व्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष बाबू आनंद मोहन हे खरे देशभक्त असून मोठे अप्रतिम वक्ते आहेत. त्यांची विद्वत्ताही वर्णनीय कोटींतली आहे. विलायतेस जाऊन त्यांनीं जी राष्ट्रसेवा केली ती लोकांच्या डोळ्यासमोर उभीच आहे. मद्रास रेलवेवाल्यांनीं १ ल्या वर्गाच्या उतारूं कडून २ ऱ्या वर्गाचें भाडें व २ ऱ्या वर्गाच्या उतारूं कडून निम्मे भाडें घेण्याचा विचार केला आहे. ही सवलत इतर रेलवे कंपन्या देतील तर मोठा लाभ होईल. वऱ्हाडांतून जाणार प्रतिनिधी थोडेच निघतील हे आह्मी जाणून आहों. मद्रासेस जाणाऱ्या प्रतिनिधींच्या कमतरतेमुळें प्रतिनिधी निवडण्याची जाहिर सभा भरविण्याचा सुद्धा कंटाळा आकोल्याच्या मंडळीनें केला नाहीं ही मोठी चूक होय. राव साहेब देवराव विनायक यांनीं प्रापंचिक मार्ग टाकल्यामुळें आमच्या जिल्ह्याची राजकीय बाजूच लंगडी पडली आहे. उमरावतीहून रा. रा. खापर्डे, जोग, मुधोळकर, जोशी इत्यादि गृहस्थ मद्रासेला गेले आहेत यंदाच्या राष्ट्रीय सभेला विघ्नें होतीं अनेक परंतु सत्कार्याच्या वीरश्रीनें सर्व मंगलकार्य शेवटास जात आहे ही परम संतोषाची गोष्ट होय.

---

सानिटरी कमिटी नांवाची एक संस्था तेल्हाऱ्यास आहे. ही संस्था ह्मणजे त्या गांवच्या प्रतिष्ठित गृहस्थांची एक आरोग्यरक्षक मंडळी होय. या मंडळीचीं सर्व कामें येथील जिल्हा बोर्डाच्या अंमलाखालीं चालतात ही मंडळी ह्मणजे साधारण छोटेखानी मुनिसीपालिटीच आहे. गांवांतील स्वच्छता राखण्याचीं कामें करण्यासाठीं ही मंडळी गांवकरी लोकांपासून ज्याच्या त्याच्या ऐपती प्रमाणें एक वर्गणी गोळा करितात आणि त्या पैशांतून गांव सफाईच्या कामांचे खर्च चालवितात. गांवचा मैला व केरकचरा गांवांत राहूं न देणें, तसेंच सर्व प्रकारचें सांडपाणी गांवांतच सांचू न देतां त्याचा निकाल गांवा बाहेर काढून देणें, आणि पिण्याचें पाणी स्वच्छ व विपूल मिळेल अशी व्यवस्था ठेवणें या तीन गोष्टी ह्मणजे गांवसफाईचीं मुख्य अंगें होत. या शिवाय इतर किरकोळ कामें पुष्कळ असतात हीं सर्व कामें तेल्हाऱ्याची आरोग्यरक्षक मंडळी फार नामी करितात आणि त्या गांवची सफाई नियमित व थोड्या फंडांत फार चांगली राहते असा अनुभव तेल्हाऱ्याचे सत्र नञ्ज रा० रा० देवराव जयकृष्ण यांच्या मोठ्या कर्तबगारीनें आला आहे.

तेल्हाऱ्या सारख्या इतर गांवीं अशीच आरोग्यरक्षक मंडळी स्थापित करावी असा मे. रुस्तुमजी फर्दूनजी साहेब यांचा विचार आहे. जेथें मुनसिपालिटी नाहीं अशीं साधारण मोठीं गांवें आकोला जिल्ह्यांत बाळापूर व नळगांव आहेत. दोन्हीं ठिकाणें तहशिलीचीं सदर टाणीं आहेत. बाळापूरच्या व नळगांवच्या शिष्ट संभावित सुखवस्तु लोकांस आपल्या मुलाखतीला बोलावून त्यांस आरोग्यरक्षक संस्थेचे हेतु कळविण्याची खटपट मे. रुस्तुमजी साहेबांनीं चालू केली आहे. त्यांच्या प्रयत्नाला यश चांगलें येईल अशी आह्मास उमेद आहे. बाळापूर व नळगांव हीं दोन्हीं गांवें सध्यां मोडकळीला आलीं आहेत आणि उत्तरोत्तर त्यांचा ऱ्हासच होत चालला आहे. लोकवस्ती नवीन वाढण्याचा संभवही दिवसेंदिवस कमीच आहे. गांवचें महत्व वाढविणाऱ्या गोष्टी ह्मणजे सरकारी कचेऱ्या किंवा व्यापार धंद्याच्या सोयी अशा दोन प्रकारच्या असतात. या दोन्ही बाजूंनीं हीं गांवें मागसल्या मुळें त्यांची स्थिती नेटनेटकी ठेवण्या विषयीं सरकारला मोठी काळजी आहे. ऱ्हास पावत चाललेल्या गांवची सफाई व स्वच्छता ठेवण्याची गोष्ट मोठी कठीण आहे. तेल्हाऱ्याची स्थिती मरमराटीची असल्या मुळें तेथील आरोग्यरक्षक मंडळी चांगली चालली आहे. परंतु नळगांव व बाळापूर येथील अडचणी इतक्या जबर आहेत कीं सानिटरी कमिटी स्थापित करणें व ती सुयंत्रपणें चालविणें हें कांहीं सोपें काम नाहीं. मोडकळीला आलेल्या गांवांत सुखवस्तु पैसेकरी लोकांची वस्ती लहानशी असते ह्मणून गांव सफाईच्या कामा निमित्त वर्गणी जमविण्याचें काम अत्यंत प्रयासाचें, असतें. स्वच्छता राखण्यासाठीं पैसा खर्चण्याचें वळणच लोकांस नसतें. तथापि स्वच्छते सारख्या अत्यंत महत्वाच्या बाबी कडे दुर्लक्ष करितां येत नाहीं. लोकांचीं मनें वळवून सरकारच्या इच्छे प्रमाणें सानिटरी कमिटी बाळापूर व जळगांव या गांवीं स्थापित होतील तर फार चांगलें होईल. जिल्हा बोर्डाजवळ हीं गांवें स्वच्छ ठेवण्याला लागणारा पैसा खर्चण्याची ऐपत नाहीं. ह्मणून लोकांच्या राजीखुषीनें व गोडीगुलाबीनें त्यांच्या कडून पैसा जमवून गांव सफाईचीं कामें चालविण्याची खटपट मे. रुस्तुमजी साहेब यांनीं फार चालविली आहे. त्या गांवची दुर्दशा व अस्वच्छता पाहिल्या नंतर चालूं प्रयत्नाचें खरें महत्व तत्काळ कळून येईल. आह्मी अशी उमेद बाळगतों कीं बाळापूरचे व जळगांवचेच सद्गृहस्थ नाहींत तर मोठमोठ्या खेडे गांवचे लोक देखील या नवीन व्यवस्थेचा अंमल आपापल्या गांवीं चालूं करितील आणि अस्वच्छतेला ठाणें मिळूं देणार नाहींत. सध्यां इतर प्रांतीं गांवोंगांवीं प्लेगचा आजार वाढत आहे तर गांवची स्वच्छता ठेवण्या विषयीं योग्य खबरदारी घेऊन आपल्या प्रांतीं प्लेग नाहीं या ईश्वराच्या विशेष कृपेचा लाभ आपण मोठ्या आनंदानें बहुगुणित करूं.

---

## बोर्डाचे मेंबरांची निवडणूक

नंबर. ६

आतां पर्यंत स्थानिक स्वराज्याची अनास्था होण्यास अंशतः सरकार व अंशतः लोक कसे कारणीभूत झाले आहेत याचें दिग्दर्शन केलें. चालू अंकामध्यें बोर्डाच्या सांपत स्थिती संबंधानें थोडासा विचार करण्याचा बेत केला आहे.

" नांव सोनूबाई पण हातीं कथलाचा वाळा " ह्मणतात तशी गत हल्लीं बोर्डाची आहे. या संस्थेचें नांव काय तर " स्थानिक स्वराज्य " परंतु हल्लीं ज्या स्थितींत ही संस्था आहे त्या स्थितींत तरी निदान हें नांव तीस शोभत नाहीं असें, कोणीही कबूल करील.

'राज्य' हा शद्ब ज्या संस्थेला लागतो त्या संस्थेमध्यें राजाला असणारे सर्व अधिकार आहेत असें समजलें पाहिजे. निदान त्यापैकीं कांहीं तरी मुख्य मुख्य अधिकार असले पाहिजेत. मोठ मोठाले अधिकारा बद्दलची गोष्ट तर एकिकडेच राहूं द्या परंतु शुष्काशुष्की अधिकार सुद्धां बोर्डास दिलेले तितपतच आहेत. बोर्डास कोणते अधिकार सरकारनें दिले आहेत असा जर एकाद्यानें प्रश्न केला तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास जरा पंचाईत पडेल यांत संशय नाहीं.

आमचे ह्मणण्याचा अर्थ वाचकांचे नीट लक्ष्यांत यावा या करितां बोर्डाचे अधिकाराबद्दल जरा विशेष रीतीनें स्पष्टीकरण केलें असतां ठीक पडेल असें आह्मास वाटतें.

बोर्डाचे कायद्याचें कलम १२ यांत बोर्डाचे अधिकारांतील कामाची यादी दिली आहे त्या यादींतील कामांचे साधारणपणें दोन मुख्य भाग पाडतां येतील.

( १ ) शाळाखातें, व

( २ ) लोकलफंड खातें.

या पैकीं प्रथमतः शाळा खात्या संबंधानें बोर्डाचा अधिकार कितपत आहे त्याचा थोडासा विचार करूं. हा विचार आपण करूं लागलों ह्मणजे इसाफ नीतींतील डोंगरी प्रसूत होतानां कष्टत होती व तिच्या उदरातून उंदराचें पोर पडलें या गोष्टीची आठवण होते. बोर्डाचे ताब्यांत आद्यशिक्षणाच्या शाळा देते वेळीं सरकारानें आविर्भाव तरी केवढा दाखविला कीं जणूं काय प्रत्येक बोर्डाकडे त्याच्या ताब्यांतील शाळांचा पूर्ण अधिकार देण्यांत आला आहे.

या बाबतींत रेसिडेंट साहेबाचे दोन वट हुकूम आहेत. त्या पैकीं पहिला रेसिडेंसी आरडर नंबर ३१२ सन १८९१ यांत प्रसिद्ध झाला आहे व व दुसरा रेसिडेंट बूक सरक्युलर नंबर १६ सन १८९२ यांत प्रसिद्ध झाला आहे.

या दोन्ही हुकुमांत रेसिडेंट साहेबांनीं आपला उद्देश स्पष्ट शद्बांनीं प्रसिद्ध केला आहे तो असा.

नंबर ३१३

तारीख १ जानेवारी सन १८९२ पासून त्यांचे स्थानिक हद्दींत प्राथमिक शिक्षणाच्या सर्व शाळा स्थापन करणें, त्याची व्यवस्था ठेवणें, खर्च चालविणें, व पाहण्याचें काम त्या नियमांत सांगितलेल्या शर्तीस व अपवादास अनुसरून प्रत्येक जिल्हा बोर्डाकडे राहील.

सरक्युलर नंबर १६

ज्या डिस्ट्रिक्ट बोर्डांना आपल्या स्थल सिमेतील प्रायमरी ( प्राथमिक ) शाळा स्थापणें, त्या चालविणें व त्या पाहणें या सर्व बाबी संबंधीं व्यवस्था करण्याचा अधिकार दिला आहे आणि ज्या अर्थी, शाळा स्थापन करणें व त्या चालविणें या संबंधी एकंदर रकम शाळापट्टीचें निव्वळ उत्पन्न व प्रायमरी शाळातील फीचें उत्पन्न हीं डिस्ट्रिक्ट फंडाच्या नांवें जमा केली आहेत त्या अर्थी रेसिडेंट साहेबानीं हे सुधारलेले नियम प्रसिद्ध केले आहेत ह्मणून वगैरे.

ह्या वरील दोन हुकूमात रेसिडेंट साहेबांनीं जो आपला हेतू प्रसिद्ध केला आहे त्यावरून आपल्या वाचकां पैकीं कोणासही अशी कांक्षा वाटेल कीं आद्य शिक्षणाच्या शाळा जिल्हा बोर्डाचे ताब्यांत सरकारानीं सवस्वी दिल्या नाहींत. परंतु वास्तविक गोष्ट तशीच आहे. कारण सदहू नियमांत सांगितलेल्या शर्तीस व अपवादास अनुसरून असें जे शद्ब आहेत त्यांत सर्व गुरु किल्ली आहे

हैदेराबाद कांटीजन्सी लष्कर निजाम साहेबाचे खर्चानें निजाम साहेबां करितां ठेवलें आहे. व हुजूरची स्वारी लष्करांतून गेली असता त्यास लष्करा कडून सलामीही होत असते. परंतु या पेक्षां त्या लष्करचे संबंधानें किंवा व्यवस्थे संबंधानें हुजूरास कांहीं विशेष सवलती असतील किंवा नसतील याची कांक्षा आहे तद्वत बोर्डानें आपल्या जु

मेतून आद्य शिक्षणाच्या शाळा चालविण्या करितां रेसिडेंट साहेब जी रकम ठरवतील ती दिली पाहिजे.

जिल्हा बोर्डाचे व तालुका बोर्डाचे मेंबरास शिक्षणक्रमाचे कामीं आपलें डोकें खर्च करण्यास लागूं नये ह्मणून सरकारानें फारच काळजी घेतली आहे असें दिसते. आह्मी अशी व्यवस्था करीत आहोत असें बोर्डास कळविले जाईल व बोर्डानेंही सूचना पाहिजे त्या कराव्या परंतु बोर्ड या पेक्षां शहाणपण दाखवील तर बिलकूल चालणार नाहीं असा एकंदर भावार्थ आहे.

हैदराबादचे हुजुराप्रमाणें शाळा खात्याकडून सलामीचा मान ठेवण्याचे कामीं सरकारचा विसर भोळेपणा झालेला नाहीं. नंबर ३१३ चे जाहिरातीतील नियम ९ खालीं लिहिले अर्थाचा आहे.

जिल्हा बोर्डाच्या किंवा तालुका बोर्डाच्या कोणत्याही मेंबरानें पाथमिक शिक्षणाची शाळा शाळेचे दिवशीं जाऊन पहावी व सुधारणुकीच्या संबंधाच्या सूचना बोर्डाकडे किंवा डेपुटी कमिशनरकडे पाठवाव्या. परंतु कोणत्याही मेंबरानें किंवा तालुका बोर्डानें किंवा जिल्हा बोर्डानें कोणत्याही मास्तरास परभारे हुकूम देऊं नये यावर आमचें एवढेंच विचारणें आहे कीं शाळेच्या शेरे बुकांत शेरा कोणत्याही संभावित गृहस्थास देता येत असतो. व तो विचारार्ह असल्यास त्याचा विचारही होतो. मग यांत बोर्डाचे मेंबरास विशेष अधिकार तो काय दिला?

दहा रुपया या आंतील मास्तराच्या बदल्या बरतर्फ्या नेमणुका बोर्डाकडे आहेत. परंतु त्या नांवच्या आहेत. त्या असल्या तरी कांहीं अर्थ नाहीं. विनाकारण खटाटोप होणार एवंच तात्पर्य कायकीं सरकारचें ह्मणण्यास नों पर्यंत बोर्डे मान डोलवील तोंपर्यंत त्याची शोभा आहे. नाहीं तर निवळ फट फजिती आहे.

पुढें चालू

# The Berar Samachar

MONDAY, DECEMBER 26 1898

In our last article on education, we have pointed out that the over-strain of the present educational attainments is rather destructive to the physique of the rising generation. It goes without saying that the current system kills the originality of thought and imagination. It stores young minds with book-learning and crams them with a collection of facts in readiness for the time of examinations. The mill of examinations is typical of the mode in which education is imparted. Education must be simpler in form, easier for assimilation and more fitting to the youth and practical wants of the students as a whole. There will be a day when the present course of education will not be worth the money spent thereon

It is a pleasure to find that our popular Director Rao Bahadur S. V. Patwardhan is doing his best to improve the course of education in our schools and high-schools. But his action is not a sufficient move. He is often helpless because he has to move in a regular groove full of standards and regulations. We are glad to see him attempt to smoothen and facilitate the course. However his efforts will go a small way to improve the whole system. And unless his hands are strengthened by a movement from within, unless he is assisted by the parents and guardians and popular leaders, he would not be in a position to try for a thorough and a sweeping change. A change in the course will certainly lead to a change in the manner of teaching and in the system of examination—ordeals. We have thus tried to place before our readers the dire necessity of looking to the welfare of the students. Of the many pressing important problems, in our opinion, this should be looked to at first. In looking to it we rather mould the future generation and if the country's good be the good, the whole end and aim, then is not the moulding of the future generation the first thing to be taken in hand? Even apart from this theoretical side of the question are we not interested in the well—being of our young brothers and sons? If we are, need we not look to their wants and is it not our duty to remove the obstacles in their way when they are utterly helpless to remove them? What changes should be made in the course and what should be our guiding principles are important and momentous questions in themselves. We shall try to place our own view as to these before the public in future. In the mean time we shall have gained much if we succeed in setting the ball in motion and in awakening a keen interest for the problem in the public at large.

Industrial training has its share in the course of education provided for in Berar. The school at Amraoti is making some progress in carpentry, smithing and tailoring. However the American mission's school at Akola does very well under the superintendence of Mr. Rogers He says:—

"As to the general interest in the work, there are encouraging features; some of those who have been with us from the beginning are making excellent workmen and showing a real interest in the prosperity of the institution. The younger apprentices are doing well. They have received much encouragement from the appreciation shown by outside friends. The past year of famine has led many to see more clearly that there is need of providing some way of support other than those already in existence for the working classes, and enlarging the manufacturing facilities of the people will be one way of meeting the difficulty. We are pleased to see a growing interest in such works."

There is also a class of engineering, fitting, carpentry and smithing at the factory of Rao Sahib Deorao Vinayak. The progress of the class is summarized as below:—

"I am glad to inform you that during the year under report the class has gained a good ground. The number of students shows an increase. This fact goes to prove that the people are being gradually inclined to favour the technical education which is chiefly wanting in this part of this country The success of technical education will no doubt be a stimulus to those promising youths who after leaving the schools vainly try for service, which they have the least chance of getting more suitably. During the season under report, out of 9 boys who were given independent charge of gins for the purpose of examination, 6 turned out the work successfully and as fairly as could be expected from other ordinary fitters. Of the 6 boys 4 are engaged in factories, each drawing a salary of Rs. 25 per mensem."

This is very little indeed for the wants of the whole province. The industrial branch of education should be given the first place in our course of instruction. And we hope that it will have its due measure in no distant future.

## वऱ्हाड

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए आफि. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, इलिचपूर यांस तीन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली.

आणि त्या रजेंत रा. रा. हरिहर काशीनाथ पाटील आफि. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, आकोला यांची बदली इलिचपूर कोर्टावर झाल्या प्रमाणें ते जानेवारींत इलिचपुरास जातील.

रा० रा० सी० शामराव अल्याची, हे सध्यां आकोल्यास मित्रमंडळीच्या भेटीसाठीं आले असून या आठवड्यांत यवतमाळाकडे रवाना होतील.

आह्मांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं येथील स्माल काज कोर्टाचे जज्ज मि० एदलजी संजाना यांचे द्वितीय चिरंजीव मि० खुर शेटजी एदलजी संजाना बी. ए. वर्ग १ ला हे फर्स्ट एल एल बींत पसार झाले असून यांसच 'किनलाक फार्बस'चें सोन्याचें पदक व प्राईझ मिळालें आहे. ही विशेष संतोषाची गोष्ट होय.

मुंबई युनिव्हरसिटीच्या कांहीं परीक्षांचे निकाल लागले आहेत त्यात वऱ्हाडांतील खालील विद्यार्थी पसार झालेः—

बी. ए.

गणेश मोरेश्वर गोरे.

सदाशिव वासुदेव सोमण.

रा. रा. बंधूजी जनार्दन चौबळ. सिव्हील जज्ज, उमरावती हे रजेवरून परत येऊन आपल्या जागीं दाखल झाले.

आणि राव बहादूर बाळकृष्ण काशीनाथ जोशी, असिस्टंट कमिशनर हे उमरावतीहून गेल्या शुक्रवारीं आकोल्यास मेल गाडीनें येऊन मित्र मंडळीच्या भेटी घेतल्या नंतर लागलीच दुसऱ्या गाडीनें हैदराबादेस रवाना झाले.

म्याट्रिक्युलेशन आकोला-हायस्कूल

माणिकचंद गोंदुलाल आगरवाला, यादव महादेव काळे, वासुदेव रामचंद्र दामले, पुरुषोत्तम महादेव पिसोळे, दत्तात्रय विनायक गाडगीळ, त्रिम्बक महादेव घिरणीकर, महादेव अमृत पांडे, रामचंद्र विठ्ठल मानेकर, सदाशीव गोपाळ क्षीरसागर, करामतअल्ली, केशव गोविंद नरगुंदकर, सुबाजी, नारायण कुळकर्णी, गिरीधर सखाराम दिक्षित यशवंत विनायक देशपांडे. येणें प्रमाणें १७ पैकीं १४ विद्यार्थी पसार झाले.

उमरावती हायस्कुलांतील हो १४ विद्यार्थी पसार झाले. निकाल शनिवारीं झाल्यामुळें इतर नांवें कळलीं नाहींत.

मे० रुस्तुमजी फर्दूमजी डेपुटी कमिशनर, अकोला यांची स्वारी काल रोजीं जळगांवास होती व आज उद्यां जामोदकडे जाणार आहे.

मेसर्स करी व नबाब मोहिनुद्दीन असिस्टंट कमिशनर यांस अनुक्रमें १ ले वर्ग व २रे वर्ग माजि० चे अधिकार देण्यांत आले.

## जाहिरात

### बक्षीस रुपये ५

सर्वत्र लोकांस आणि रामचंद्र भगवंत देशपांडे राहणार पिंजर तालुका आकोला यांस

खाली सही करणार यांजकडून या लेखानें जाहिर करण्यांत येते कीं आह्मी कसबे पिंजर येथील सर्व्हे नंबर २०२ एकर २३ ८३७ पैकीं खराब ८९ वजा जातां एकर २३-२८ आकार रुपये ३९ यांतील आमचे पांचही हिस्से रामचंद्र भगवंत खातेदार यांस देण्या संबंधानें एक करारनामा सन १८९४ सालांत २ रुपयांच्या स्टांपावर लिहिला होता परंतु तो आह्मी रामचंद्र भगवंत यांस कांहीं तक्रारी वरून नाकारलें आणि तो दस्ताऐवज बातल असल्यामुळें चंद्रभान वल्द देवजी मुडे राहणार पिंजर याजपाशीं तसाच पडूं दिला. सदहू दस्ताऐवज त्या ठिकाणाहून गहाळ झाला असून त्याचा पत्ता कोठेंच लागत नाहीं तर हा कागद जो कोणी आह्मास परत आणून देईल किंवा त्याचा पत्ता लावून देईल त्यास आह्मी पांच रुपये बक्षीस देऊं. त्या पोकळ व निरर्थक दस्ताऐवजाचा कोणी उपयोग करूं नये किंवा त्याच्या जोरावर कोणी करूं नये ह्मणून ही जाहिर खबर दिली आहे.

१ आह्मी आपापले पांचही हिस्से तारीख १३ दिसेंबर सन १८९८ इसवी रोजीं माधवराव शिवराव देशपांडे राहणार पिंजर यांस पांचशे रुपयांस विकत दिले आहेत. पांचशे रुपये आह्मास त्यांच्या कडून मिळाले असून आह्मी त्यांस पांचही हिशाचा ताबा दिला आहे. ह्मणून रामचंद्र भगवंत खातेदार यास कळविण्यांत येते कीं आह्मी त्यास त्रासून आपापला हिस्सा माधवराव यांस विकला आहे तर त्यांनीं सर्व्हे नंबर २०२ च्या उपभोगास हरकत करूं नये. हरकत केल्यास त्याची तोशीस आह्मावर न पडतां सर्व नुकसान रामचंद्र भगवंत यांजडून दिवाणींतून भरून घेतलें जाईल कळावें.

तारीख. २९।१२।९८ इसवी.

सह्या.

(१) महादु वल्द जनमाळी जवके निशानी खुद.

(२) प्रताबा वल्द पुंजाजी मुडे निशानी खुद्द.

(३) लोभाई मर्द रामजी दाते निशानी बांगडी

(४) चंद्रभान वल्द देवजी मुडे निशानी खुद्द

(५) मंजाई मर्द सदाशीव कोरकनें निशानी बांगडी.

## वर्तमानसार

जूल्स लमिटर नांवाचा एक प्रसिद्ध फ्रेंच टीकाकार स्त्रीपुरुषांच्या स्वाभाविक प्रेमबंधना विषयीं लिहितांना ह्मणतात कीं स्त्रीनें एका पतीच्याच ठायीं रममाण व्हावें व पुरुषानें एका पत्नीच्याच ठायीं रत व्हावें असा नैसर्गिक मनोधर्म आहे; त्या अर्थी वैवाहिक बंधनें जितकीं बळकट व कठीण होतील तितकीं चांगलीं. स्त्रियांस वाचनाचा अति नाद लागणें चांगलें नाहीं. कांहीं गोष्टींत स्त्रिया पुरुषांपेक्षां पेक्षां श्रेष्ठ आहेत व कांहीं गोष्टींत पुरुष स्त्रिया पेक्षां श्रेष्ठ आहेत. स्त्रियांच्या आयुष्यांतील प्रमुख गोष्ट ह्मटली ह्मणजे पतिप्रेमांत तल्लीन राहून प्रजावृद्धि करणें हा होय. खरोखरच ही मुख्य गोष्ट नव्हे काय !

तारीख १६ रोजीं रात्रौ दर्भंगचे महाराजास देवाज्ञा झाली. हे फार हुषार, शिकलेले व लोककल्याणेच्छु असे होते. ह्यांच्या मृत्युमुळें सर्व देश हळहळत आहे.

लाट गव्हर्नरजनरल कर्झन साहेब हे विलायतेहून १९ वे तारखेस निघाले व ते येत्या ३० तारखेस मुंबईस येऊन पोंहोंचतील व तेथें आगतस्वागताची एक मोठी मेजवानी होईल.

केळींच्या लागवडीनें प्लेगचा आजार वाढतो सबब ती लागवड सरकारानें या देशांत होऊं देऊं नये असें डाक्टर यांचें ह्मणणें आहे. पुण्याच्या अधिकाऱ्यांस अळवाच्या लागवडी प्लेगचा आजार आणतात असें वाटल्यावरून ह्यांनीं तेथील ती लागवड बंद केली आहे. जो तो डाक्टर आपणास सर्वांत शहाणा समजतो. पण या बाबतींत अनुभवांती सगळेच मूर्ख ठरतात असें दिसतें.

क० त०

सामान्यतः असें दृष्टोत्पत्तीस येते कीं हिंदुस्थानांतील राजकीय पुढारी धर्मसंबंधीं कामांत अगदीं निरुपयोगी असतात किंवहुना ते धर्मभ्रष्ट असतात असें ह्मटल्यास विशेषसा बाध येणार नाहीं. राष्ट्रीय सभेच्या प्लेटफॉर्मवर उभे राहून दरसाल भाषणें करण्याचा व राष्ट्रांतील जमलेल्या लोकांकडून टाळ्यांचे गजराचा बहुमान मिळविण्याचा प्रसंग ज्यांना येतो त्यांच्या धर्मबुद्धीकडे लक्ष्य दिलें तर त्यांच्यासंबंधानें आह्मी अपूज्य बुद्धि प्रकट करणेंच उत्तम ! !

गोरी ठक मंडळी मिचेल नांवाच्या तिघा युरोपियन ठक बंधूंनीं निरनिराळे ठिकाणीं आफिसे उघडून युरोपियन लेडी करितां गुप्त व रामबाण औषधें विक्रीस तयार असल्याबद्दल हस्तपत्रें सर्वत्र वाटलीं त्यावरून हजारों लेडींनीं आपलीं नांवें पाठवून तीं औषधें मागविलीं होतीं. त्या नांवाचा सदर्हू ठक बंधूंनीं मग्रूराच उपयोग करून पैसे उपटण्याकरितां हल्लीं अशी हिकमत योजिली कीं, "गर्भपात करण्या साठीं घेतलेल्या गुप्त औषधाचे संबंधानें आह्मांस सर्व हकीकत कळली आहे व तुमचे हें कृत्य शिक्षेस पात्र आहे. यास्तव २ गिनी पाठवा नाहीं तर तुह्मास पकडून देऊन काम चालविण्यांत येईल" अशीं पत्रें लिहिलीं. बहुतेक लेडींनीं निमूटपणें २।२ गिनी पाठवून दिल्या. पण एकीच्या नवऱ्याचे हातीं हें पत्र गेल्यामुळें त्यानें तें पत्र पोलिसांत हजर केलें. त्यावरून सदर ठकास चतुर्भुज करून हल्लीं खटला अलाहाबादेस चालला आहे. ही गोरी लबाडी आहे ह्मणून त्याजबद्दल विशेष बोलतां कामा नये.

क० त०

२१ वर्षांच्या वयाच्या आंतील विधवांचें केशवपन करूं नये असा कायदा करण्याबद्दल सरकाराजवळ मागणें करावें असें अहमदनगरच्या सुधारकांचें ह्मणणें आहे. सरकार त्या सुधारकां इतकें वेडें झालें आहे कीं काय हें पाहाणें आहे.

युरोपियन लोकांचे सगळेच धंदे मोठे गमतीचे असतात. बर्लिन येथें थोड्या दिवसांवर एका व्यापाऱ्यानें एक मोठें दुकान काढलें आणि सर्वांस प्रसिद्ध केलें कीं, आपल्या दुकानांत जो कोणी एक रुपया किमतीपर्यंतचा माल खरेदी करील त्यास एक लहानशी सुंदर बशी फुकट मिळेल आणि एक रुपयाहून जास्त किमतीचा माल विकत घेईल त्यास एक सुंदर रुमाल मिळून शिवाय त्याचा फोटोग्राफ काढला जाईल. ही बातमी पसरतांच त्याच्या दुकानावर गिऱ्हाइकांची इतकी गर्दी झाली कीं त्याचा बंदोबस्त करण्यास पोलिसासही फार त्रास होऊं लागला. सगळे गिऱ्हाईक याच दुकानीं लोटल्यामुळें आजूबाजूच्या गरीब दुकानदारांचें नुकसान होऊं लागलें. शेजारच्या दुकानदारानें आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून करण्याची तोड काढली. त्या मोठ्या दुकानचा माल विकत आणून तो कमी किमतीनें विकण्याचें सुरू केलें व तसें लोकांत प्रसिद्धही केलें. माझा माल विकत घेतलेल्या किमतीपेक्षां कमी किंमतीस विकण्याचा तुला अधिकार नाहीं अशी मोठ्या दुकानदारानें धाकट्यास वकिलामार्फत नोटीस दिली. त्याणे ती फेकून दिली व त्या मोठ्या दुकानदारास खालीं आणण्याचा आपला तो क्रम चालूच ठेवला.

ठा० अ०

मद्रासेस भयंकर तुफान— मद्रासेस जोराची पर्जन्यवृष्टि होऊन फार भयंकर तुफान झालें व तेणेंकरून बंदरावर वगैरे फार नुकसान झालें तेथील हा० को० च्या मध्य भागचे दिवाणखाण्यांतील कांहीं बांधकाम ह्या तुफानी पाऊस वाऱ्यांचे योगानें पडलें. खिडक्यांच्या कांचा पडून फुटल्या. मद्रासच्या पेन्नार नदीला मोठा पूर येऊन साऊथ इंडियन रेलवे लाईनीवर अनेक ठिकाणीं नुकसान झालें. ह्या तुफानांत विद्युल्लतेनेंही फार घाबरवून सोडलें. इग्मोर येथें बांधलेल्या प्लेगहॉस्पिटलमध्यें पाणी शिरून त्याचें नुकसान झालें.

आफ्रिकेंत बैरा नांवाचें शहर आहे तेथील सर्व इमारती, रेलवे रस्ते, दुकानें, खानावळी वगैरे नस्तार्थी केली असून त्याला खर्च सुमारें ६००० पौंड पडला आहे. ही नवी वसाहत स्वल्पकालांत उभारलेली आहे पण तेथील उन्हाच्या तापानें पराकाष्ठेचें दुःख होत असतें. बैरा शहरांत धान्य ह्मणून ठाऊक नाहीं. तेथें मांसा शिवाय दुसरा आहार माहित नाहीं. अलिकडे दोन दगडी इमारती बांधल्या आहेत त्यामुळें सर्वच शहर नस्तार्थे नाहीं असें वाटतें.

रद्द झालेलीं पोष्टाचीं तिकिटें व पाकिटें ह्या देशांत जमवून अमेरिकेंत पाठविण्यांत येतात, ती विकून त्यांच्या उत्पन्नावर कांगो प्रांतांत ९ नवीं ख्रिस्ती गांवें बसविण्यांत आलीं आहेत.

सात लाखांची देणगी— मुंबईतील जवाहिराचे प्रसिद्ध व्यापारी शेट पन्हालाल त्यांणीं एक जैनकालेज स्थापन करण्यासाठीं ४ लाख व इतर धर्मकृत्यांस ३ लाख मिळून ७ लाख रुपये देण्याबद्दल आपल्या मृत्युपत्रांत व्यवस्था करून ठेविली आहे. केवढें दातृत्व पहा ! !

आ० व०

ब्रह्म देशांतील लोकांनीं व्हाईसरायांचा आदरसत्कार करण्याच्या बाबतींत कांहीं नवीन सुधारणा केल्याचें दिसून आलें आहे. मोलमीन येथील ब्रह्मी लोकांनीं आपलें मानपत्र दिल्यावर त्याच पुढारी लोकांपैकीं कांहींच्या पांच सहा उत्तम पोषाख केलेल्या व उंची दागदागिने घातलेल्या तरूण मुली पुढें आल्या व त्यांनीं फार मोहकपणानें लाट साहेबांना मुजरा केला. स्त्रियांना मुजरा करण्याला आणण्याचें काय प्रयोजन असेल तें असो. पण तेथील स्त्रियांची येथपर्यंत मजल आली असेल तर अवघ्या तेरा वर्षांतच ब्रिटिशराज्यव्यवस्थेनें पाश्चिमात्यधर्तीवर पुष्कळ सुधारणा केली आहे यांत शंका नाहीं. मोलमीन येथील व्हरनॅक्यूलर शाळांतील सुमारें वीस मुलींनीं मिळून लाट साहेबांच्यापुढें आपला नाच आणि गाणें करून दाखविलें. व दुसऱ्या एका शेजारच्या गांवांतील वीस तरुण स्त्रियांनीं ही त्याचप्रमाणें आपल्या नृत्यगायनाची चरणांपुढें हजेरी दिली.

काळ

---

## विक्रीस तयार.

SAPKAR'S DIARY
FOR 1899.
WITH
A CALAENDAR FOR 1900

### सापकरांची रोजनिशी,
### सन १८९९ सालाकरितां

हींत मराठी तिथी, वार, महिने, सुर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौंजीविवाहांचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र स्टांप, मनीआर्डर, पोस्ट, मुंबई बॅंकेच्या रूढी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा. विशेष न्यायाचा. दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टॅंप, कोर्टफी, पोलिस गाईड डिस्ट्रिक्ट आणि गावचें पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरीं पृष्टें जोडलीं आहेत.

रोजनिशीची किंमत.

प्रत नंबर १.... .... ....०१२ ०२
प्रत नंबर २.... .... ....०८ ०१॥
प्रत नंबर ३.... .... ....०७ ०१

किंमतीबद्दल रोख पैसे आह्माकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

---

## श्रीएकनाथ मंदीर प्रतिष्ठान
## (पैठण)
## यांचा जीर्णोद्धार

श्री नाथ महाराजांचें गांवांतील मंदीर अति जीर्ण झाल्यामुळें नवीन करण्याचें मनांत आणून कार्तिक शुद्ध ९ शुक्रवार शके १८२० विलंब नाम संवत्सर रोजीं मंदिराचें काम आरंभिलें आहे. विशेष खर्चाचें ह्मणजे निदान पांच पन्नासहजार रुपयांचें काम असल्यामुळें संस्थानांतूनच संपूर्ण खर्च होणें संभवनीय नाहीं त्यामुळें सर्व सभ्य व उदरधी राजे, संस्थानिक जहागीरदार, साहूसावकार आणि संत मंडळी यांस सविनय प्रार्थना आहे कीं आरंभिलेलें योग्य कृत्यास सर्वत्रांनीं आपआपले शक्ती व इच्छे प्रमाणें या महत्तर परमार्थ कामीं उदार हस्तें द्रव्यद्वारा मदत दिल्यास मंदिराचें काम त्वरेनें पूर्ण होऊन श्रेयाचे अधिकारी सर्वच होतील. पैठणास इंग्रजी व मोगलाई पोस्ट असोन तहसीलदार कचेरी आहे. मनीआर्डर, जोस मुबादला अथवा हुंडी वगैरेच्या रुपानें जी कांहीं रकम खालील पत्यावर येईल त्याची पावती संस्थानांतून दिली जाऊन शिवाय जगद्धितेच्छु वर्तमानपत्रांतून नांवनिशीवार पोंच ही दिली जाईल.

एकनाथ अनंत
कारभारी.
श्रीनाथ संस्थान व नाथ मंदीर फंड
क्षेत्र पैठण.
पोष्ट. पैठण, जिल्हा औरंगाबाद
दक्षिण.

---

## जाहिरात
### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची
### बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील जबाबर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तीं दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पावेत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या ह्यातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई व्यांक
आकोला १९ जुलै १८९८

A. G. Watson
Agent.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.